
# श्री साईलीला

आक्टोबर १९५७

किंमत १० आणे

( ६२ नये पैसे )



शिरडी संस्थानचें अधिकृत त्रैमासिक



# श्री साई लीला


[ शिरडी संस्थानचें अधिकृत त्रैमासिक ]

वर्ष ३४ वें : अंक ३ रा

वार्षिक वर्गणी रु. २-४-० (ट. ख. सह)

जुलै—ऑगस्ट—सप्टेंबर १९५७



संपादक—

नागेश आत्माराम सावंत

रामचंद्र महादेव राणे




कार्यालय—

ईस्ट ॲण्ड वेस्ट इं. कं. बिल्डिंग,

४९।५५ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुं. १


## श्री साईवाक्सुधा



★


करितां माझियां कथांचें श्रवण ।
तयांचें कीर्तन आणि चिंतन ।
होईल मद्‌भक्तीचें जनन ।
अविद्या—निरसन रोकडें ॥

—श्री साईसच्चरित अ. २



# अनुक्रमणिका


| विषय | लेखक | पृष्ठ |
|---|---|---|
| श्रीसाई वाक्सुधा | | ४ |
| प्रिय वाचक | संपादक | ५ |
| पद साईचें वंदावें | बाबांच्या बाळाचें बाळ | ६ |
| बाबांची लीला | | ७ |
| श्रीगुरुपौर्णिमा महोत्सव | | ९ |
| श्री ज्ञानेश्वर जीवन | वाङ्मयप्रभु खं. स. त्रिलोकेकर | ११ |
| तूं साई आमुची माई | श्रीदासगणूमहाराज | १५ |
| श्री साईबाबांची शिकवण | ना. वा. गुणाजी | १७ |
| श्री रामकृष्ण आणि विद्यासागर | | २८ |
| आपले निश्चय | द. पां. खां. | ३८ |
| भावनेला किंमत आहे | विनोबा | ४८ |
| सुश्लोकगीता | वि. के. छत्रे | ४९ |
| शब्दांचा महिमा | आचार्य विनोबा भावे | ५४ |
| वंशश्रेष्ठत्व आणि वर्णश्रेष्ठत्व | | ६१ |
| अन्वययोग व व्यतिरेकयोग | ग. ल. रेगे | ६७ |
| भक्त मंडळाचे सभासद | | ७३ |
| श्रीसाई संस्थानला मिळालेल्या देणग्या | | ७४ |
| श्रीसाईस्तवनाष्टक | शं. बा. दाते | ७७ |
| शिरडी वृत्त | | ७८ |

# प्रिय वाचक—

श्रीसाईलीलेचा चालू अंक हा पुण्यतिथि विशेषांक आहे. विविधता आणि वाचनीयता या दोन्ही दृष्टीनीं हा अंक वाचकांना आवडावा. यांतील कांहीं विशेष लेखांकडे आम्ही वाचकांचें लक्ष वेधूं इच्छितों. श्री. ना. वा. गुणाजी यांनीं गुरु आणि गुरुकृपा यांविषयीं श्रीसाईबाबांची शिकवण कशी होती, याचें सुबोध आणि सयुक्तिक विवेचन आपल्या लेखांत केलें आहे. आध्यात्मिक विषयांसंबंधीं श्री. गुणाजी यांचा दीर्घकालचा सखोल व्यासंग आहे. या व्यासंगाचें प्रतिबिंब प्रस्तुत लेखांत उमटलें असल्याचें वाचकांना आढळून येईल.

संस्कृत भाषेंतीत शब्द—सामर्थ्या विषयीं आचार्य विनोबा भावे यांनीं केलेलें विवेचन वाचकांना अपूर्व आणि मननीय वाटेल. पं. ईश्वरचंद्र विद्यासागर यांच्याशीं श्री रामकृष्ण परमहंस यांचा झालेला संवाद 'एम्.' यांच्या ग्रंथावरून श्री. मंडणामिश्र यांनीं अनुवादित केला आहे. हा अनुवाद वाचकांना अत्यंत आकर्षक व उद्‌बोधक वाटेल. आपले निश्चय कां फसतात आणि केव्हां साधतात, या विषयावर मानसशास्त्रीय विवेचन असलेला प्रस्तुत अंकांतील लेख वाचकांच्या विचारांना खास चालना देईल. प्रस्तुत अंकांतील प्रत्येक पृष्ठ वाचनीय करण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे. अंकाच्या एकंदर अंतरंगासंबंधी वाचकांनीं आपलें मत आम्हांला कळविल्यास आम्ही आभारी होऊं. श्री साईलीला महाराष्ट्रांत घरोघर पोंचावी अशी आमची मनीषा आहे. या दृष्टीनें वाचकांच्या अपेक्षा आणि त्रैमासिकाच्या चालू स्वरूपाबद्दलच्या त्यांच्या प्रतिक्रिया समजल्या तर त्या आम्हांला खचित मार्गदर्शक ठरतील.

× × ×

शिर्डी येथील इस्पितळ तेथें येणाऱ्या भक्तांच्या आणि तेथील जनतेच्या सेवेसाठीं अद्ययावत् आणि सुसज्ज करण्याचा शिर्डी संस्थानचा प्रयत्न आहे. इस्पितळासाठीं भक्तांकडून देणग्या मिळत आहेत. त्यांची यादी इतरत्र या अंकीं दिलीच आहे. या देणग्या वाढल्या तर रुग्ण—सेवा करण्याचें संस्थानचें सामर्थ्यहि वाढणार आहे. म्हणून या सुयोग्य कार्याकडे दात्या भक्तांनीं लक्ष पुरवावें अशी आम्ही विनंती करतों.

× × ×

साईभक्तीच्या प्रसाराबरोबर भाविकांच्या भोळ्या भावनेचा फायदा लुटणारे लोकहि वाढूं लागले असल्याचें अलीकडे आढळून येऊं लागले आहे. आपण साईबाबांचा अवतार आहोंत असें सांगून भक्तांना फसविणाऱ्या समाजकंटकांच्या कारवायांच्या कथा वृत्तपत्रांतून प्रसिद्ध होत आहेत. खुद्द साईबाबांनीं

आपला वेगळा संप्रदाय निर्माण केला नव्हता. त्यांची भक्ति करण्यासाठीं मध्यस्थाची गरज नाहीं. साईबाबांच्या नांवावर आपली तुंबडी भरून घेणाऱ्या धूर्तांपासून भक्तांनीं सावध राहावें आणि त्यांच्या जाळ्यांत सांपडून स्वतःची दिशाभूल होऊं देऊं नये, असें आम्हांला कटाक्षानें सांगावेंसें वाटतें.

× × ×

केवळ धार्मिक विषयांना वाहिलेलें नियतकालिक चालविणें ही गोष्ट सध्यांच्या युगांत अत्यंत कठीण आहे. अशीं नियतकालिकें थोडा काळ चालून जनतेच्या आश्रयाच्या अभावीं बंद पडलीं असल्याचीं अनेक उदाहरणें आहेत. असें असतांना केवळ या विषयाच्या आस्थेनें असें धार्मिक नियतकालिक चालू करण्याचें जे साहस करतात त्यांचें अवश्य कौतुक केलें पाहिजे. श्री. 'साधुदास' यांनीं 'प्रेमानंद' या नांवाचें मासिक यंदांच्या एप्रिल महिन्यापासून चालू केलें आहे. आतांपर्यंत प्रसिद्ध झालेले या मासिकाचे अंक पाहतां साधकांना हें मासिक संग्राह्य असेंच वाटेल यांत शंका नाहीं. 'साईसुमन' नांवाचें एक गुजराती मासिक आज कांहीं वर्षें चालू आहे तेंहि वाचक-भक्तांना वाचनीय व संग्राह्य वाटेल. सत्संग हा आपल्याला आपल्या इच्छेप्रमाणें हवा तेव्हां उपलब्ध असत नाहीं. पण सत्संगानें होणारा लाभ, संतांचे विचार आपल्याला उपलब्ध करून देणाऱ्या अशा नियतकालिकांतून कांहीं प्रमाणांत मिळूं शकतो. या दृष्टीनें प्रेमानंद (मराठी) आणि साईसुमन (गुजराती) या मासिकांचें आम्ही स्वागत करतों आणि भक्तजनहृदयांत त्यांना स्थान मिळावें असें अंतःकरणापासून इच्छितों.

संपादक } ना. आ. सावंत
रा. म. राणे

---

## पद साईचें वंदावें

पद, साईचें वंदावें।
नाम, साईचे ते गावें ॥ ध्रु ॥

साई आहे अंतर्ज्ञानी।
त्यांसी गावें हो कीर्तनीं।
काव्य चरणीं वहावें ॥ १ ॥

गोदा प्रक्षाळी चरण।
मशिद भूषवी आसन।
धुनी ती प्रखरचि राहे ॥ २ ॥

निंब फांदी गोड होई।
ज्ञान दीक्षा तेथें दिली।
स्थाना गुरुच्या नमावें ॥ ३ ॥

—बाबांच्या बाळाचें बाळ




## श्री. द. शं. टिपणीस, ठाणें, हे लिहितात—

श्रीसाईसत्चरित्रांत बाबांच्या अनेक लीलांचें वर्णन आहे. बहुतेक भक्तांचें संकट वा अडीअडचणी दूर करण्यासाठीं किंवा त्यांना कांहीं पारमार्थिक तत्त्व शिकविण्यासाठीं झालेल्या आहेत. बाबा हे वरून उग्र दिसले तरी आंतून अत्यंत कोमल अंतःकरणाचे होते. श्री. चांदोरकरांच्या मुलीच्या बाबतींत त्यांनीं केलेला चमत्कार तर अलौकिकच आहे. परंतु सडकेची माती उदी म्हणून बाबांचें नांव घेऊन निष्ठेनें लावल्यावर सुखरूप सुटका झाल्याचा साईचरित्रांतील दाखला तितकाच अलौकिक व बाबांचें सामर्थ्य दाखविणारा आहे. अडलेल्या स्त्रियांची सुटका करण्याचें उदीचें सामर्थ्य वेळोवेळीं प्रगट झालें आहे. अडलेल्या स्त्रीनें मदतीसाठीं निष्ठेनें बाबांना हांक मारली कीं बाबांनीं तत्काळ धांवत येऊन त्या स्त्रीचें कल्याण करावें ही गोष्ट अजूनही होणाऱ्या घटनांमधून व्यक्त होत असते. अशाच ताज्या लीलांपैकीं पुढील एक आहे.

ही घटना या वर्षाच्या एप्रिल महिन्यांत घडलेली आहे. यंदा रामजन्मोत्सव करावा असें कांहीं भक्तांच्या मनांत आलें. हा उत्सव माझे घरीं करण्याचें ठरलें. आठ दिवस श्रीसाईसत्चरित्राचें सामुदायिक पारायण, कीर्तनें, प्रवचनें, भजनें असा कार्यक्रम झाला. पहिल्या दिवशीं शिर्डी संस्थानचे विश्वस्त श्री. देव वकील, ठाणें, यांचें कीर्तन होतें. पुढील घटनेची सुरवात या वेळीं झाली.

आमच्या शेजारीं डॉ. भागवत यांचें सूतिकागृह आहे. तेथील सिस्टर सामुदायिक पारायणास येत असत. श्री. देवांच्या कीर्तनास त्या हजर होत्या. त्यांच्या भाचीला दिवस गेले होते. रामनवमीच्या सुमारास प्रसूतिकाल होता. सूतिकागृहांत येणाऱ्या सर्व केसिसची जबाबदारी अंगावर असल्यामुळें व कोणती केस केव्हां येईल याचा नेम नसल्यामुळें आपल्या हातून सर्व पारायण पार पडेल कीं नाहीं याची सिस्टरना धाकधूक होती. परंतु बाबांनीं त्यांची इच्छा सफळ केली. पारायणाच्या काळांत एकही केस आली नाहीं. भाचीचे दिवस भरत आल्यामुळें त्यांना काळजी लागली होती. लग्नानंतर १४ वर्षांनीं माता होण्याचा योग भाचीस आला होता. कांहीं अंतर्गत दोषामुळें एकंदर काम कठीण जाईल व दोन्ही जीव हातीं लागणें अशक्य वाटतें असें डॉक्टरांचें मत होतें. स्वतः सिस्टर, त्यांची भाची व तिचे वडील सर्वच

काळजींत होते. श्री. देवांच्या कीर्तनास ही सर्व मंडळी होती.


श्री. देव यांचें भक्तिरसाचें गायन रंगांत आलें असतां सिस्टर बाबांना बोलून गेल्या कीं जर माझ्या भाचीची सुखरूप सुटका होऊन बाळ बाळंतिणीचे जीव हातीं लागले तर देवा, याच देवाचें कीर्तन मी येथें करवीन. त्यांनीं केलेला नवस अर्थात् कोणासही माहीत नव्हता बाईंची बाबावर श्रद्धा होती. अजाण अशी बिचारी भाची जसजसे दिवस भरूं लागले तसतशीं अधिकाधिक घाबरुं लागली. पहिल्या दिवशीं कीर्तनास भाचीही आली होती. ती रोज बाबांच्या दर्शनास येत असे व उदी लावून जात असे. तिचें घर सुमारें १। मैलावर असतांनाही व तिची परिस्थिति कठीण असतांनाही ती रोज चालत येई व चालत जाई. शिरडीचे साईबाबाच आपले पाठीराखे आहेत अशी तिची दृढ भावना होती. उत्सव संपला.

हनुमानजयंतीचा दिवस. सकाळीं ८॥ वाजतां सदरहू भाची दवाखान्यांत आली. आदल्याच दिवशीं आमच्याकडे शिरडीहून उदी आली होती, त्यांतील उदी माझ्या पत्नीनें सिस्टरच्या स्वाधीन केली. उदी पाण्यांत टाकून तिला पाजण्यांत आली. २॥–३ तास झाले, पण मुक्तता होईना. ११॥ च्या सुमारास मुंबईहून सर्जन आले व ऑपरेशन करण्याचें ठरलें.

आम्हीं शेजारींच राहत असल्यामुळें या सर्व हालचाली आम्हांस कळत होत्या. १२। च्या सुमारास आम्हीं जेवावयास बसलों. आमच्या स्वयंपाक घराच्या शेजारीं ऑपरेशन रूम येते. सुमारें १२–२० ला माझ्या पत्नीस एकाएकीं अत्तराचा घमघमाट आला. तिनें ही गोष्ट मला सांगितली. मला मात्र कसलाच वास आला नव्हता. असेल कदाचित्, बाबाच स्वतः फेरी मारून गेले असतील, एवढेंच मी म्हणालों. माझें जेवण झालें व पांच एक मिनिटांत खोली मधून नूतन बालकाच्या रुदनाचा आवाज आला. माझा मुलगा लगेच धांवत गेला व चौकशीं अंतीं कळलें कीं सुखरूप सुटका झाली. हनुमान जयंतीस मारुतीरायच जन्मास आले. यामुळें सिस्टरला व मुलीच्या वडिलांना किती आनंद झाला असेल तें सांगणें नकोच. मागाहून कळलें कीं १२–१० ला ऑपरेशनची सुरवात झाली व १२–४० ला सुटका झाली. याच दरम्यान बाबांच्या फेरीचे दर्शक असे सुवास आले.


कबूल केल्याप्रमाणें नवस लगेच फेडण्यांत आला. अकराव्या दिवशीं म्हणजे २४ एप्रिल रोजीं श्री देव वकील ठाणें यांच्या हस्तें श्रीबाबांची व सत्यनारायणाची पूजा मुलीच्या वडिलांनीं करवून घेतली. उत्सवांत होती तशीच आरास करण्यांत आली रात्रीं श्री. देव वकील, ठाणें, यांचें कीर्तन झालें व कीर्तनानंतर कॉफीपान झालें या घटनेशीं संबंध आलेल्या सर्व माणसांची बाबावर अत्यंत श्रद्धा बसली आहे. श्रीसद्गुरुंच्या कृपेनें बाळ बाळंतीण खुशाल आसून त्या कुटुंबांत आनंद आहे.

## गुरुपौर्णिमा महोत्सवांतील हारकातन




श्री. एल्. बी. पाटकर, श्री प्रसन्ना स्टुडियो, यांच्या सौजन्यानें

## गुरुपौर्णिमा महोत्सवांत श्रींच्या रथाची मिरवणूक




श्री. एल्. बी. पाटकर, श्री प्रसन्ना स्टूडियो, यांच्या सौजन्यानें

# यंदांचा श्रीगुरुपौर्णिमा महोत्सव

श्री सच्चिदानंद सद्गुरु साईबाबा महाराज मु. शिरडी. ता. कोपरगांव जि. अहमदनगर येथील गुरु पौर्णिमा उत्सव सालाबाद प्रमाणें यंदाही मि. आषाढ शुद्ध पौर्णिमा शके १८७९ गुरुवार माहे जुलै दि. ११ इ. स. १९५७ या दिवशीं श्रीचे मंदिरांत साजरा झाला. उत्सवास प्रारंभ बुधवार दि. १०–७–५७ रोजीं होऊन शुक्रवार दि. १२–७–५७ रोजीं तो समाप्त झाला. शीतज्वराच्या सांथीमुळें उत्सवास यंदा बाहेरगांवच्या भक्त मंडळीची गर्दी नेहमी पेक्षां थोडी कमी प्रमाणांत होती.

उत्सवाचा प्रारंभ बुधवार दि. १०-७-५७ रोजीं सकाळीं काकड आरती पासून झाला. ह्या दिवशीं नेहमीच्या कार्यक्रमा व्यतिरिक्त अभिषेक व मुंबई येथील प्रसिद्ध कीर्तनकार ह. भ. प. दासबुवा परुळेकर यांचें सुश्राव्य कीर्तन दुपारीं ४ ते ७ पर्यंत झालें. रात्रौ श्रीच्या पालखीची गांवांतून मिरवणूक तदनंतर कलाकारांच्या गायनांची हजेरी झाल्यावर नित्याप्रमाणें शेजआरती होऊन ह्या दिवसाचा कार्यक्रम संपला.

गुरुवार दि. ११–७–५७ गुरु पौर्णिमेचा दिवस असल्यामुळें पहांटे ५ वाजतां श्रीच्या काकड आरतीस सुरवात झाली. नंतर श्रीचे समाधीस सुमधुर वाद्यांच्या गजरांत मंगल स्नान घालण्यांत आलें. व नंतर नेहमीप्रमाणें पूजाआर्चा होऊन सामुदायिक अभिषेकास प्रारंभ झाला. त्यानंतर ह. भ. प. दासबुवा परुळेकर, मुंबई यांचें कीर्तन दुपारीं १२॥ पर्यंत होऊन नंतर श्रीची माध्यान्ह आरती झाली. दुपारीं ३॥ ते ५॥ श्रीयुत श्री. बा. ऊर्फ बाबुराव देव यांचें ‘ श्रीगुरुपौर्णिमा ’ या विषयावर प्रवचन झालें. नंतर ह. भ. प. रामचंद्र बुवा भोगावते, अमळनेर (पू. खा.) यांचें कीर्तन व सौ. शोभनाबाई भोगावते यांचें ओव्या गायन झालें. रात्रौ ९ वाजतां श्रीचे रथाची मिरवणूक असंख्य भक्त जनांच्या मेळाव्यांत गावांतून वाजत काढण्यांत आली. त्यावेळीं शोभेच्या दारूचें सामान लावण्यांत आलें होतें. ह्या मिरवणुकीचें वेळीं भारूड भजन पुण्याचे श्री. रघुनाथ सांडभोर यांनीं केलें.

या दिवशीं सबंध रात्र बाबांचें जागरण असल्यामुळें रात्रभर निरनिराळ्या खालील कलाकारांनीं दुसऱ्या दिवशीं पहांटे ६ वाजेपर्यंत श्रीच्या समोर हजेरी देऊन हा समारंभ साजरा केला. श्री. एस. एम्. आकेरकर, मुंबई (अभंग) श्रीमती नलिनीबाई पी. रांगणेकर, मुंबई. (भक्तिगीत) श्री. जिजाबा, शिरडी, (भक्तिगीत) श्री. श्रीराम सावर्डेकर, मुंबई (भक्तिगीत) श्री. विठ्ठलराव मांजरेकर, शिरडी. (भक्तिगीत) श्री. रामचंद्र हरी तांबे, रत्नागिरी, (गायन) श्री. श्रीपाद

बाळकृष्ण देव, ठाणें (भक्तिगीत) श्री. लक्ष्मणराव राऊत, अहमदनगर (सनई-वादन) श्री. दत्तोबा दामोदर बिडवे, पुणें (स्पेशल तबला) श्री. दत्तोबा गुरव, शिरडी (पेटीवादन) श्री. धरमचंद मारवाडी. पुणें. (तबलावादन) श्री. रामचंद्र जर्नादल काळे. अहमदनगर (भक्तिगीत) श्री. एकनाथ-राव तुपे, कोपरगांव, (भक्तिगीत) श्री. दत्तोपंत जोशी, बेलापूर, (भक्तिगीत) श्री. वसंतराव बाबुराव देवालणेकर, पुणें. (सनईवादन.) श्री. सदाशिव सखाराम पुजारी, नासिक, (तबला वादन) श्री. शंकर पांडुरंग तुपे, कोपरगांव, (सनई वादन.) श्री. गणपतराव खेडकर, पुणें, (सनई वादन) श्री. शंकरराव बाबुराव नगरकर, पुणें. (सनई वादन) श्री. पांडुरंग व्ही. कदम, बेलापूर, (तबलावादन) श्री. दामूअण्णा एम. दळवी, श्रीरामपूर. (सनई वादन) श्रीमती माईसाहेब शिरोडकर, मुंबई. (भक्तिगीत) वरील सर्व कलाकारांना श्रीसाई संस्थान तर्फे श्रीचा आशीर्वाद म्हणून श्रीफल व एक रुपया प्रत्येकीं प्रसाद म्हणून देण्यांत आला.

शुक्रवार दि. १२-७-५७ रोजीं श्रीच्या स्नानानंतर पूजा अर्चा होऊन सामुदायिक अभिषेक झाला. नंतर संस्थान गवई श्री. विठ्ठलराव मराठे, यांचें गोपाळ काला कीर्तन झालें आणि दही-हंडी खेळ फुगड्या वगैरे कार्यक्रम होऊन श्रीची माध्यान्ह आरती तीर्थ प्रसाद वगैरे झाल्या वर उत्सव समाप्त झाला.

उत्सवांत तीन दिवस श्रींचे समाधीस अर्पण केलेल्या जुन्या कपड्यांची, भक्तांना प्रसाद म्हणून विक्री करण्यांत आली.

उत्सवांत पताका, तोरणें व विजेच्या दिव्यांची रोषणाई वगैरे करण्यांत आली होती. तसेंच स्वच्छता खात्या मार्फत सर्व जागीं डी. डी. टी. फवारे मारून सर्व खोल्या साफ करण्यांत आल्या होत्या. पोलीस, होमगार्ड, स्वयंसेवक यानी उत्कृष्ट बंदोबस्त ठेवला होता. पोलीस अधिकारी श्री. स्कॉट व श्री. थोरात हे स्वतः दक्षतेनें देखरेख ठेवीत होते.

उत्सवांत संस्थान कमिटीचें अध्यक्ष, ट्रस्टी, सन्मा. चिटणीस, सन्मा. खजिनदार, सदस्य, उत्सव समिती व संस्थानांतील सर्व दर्जाच्या नोकरवर्गानें मेहनत घेऊन तीन दिवस सर्व कार्यक्रम योग्य प्रकारें साजरे करण्यांस मदत केली, हें नमूद करण्यास आनंद होतो उत्सवाप्रीत्यर्थ येणाऱ्या भक्तगणांची सोय एस. टी. ने जास्त गाड्या सोडून उत्तम प्रकारें केली होती. ह्या उत्सवांत, वृद्धपणामुळें सेवानिवृत्त झालेल्या ४ संस्थान नोकरांस रोख रुपये (मानधन) व कापड देऊन त्यांचा सत्कार करण्यांत आला. याप्रमाणें श्रीगुरु पौर्णिमा उत्सव फारच उत्तम रीतीनें पार पडला.

**रा. म. राणे**
स. चिटणीस उत्सव समिति



# अलकापुरींत देवांचे अवतार

कै. वाङ्मयप्रभु खं. स. त्रिलोकेकर

## प्रकरण ४ थें

'इतिहासाच्या अभावामुळें एकंदर राष्ट्राविषयींची जुनी माहिती जशी अगदीं बुडाली, त्या प्रमाणेंच चरित्रांच्या अभावीं प्राचीनकाळीं होऊन गेलेल्या महान् महान् पुरुषांचें वृत्तहि केव्हांच समूळ नष्ट होऊन गेलें आहे. आतां 'शंकर विजय' 'ललित विस्तार' 'भोज प्रबंध' वगैरे कांहीं ग्रंथ संस्कृतांत व मराठींत 'भक्तिविजय' 'संत लीलामृत' अशा सारखे देशांत कांहीं आहेत खरे; पण पुराणांत व इतिहासांत जितकें अंतर तितकेंच वरील ग्रंथांत व खऱ्या चरित्रांत.' (कै. विष्णुपंत चिपळूणकर ह्यांची निबंधमाला पान ६५१).

ज्ञानेश्वरांचें चरित्र वरील मालाकारांचें जे मत उद्धृत केलें आहे, त्याप्रमाणें जवळ जवळ दंतकथावजा किंवा पुराणवजा आहे. पण ह्या दंतकथांतूनच इतिहासाची निर्मिति करण्याच्या प्रयत्न केला पाहिजे. न्या. रानडे ह्यांनीं दंतकथातूनच ज्ञानेश्वर हे त्या काळचे बंडखोर लूथर होते, त्यांनीं त्या काळच्या ब्राह्मणधर्माविरुद्ध बंड पुकारून भागवत धर्म किंवा पर्यायानें वारकरी धर्म असें नांव पडलेल्या सगुण भक्ति सांप्रदायांतील भक्ताच्या व्यष्टि धर्माचा प्रसार स्वतः आचरून एक जात साऱ्या जनतेचा उद्धार केला. हें सिद्ध केलें. किंबहुना त्यांनीं भाषा आणि धर्म ह्यांच्याद्वारें महाराष्ट्राचें एकीकरण केले म्हणूनच तीनशें वर्षांनंतर रामदासांना महाराष्ट्र धर्म कोणता हें ओळखतां आले व 'मराठा तेवढा मेळवावा। महाराष्ट्र धर्म वाढवावा।' हा उपदेश संभाजीस करतां आला. हीं सारीं ऐतिहासिक सत्यें न्या. रानड्यांनी ज्ञानेश्वरांच्या दंतकथावजा चरित्रांतूनच हुडकून काढलीं. लो. टिळकांनीसुद्धां ज्ञानेश्वरानें पंढरपूर ते आळंदीपर्यंत धर्म आणि भाषा ही दोन केंद्रे रोखून ठेवली म्हणूनच पुढें शिवाजी, रामदासांना आपल्या स्वराज्य प्राप्तीचें कार्य महाराष्ट्राच्या सीमा ओळखून करतां आलें, असें आपलें स्पष्ट मत दिलें. हा मुद्दा माझ्या प्रबंधांत अत्यंत महत्त्वाचा असल्यामुळें न्यायमूर्ति रानडे व लोकमान्य टिळक ह्यांच्या मतांचा उल्लेख मी बुद्धिपुरःसर पुन्हां पुन्हां केलेला आहे. पण हें ऐतिहासिक सत्य लो. टिळकांनीसुद्धां ज्ञानेश्वरांच्या दंतकथा-

वजा चारित्रांतूनच शोधून काढलें आहे. ज्ञानेश्वरांचें चरित्र आजवर बऱ्याच लोकांनीं केलें आहे. त्या चरित्रांत नुसता सांगाडाच असून त्यांत प्राण किंवा जिवंतपणाची जोड देण्याचें काम कोणी केले नाहीं. निवृत्ति, ज्ञानदेव, सोपान व मुक्ताबाई हीं भावंडे अवतारी खरीं पण देहाच्या उपाधींतले सारे मानवी धर्म त्यांच्यांत असणें व ते तसे दाखविणें म्हणजेच त्यांच्या आजपर्यंतच्या उपलब्ध चरित्रांच्या दंतकथावजा सांगाड्यांत प्राण भरणें होय. पण हें कार्य नितांत उसळत्या कल्पनेचें आहे. पण ही उसळती कल्पना त्या दंतकथावजा चरित्राच्या सांगाड्यांत नीट बसेल अशीच असली पाहिजे. हा नाजूक भेद पाळला नाहीं तर from sublime to ridiculous असा प्रकारही होण्याचा संभव आहे व त्यामुळें त्या चरित्रांची कल्पित कादंबरी करण्या सारखा हास्यास्पद प्रकार ठरला जाईल. हे सारे खांचखळगे संभाळून हें चरित्र लिहिण्याचा मी प्रयत्न करीत आहे. त्यांत मला कितपत यश आले हे ठरविणें वाचकांचें काम आहे, पण मनांत पुन्हा एकदा असा विचार येतो कीं, आपण प्रयत्न तर करून पहावा. माझ्या ह्या कार्यानें स्फूर्ति होऊन माझ्यापेक्षां एखादा यशस्वी लेखक हें कार्य हातीं घेईल ह्या सदिच्छेनेंच केवळ मी हें [illegible]खाण करीत आहें.

ज्ञानदेवाच्या चरित्रांचें मुख्य साधन म्हणजे नामदेवाचे आदि तीर्थावळी व समाधीचे अभंग होत. ह्या साधनांवरूनच महिपति, निरंजन, माधवादिकांनीं आपापलीं ज्ञानदेव चरित्रें रचिली आहेत. ही सारी चरित्रें एका भक्तीचे भूमिकेवरच उभारलेली आहेत व त्यामुळें त्यांत भक्ति, अतिशयोक्ति व चमत्कार ह्यांची रेलचेल सांपडते. अर्थात् हीं सारीं चरित्रें निबंधमालाकार चिपळूणकरांच्या शब्दांत म्हणावयाचें म्हणजे जवळ जवळ पुराणवजाच आहेत नामदेवाचे आदींतले

**Your life is worth-living.**
**Only if you can face it with Confidence.**
**Know its trends and make it a Succces.**
**Expert consultation at moderate terms by**
**Previous apporntment, only available from**

**G. M. Bhiwankar**

Palmist & Astrologer Near Electric Power House
1st Road, Khar **Bombay 21**
On Saturdays 3 p. m. to 5-30 p. m.
On Sundays & Bank Holidays
9 A. M. to 12 & 2-30 to 5-30 P. M.

All correspondence covering reply should reach before any Wednesday.

अभंग विश्वसनीय वाटत नाहींत. त्या अभंगांत ज्ञानदेवाच्या तोंडीं निवृत्तीनाथांना उपदेश म्हणून नामदेवाच्या नांवावर जे अभंग आहेत ते खास घुसडलेले आहेत. सबंध ज्ञानेश्वरींत जागजागीं ज्ञानदेवानें आपल्या सद्‌गुरू निवृत्तीबद्दल जे विनयपूर्ण उद्‌गार काढलेले आहेत त्यावरून पाहतां 'अविधि आचरण परम दूषण । वेदो नारायण बोलिधेला । तसेंच कुळचा कुळधर्म अवश्य पाळावा । सर्वथा न करावा अनाचार ।' असा उर्मटपणाचा उपदेश आपल्या सद्‌गुरूला करण्याचा मूर्खपणा ज्ञानदेव करतील हें शक्यच नाहीं. नामदेवाच्या आदींतले अभंग नामदेव ह्यांचा परिचय होण्याच्या आधींचे असल्यामुळें त्यात इतिहासापेक्षां विकल्पनाच जास्त आहेत असें दिसतें. एकंदरींत, तत्कालीन विश्वसनीय अशा ऐतिहासिक माहितीच्या अभावीं आज ज्ञानदेवाच्या चरित्रासंबंधीं वाटेल त्या विद्वानानें आपल्या बुद्धीच्या जोरावर वाटेल ते तर्क व अनुमानें करावीं असा प्रसंग गुदरला आहे. ह्याचा एक नमुना म्हणून ज्ञानेश्वरांनी आजुबाजूची निराशेची परिस्थिति पाहून आत्महत्त्या केली, अशा आशयाचें डॉ. पेंडसे ह्यांनीं केलेलें विधान होय. अशा परिस्थितींत ज्ञानदेवाच्या चरित्रावर व त्यांच्या कामगिरीवर प्रकाश टाकणारें अगदीं विश्वसनीय ऐतिहासिक साधन म्हटलें म्हणजे त्यांनी लिहिलेली '**ज्ञानेश्वरी**' होय. त्या 'ज्ञानेश्वरींत' ग्रंथांवरून त्यांच्या चरित्राची जेवढी माहिती मिळेल तेवढीच सध्याच्या परिस्थितींत विश्वसनीय म्हणून मानणें श्रेयस्कर होय. ही माहिती ज्ञानेश्वरींतील ओव्यांच्या आधारानें व शक्याशक्यतेच्या कोटींत येतील अशा अनुमान पद्धतीवरच करणें, हें एकच आतां उपलब्ध साधन आहे. ह्या साधनाच्या जोरावरच ह्यापुढें ज्ञानेश्वरांच्या चरित्रावर अधिक प्रकाश पाडण्याचा ह्यापुढें प्रयत्न झाला पाहिजे.

द्विजीं घातलें वाळित । आप्तवर्गीं सांडिलें त्वरित ॥ अशा परिस्थितींत विठ्ठलपंत आणि रखुमाई ह्यांनीं बारा वर्षें काढलीं. त्यांचें तप पूर्ण झालें आणि ह्यानंतर दोन दोन वर्षांच्या अंतरानें त्यांना निवृत्ति, ज्ञानदेव, सोपान व मुक्ताबाई अशी चार नक्षत्रासारखीं मुलें झालीं. चांगले दिवस भरकन् जातात पण वाईट दिवस जातां जात नाहींत. विठ्ठलपंत व रखुमाई ह्यांना पहिली बारा वर्षें युगाप्रमाणें गेली. पण ही चार मुलें झाल्यानंतर मात्र त्या मुलांच्या लडिवाळ संगतींत हां हां म्हणतां काळ कसा गेला तो समजला नाहीं. मुलें जसजशीं मोठी होऊं लागलीं तसतशी त्या मुलांनाही ब्राह्मणांच्या जाचाची आंच बसूं लागली. ब्राह्मणांची मुलें त्यांच्या वाऱ्यासही उभीं राहात नसत. केव्हां केव्हां ब्राह्मणाच्या मुलांनीं त्यांची उघड उघड चेष्टा व टर उडवावी. आठ वर्षांचे निवृत्ति व सहा वर्षांचे ज्ञानेश्वर ह्यांनीं घरांत आईकडे कागाळी करावी 'हीं मुलें आमचीच कां चेष्टा करतात ?' 'आई, संन्याशाचीं पोरें म्हणजे ग काय ?' असे प्रश्न करून त्यांनीं आईबापांना भंडावून सोडायचें. ज्ञानेश्वरांचें आईवर विशेष प्रेम होतें. केव्हां केव्हां रखुमाईनें 'ज्ञानेश तूं असा त्रास दिलास तर मी निघून जाईन हं' अशी नाकासमोर बोट

धरून धमकी द्यावी. त्याबरोबर ज्ञानेश्वरानें आईच्या कंबरेला विळखा घालून तिला प्रेमानें घट्ट धरावें, केव्हां केव्हां आपल्या मुलांना होत असलेला जाच पाहून मुलें घरांत नसली कीं विठ्ठलपंत व रखुमाई ह्यांच्या गोष्टी चालत, ह्या गोष्टींच्या भरांत रखुमाईच्या डोळयांत अश्रु यायचे. इतक्यांत मुलानीं घरांत यावें व आईच्या डोळ्यांतील अश्रु पाहून ज्ञानेश्वरांनें ' आई तूं कां रडतेस ग ! ' असा प्रश्न करावा व ज्ञानदेव, सोपान, मुक्ताबाई ह्यांनीं चटकन् आईला बिलगून धरावें, असे अनेक प्रकार चालावयाचे. कुळंब्याच्या घरांत हीं चारही मुलें अत्यंत आवडीचीं झालीं. दगड्या, धोंड्या, बांक्या, भागू असा खालच्या समाजांतील त्यांच्या मित्रांचा परिवार वाढत चालला. एकदां रखुमाईनें ' ज्ञानेश काय रे ! सारा दिवस कुळंब्याच्या मुलांत फिरतोस ? असें म्हटलें त्यावर ' आई कुळंब्याचीं मुलं झाला तरी देवाचींच लेंकरं ना ! ' असें पोक्त उत्तर लडिवाळपणें द्यावें. चार मुलांत वक्तुत्व ज्ञानेश्वरांच्या अंगीं उत्तम होतें. निवृत्ति, ज्ञानदेव ह्यांना विठ्ठलपंतानी सर्व ग्रंथ पढविले. तो स्वतः व्युत्पन्न होता. त्यामुळें ज्ञानेश्वरींत उतरलेली सर्व व्युत्पन्नता त्यांना व निवृत्तींना वडिलांकडूनच मिळाली होती. वडिलांकडून मिळालेल्या ज्ञानाचा मराठींत अनुवाद करून रोज कुळंब्याच्या माळ्यांच्या परिवारांत सांगावा. ह्यामुळें त्या समाजांतील तरुण वृद्ध साऱ्या स्त्री पुरुषांचा घोळका ह्या चार मुलां भोंवती जमूं लागला. ह्या आनंदांत त्या चार मुलांना देखील ब्राह्मणांच्या जांचाची कांहीं क्षिती वाटली नाहीं. पण निवृत्तीला आठवें वर्ष लागल्याबरोबर विठ्ठलपंतांना त्याच्या मुंजीची काळजी पडली. ह्या काळजीतून पार पडण्यासाठीं आपण त्र्यंबकेश्वरी पुनश्चरण करावें अशी रखुमाबाईनीं इच्छा दर्शविली. वाटेवरच विठ्ठलपंत सर्व मंडळीसह आपल्या वडिलांचे गुरू गहिनीनाथ ह्यांच्या दर्शनास गेली. गहिनीनाथांनी विठ्ठलपंतास पुरश्चरण संपल्यानंतर निवृत्तीला माझ्याजवळ अनुग्रहास ठेऊन जा असें सांगितलें. त्याप्रमाणें ते परत येत असतां दुरून त्यांनीं एक वाघ पाहिला. त्याबरोबर विठ्ठलपंतांनीं निवृत्तीला गहिनीनाथांच्या गुहेजवळ पोंचवून ते घाईघाईनें बाकी सर्व मंडळीस घेऊन घरी आले. आळंदीस आल्यावर पुन्हा ज्ञानेश्वर, सोपान, मुक्ताबाई ह्यांनीं शेतकरी, धनगर, माळी ह्या आपल्या मऱ्हाठामंडळांत खेळून बागडून गप्पागोष्टी करून प्रसंगाविशेषी तेवढ्या लहान वयांत हितोपदेशाच्या गोष्टी सांगण्याचा आपला क्रम सुरू केला. त्या मराठा मंडळीचा प्रेमळ निष्कपटपणा, सरळभाव, श्रद्धा ह्यांचा ज्ञानेश्वराच्या मनावर अत्यंत परिणाम झाला. देवाची भक्ति ह्या मंडळींतच उत्कट आहे, सर्वभूतीं देव आहे हा भाव ह्यांच्यांतच भक्तीच्या द्वारे श्रद्धेच्या जोरावर वाढविता येण्यासारखा आहे, ह्या गोष्टी ज्ञानेश्वरांच्या चटकन लक्षांत आल्या. ह्या लोकांची सेवा हीच खरी देवसेवा हा प्रकाश त्यांच्या मनांत फांकला ती मुलें वाढत्या प्रेमानें ह्या कुळंब्याच्या समाजांत वाढूं लागली. केव्हां केव्हां ज्ञानेश्वर, सोपान, मुक्ताबाई जेवण्यास बसली असताच त्यांच्या बालमित्रांनीं त्यांना रस्त्यांतून हांका माराव्या. ती प्रेमाची हांक ऐकतांच तसेच जेवण अर्धे

टाकून त्यांनीं धांवत त्या मुलांच्या मागें जावें. केव्हां त्यांच्या घरीं [illegible] यांनीं दिलेल्या लाह्या गुळखोबरें ह्यावर मिटक्या देत ताव मारावा. केव्हां केव्हां त्या छोटे-खानी बालसेनेनें एकद्या वारकऱ्याची पताका घेऊन 'सांवळ्या विठोबा रखुमाई' ह्या नामघोषांत नाचत उडत भजन करावें. निवृत्तीनाथ गहिनीनाथांचा अनुग्रह घेऊन परत आले. त्यांनीं लगेच ज्ञानेश्वरांना उप-देश दिला. चार भावंडानी जग जिंकलें, जगानें चार भावंडाना आपलेसें करून टाकलें. पण इकडे विठ्ठलपंत व रखुमाई ह्यांची चिंता कांहीं दूर होईना. पूर्व-संस्काराच्या भावना अत्यंत प्रबळ असतात. आपल्या मुलांच्या मुंजी कशा होतील ह्याची त्यांच्या मनाला एक सारखी हुरहुर लागली.




## श्रीसाईबाबा शिरडी संस्थानांत विक्रीस असलेलीं पुस्तकें

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| (१) | श्रीसाईसच्चरित | (मराठी) | किंमत | रु. | ७—०—० |
| (२) | सच्चरित | (इंग्रजी) | ,, | ,, | ४—०—० |
| (३) | दासगणूकृत श्रीसाईनाथ—स्तवनमंजरी | | ,, | ,, | ०—२—० |
| (४) | ,, | (अध्याय ४) | ,, | ,, | ०—०—० |
| (५) | सगुणोपासना | | | | ०—३—० |
| (६) | प्रधानकृत पुस्तक (A glimpse of Indian spirituality) | | ,, | ,, | १०—०—० |
| (७) | श्रीसाई—लीलामृत | | ,, | ,, | २—०—० |
| (८) | श्री साई—सुमनांजली | | ,, | ,, | ०—१—० |
| (९) | कीर्तन—पंचक | (श्री साईलीलांनीं नटलेलें) | ,, | ,, | १—८—० |
| (१०) | शीलधी | (शिरडी वर्णन) | ,, | ,, | ०-१२-० |
| (११) | श्रीसाईबाबा—अवतार व कार्य | | ,, | ,, | २—०—० |
| (१२) | श्रीसाई गीतांजली | | ,, | ,, | ०—२—० |
| (१३) | हिंदी श्रीसाईसच्चरित | | ,, | ,, | ४—८—० |

**वरील पुस्तकें खालील पत्त्यावर मिळतील :—**

(१) सर कारकून, श्रीसाईबाबा शिरडी संस्थान, पोस्ट—शिरडी, जि. अहमदनगर.

(२) श्रीसाईबाबा शिरडी संस्थान, मुंबई ऑफिस : ईस्ट अँड वेस्ट इं. कंपनी बिल्डिंग, ४९।५५ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई १.

# तूं साई आमुची माई

( चाल–लावणी )

तूं पूर्ण ब्रह्म सुखधाम जगत्–सोयरा ।
गुरुराया हो, या सोडविं भवसागरा ।। धृ० ।।

गमविलें वृथा मी आयु अतां उमगलें ।
गुरुराया हो, तीं तारक तव पाउलें ।।

तूं साई आमुची माई आम्हि लेकरें ।
गुरुराया हो, मग दूर धरिसि कां बरें ।।

किति प्रपंच खटपट करूं हांव किति धरूं ।
गुरुराया हो, कां सांग अशामधिं मरूं ।।

मी हीन दीन अज्ञान सत्य ना कळे ।
गुरुराया हो, मन विषयीं रमलें खुळें ।।

झणिं कृतार्थ मजला करी रोष ना धरी ।
गुरुराया हो, मी पापी परि उद्धरी ।।

भडकल्या अग्नि ये मरण तृणाला जसें ।
गुरुराया हो, मम दोष जळावे तसे ।।

हुंदाडि वासरूं कास पयास्तव जरी ।
गुरुराया हो, कां गाय रुसे त्यावरी ।।

गणुदास बसुन हा दूर जोडितो करा ।
गुरुराया हो, या हरण करावें दरा ।।

—श्रीदासगणू महाराज

# गुरु आणि गुरुकृपा याविषयीं

# श्री साईबाबांची शिकवण

ना. वा. गुणाजी

**‘ सद्गुरुवीण ब्रह्मज्ञान ।
सर्वथा नव्हे, नव्हे जाण ’ ॥**

एकनाथी भागवत अ. १०–१०७.

**गुरूची आवश्यकता**—आम्हां आर्यांची अशी समजूत होती कीं, आणि आतांहि बहुतेकांची आहे कीं, कोणालाहि गुरुशिवाय आत्मज्ञान प्राप्त होणार नाहीं. साध्या व्यावहारिक शिक्षणामध्यें किंवा व्यवसायामध्यें, कोणी तरी शिक्षक अगर वाटाड्या लागतोच, हा आमचा नित्याचा अनुभव आहे. तेव्हां आध्यात्मिक किंवा पारमार्थिक ज्ञान संपादण्याचे कामीं गुरूची अत्यंत आवश्यकता आहे हें काय सांगावयास पाहिजे ! केवढाहि मोठा इसम का असेना किंवा प्रत्यक्ष ईश्वराचा अवतार का असेना त्यालाहि गुरुशिवाय तरणोपाय नाहीं असा जवळ जवळ सिद्धांतच आम्हीं मानीत आलों आहोंत, तरी कधीं कधीं गुरुची आवश्यकता आहे काय असा प्रश्न केव्हां केव्हां उत्पन्न होत असतो. याचें एक उदाहरण खालीं देत आहोंत.

**श्री. अण्णासाहेब दाभोळकर** ( हेमाडपंत ) भक्तश्रेष्ठ काकासाहेब दीक्षित यांनी श्री. दाभोळकरांना त्यांनीं श्री साईबाबांचें दर्शन घ्यावें असें पत्र लिहून आणि प्रत्यक्ष भेटींतहि आग्रह केला तेव्हां ते म्हणाले, मी दर्शनास जाईन पण गुरूचा उपयोग काय तें मला कळत नाहीं. पुढें, भक्तावतंस नानासाहेब चांदोरकर यांच्या आग्रहामुळें श्री. दाभोळकर शिर्डीस गेले. तेथें गेल्यावर श्री बाबांच्या दर्शनापूर्वीं त्यांचा आणि बाळासाहेब भाटयांचा मोठा कडाक्याचा वाद जुंपला. वादाचा मुख्य विषय ‘ गुरूची आवश्यकता ’ हा होता. श्री. दाभोळकरांचें म्हणणें थोडक्यांत असें होतें कीं, आपली स्वतंत्रता सोडून आपण परतंत्र कां व्हावें, आपण निजकर्तव्यांत दक्ष असलों तर गुरु कशास हवा, ज्याचें त्यानेंच सर्व कांहीं केलें पाहिजे न करी त्यास गुरु काय देणार, जो करील त्याचेंच सर्व आहे. आळशापरी बसून राहील तर कसें होईल ! ज्याचा उद्धार त्यानेंच केला पाहिजे. बाळासाहेब भाटे यांचें म्हणणें असें होतें कीं, होणार तें टळणार नाहीं, मी मी म्हणणारे भागून गेले, दैवापुढें कोण काय करणार, एक करावयाला जावें तों दुसरेंच होतें, तुमची चतुराई बाजूस ठेवा, अभिमानाचा कांहीं

उपयोग नाहीं इत्यादि. या प्रमाणें उभयपक्षकार अनेक साधकबाधक प्रमाणें देत देत तब्बल होत घटका वाद करीत राहिले, तरी वादाचा निर्णय कांहीं होईना. शेवटीं दमून आणि मनःस्वास्थ्य गमावून दोघांनीं वाद आटपता घेतला. पुढें सर्व मंडळी महाराजाकडे गेली. तेथें बसल्यावर बाबांनीं दाभोळकरांकडे तोंड करून काकासाहेबांना विचारलें, हा हेमाडपंत (याच नांवानें श्री. दाभोळकर पुढें प्रसिद्ध झाले) काय म्हणत होता? ' बाबा, आपणांस सर्व ठाऊकच आहे' असे काकासाहेबांनीं उत्तर दिलें. पुढें दुसरे दिवशीं मशिदींत पुनः काकासाहेबांनीं असें विचारलें कीं, ' वाट तर बिकट आहे, वाटेंत वाघ, रीस आहेत, पण वाटेंत वाटाड्या घेतला तर '—तेव्हां बाबा म्हणाले कीं,—वाटाड्या बरोबर असला म्हणजे कांहीं पंचाईत नाहीं, मग वाघ, रीस बाजूला होऊन जातात.' अर्थात् या संभाषणाचा परिणाम श्री. दाभोळकरांच्या मनावर बराच झाला आणि गुरूची आवश्यकता काय या आपल्या प्रश्नाचें उत्तर मिळालें असें त्यांना वाटलें. (श्रीसाईलीला. व. १–५ पान ४७)

## गोपाळराव देशमुख उर्फ व्यंकुसा बाबांचे गुरु

श्री साईबाबाचें गुरु कोण होते या विषयीं विचार करूं. बाबांनीं आपल्या मातापितरांविषयीं किंवा आतेष्टांविषयीं निश्चित अशी माहिती कोणालाच सांगितली नाहीं. तेव्हां या विषयीं प्रत्यक्ष माहितीच्या अभावीं अनुमानावरच अवलंबून राहणें भाग आहे.

बाबांचे चरित्रलेखक मुख्यतः दोघे आहेत (१) श्री. दत्तात्रेय गणेश सहस्रबुद्धे ऊर्फ दासगणू महाराज आणि श्री. गोविंद रघुनाथ दाभोळकर ऊर्फ हेमाडपंत. शिरडींत बाबांचें आगमन झाल्यापासून त्यांच्या निर्याणापर्यंतची कथा हेमाडपंतांनीं श्रीसाईसच्चरितांत वर्णन केलेली आहे. तसेंच श्रीदासगणू महाराजांनीं बाबांच्या चरित्राचा पूर्वकथाभाग अर्वाचीन भक्त व संत लीलामृत इत्यादि आपल्या ग्रंथांत चतुरस्र कल्पनेनें व आपल्या प्रासादिक वाणीनें वर्णिला आहे. बाबांच्या गुरुसंबंधीं हकीकत दासगणू महाराजांच्या ग्रंथाधारें संत निरंजन कृष्ण यांचें प्रवचन ऐकून श्री. रॉय किणीकर यांनीं सन १९५४–५५ सालीं प्रसिद्ध झालेल्या **द्वारकामाई** मासिकांत अंक १,२,३ शिरडीचे श्रीसाईबाबा —६–१५ प्रकरणांत प्रसिद्ध केलेली आहे. तसेंच १९५५ सालीं प्रसिद्ध झालेल्या कै. बी. व्ही. नरसिंहस्वामीच्या श्रीबाबांच्या इंग्रजी चरित्रग्रंथांतहि दासगणू महाराजांच्या ग्रंथाधारें, अध्याय २ यांतहि हकीगत आलेली आहे. या दोन्हीं लिखाणाच्या आधारें बाबांच्या गुरुविषयींची हकीकत येथें देत आहें.

निजामशाहींत मराठवाड्यांत जिंतुर परगण्यांत सेलु मानवत नांवाचा एक गांव आहे. तेथें शेवटच्या पेशव्यांच्या कालीं त्यांचे तर्फें काम पाहणारे श्री. गोपाळराव देशमुख या नांवाच्या एक सच्छील अधिकारी गृहस्थाकडे त्या गांवची देशमुखी होती. सारा वसुलीचें कामहि त्यांनाच करावें लागे. गोपाळराव आपलें काम फार उत्कृष्टरीतीनें करीत

असत. त्यांचें दातृत्वहि अलौकिक होतें. तिरुपतीचा **व्यंकटेश** किंवा **बालाजी** हें त्यांचें कुलदैवत. त्यामुळें यांच्या वाड्यांत स्वच्छता, सोंवळेपणा आणि शुद्धाचरण कसोशीनें पाळलें जाई. ते आपल्या कुलदेवतेची आणि इष्टदेवतेची श्री **व्यंकटेशाची** इतकी एकांतिक उपासना करीत आणि तिच्याशीं इतके तन्मय होऊन जात कीं, गोपाळरावांना **व्यंकटेश (अपभ्रंश व्यंकुसा)** असें म्हणत असत.

**एक विलक्षण प्रसंग**—एके दिवशीं गोपाळराव हे आपल्या–वाड्यापासून पांच मैल लांब असलेल्या आंबराईकडे सहल करावयास गेले होते. परत येतांना गढीच्या पायथ्याशीं महारवाड्यांत असलेल्या एका विहिरीवर धर्म्या चांभाराची माहेरकरीण एक जवान तरुण पोर गांवरान ओंवी गात पाणी ओढीत असलेली त्यांच्या दृष्टीस पडली. गोपाळरावाचें मन तिचेवर गेलें आणि ते लक्ष्यपूर्वक टक लावून एकसारखे तिच्याकडे पाहूं लागले. हें जेव्हां तिचे लक्ष्यांत आलें तेव्हां ती बिचारी ओशाळली, तिची ओंवी मध्येंच बंद झाली, आणि डोकीवरचा पदर सांवरून पाण्यानें भरलेली घागर घेऊन ती आपल्या घराकडे पसार झाली.

हा प्रसंग श्री. नरसिंहस्वामींनी आपल्या बाबाच्या चरित्रांत (पान १८) निराळ्या तऱ्हेनें वर्णिलेला आहे. तो असा–एके दिवशीं सायंकाळी गोपाळराव गढीच्या भिंतीवर बसले असतां, एक वीस वर्षांची सुंदर तरुणी त्या भिंतीच्या खालीं आली आणि तेथें कोणी नाहीं असें समजून ती आपलें शरीर उघडें टाकून बसली. तिचा तो उघडा पडलेला देह पाहून गोपाळरावांचें मन चलबिचल झालें, इत्यादि.

त्याच रात्रीं गोपाळरावांना एक स्वप्न पडलें. संध्याकाळीं विहिरीवर पाणी भरीत असलेली ती शूद्र तरुणी त्यांच्या स्वप्नांत दिसली. ते स्वप्नांत तिचा पाठलाग करूं लागले. बऱ्याच धांवाधावीनंतर ती जांभळ्या रानांत सांपडली. माथ्यावरचा तिचा माठ फुटला आणि पाठीवरची वेणी सुटली. आणि दोन्ही हातांनीं तोंड झांकून ती निपंचित पडून राहिली. गोपाळरावांचा एक हात तिच्या खांद्यावर पडला आणि दुसऱ्या हातानें त्यांनीं तिची हनुवटी उचलली. तेव्हां ती तरुणी केविलवाण्या नजरेनें पाहूं लागली. गोपाळरावानें विचारलें–कोण तूं? तुझा मी इतका वेळ पाठलाग केला, कोण तूं? त्या शूद्र तरुणीच्या डोळ्यांत आपल्या जन्मदात्या आईचें प्रतिबिंब पाहतांच गोपाळरावांनीं आर्त किंकाळी फोडली–आई! नरसिंहस्वामींच्या बाबांच्या जीवनचारित्र ग्रंथांत या स्वप्नाचा उल्लेख नाहीं. असो.

गोपाळराव स्वप्नांतून जागे झाले ते किंकाळतच उठले आणि ते तडक देवघराकडे धांवूं लागले. त्यांची मातोश्री व पत्नी याहि जाग्या होऊन त्यांच्या मागें धांवल्या, गोपाळराव देवघरात शिरून त्यांनीं देव्हाऱ्यांतला शंख उचलून. 'देवा, मला असले पापी डोळे कां दिलेस' असा टाहो फोडून त्यांनीं आपले दोन्हीं डोळे फोडून टाकले. गोपाळ, हें काय केलेंस असें मातोश्रींनीं विचारता, आई, मी माझ्या या पापी डोळ्यांना शिक्षा केली असें त्यांनीं सांगितलें.

पण, तें स्वप्न काय डोळ्यांनाच पडलें होतें ? डोळे फक्त पाहण्याचेंच काम करणार, मग तें स्वप्न कसें पडलें ? गोपाळरावांच्या अतृप्त आणि अज्ञात मनानें तें स्वप्न तयार केलें, त्या स्वप्नाच्या कामीं मनाचाहि फार मोठा भाग होता, म्हणून त्यालाहि शिक्षा देण्यासाठीं गोपाळरावांनीं संन्यासी व्हावयाचें ठरविलें, आणि ते विरक्त, विरागी आणि संन्यस्त झाले. आणि ते बद्रिकेदारच्या यात्रेला सपरिवार निघाले. बद्रिकेदार, काशी, प्रयाग, द्वारका जगन्नाथपुरी करीत करीत परत सेलूगांवाकडे वळतांना ते अहमदाबादेस उतरले. अहमदाबादेस सुहागशा अवलियाचा एक पुरातन दर्गा आहे. त्याच्या डाव्या खांद्याला एक जुनाट वटवृक्ष आहे, त्याचे खालीं गोपाळरावाचा मुक्काम पडला होता. दर्ग्याच्या ओसरीवर एक वृद्ध फकीर कबिराचा एक दोहा गात होता. त्या गोड दोह्यानें गोपाळराव आनंदानें जागे झाले आणि चालत जाऊन सुहागशाच्या कबरीवर आधार घेण्यासाठीं पडले. कबरीचा स्पर्श होतांच ते आनंदानें शहारून निघाले आणि उद्गारले कीं— सुहागशा, आतां मला नाहीं चालवत माझे हातपाय थकले आहेत, मन मुरगळलें आहे, हा माझा आयुर्दीप आतां विझत चालला इत्यादि.

गोपाळरावांची ती आर्तवाणी ऐकतांच कबरींतून अमृतवाणी निघाली—नाहीं, गोपाळ, बाहेरचें इंद्रियगोचर जग खरें नव्हे, अन्तर्यामीं खळाळणारें जगच खरें आहे. त्या आंतल्या जगाचा तूं स्वामी हो. ऐक गोपाळ, तूंच असे हात–पाय गाळलेस तर तुझ्या घरीं कबीरांनीं अवतार घेतला तर त्याचें संगोपन कोण करील ?

हें ऐकून आनंदानें प्रफुल्लित होऊन गोपाळराव म्हणाले, हे आई ऐकलंस काय हें ? तीर्थयात्रा नको, आतां आपण परत घरीं जाऊं या.

असह्य आनंदाच्या आवेगांत गोपाळराव सुहागशाच्या दर्ग्यांतून बाहेर पडले खरे, पण त्यांच्यानें एक पाऊलहि पुढें टाकवेना, त्यांना लगेच एक अघोर मूर्च्छा आली, ती तीन दिवस राहिली. त्या मूर्च्छेंतून जागे झाल्यावर त्यांच्या डोळ्यांना स्पष्ट आणि स्वच्छ दिसूं लागलें, आणि कानंलाहि स्पष्ट ऐकूं येऊं लागलें. त्यांचे डोळे उघडले ते प्रथम एका पणतीवर. एका अंधेऱ्या कोपऱ्यांत सारवलेल्या जागेवर ती पणती मिणमिणत होती. पणतींतून निघणाऱ्या तांबूस प्रकाशवलयांतून दोन दीनवाणे डोळे ( पितृशोकानें थोड्याच दिवसांपूर्वीं मयत झालेल्या त्यांच्या चिरंजीव लक्ष्मणरावाचे ते डोळे असावेत ) गोपाळरावाकडे टक लावून पहात होते. गोपाळरावांच्या स्थितप्रज्ञ निर्वेध दृष्टींतून जे अमृतकिरण बाहेर पडले त्या योगें लक्ष्मणरावांच्या वासनामय प्राणज्योतीला शांत केलें आणि तिला चिरनिद्रा लागली.

श्री. नरसिंहस्वामीच्या बाबांच्या जीवन चरित्र ग्रंथांत याविषयीं कांहीं निराळीच हकीगत दिलेली आहे. गोपाळरावांनीं जे आपले डोळे फोडून घेतले ते दोन तीक्ष्ण अणकुचीदार सुयांनीं टोचून घेतल्यामुळें त्यांतून रक्त वाहूं लागलें आणि ते अंध झाले. ( याचें चित्रहि दिलें आहे ). घरचे

सर्व आप्तेष्ट येऊन अशा क्षुल्लक गोष्टींबद्दल डोळ्यांना असें शासन देणें गैर आहे. असा त्यांना दोष दिला आणि जिंतुर परगण्याची व्यवस्था कोण पहाणार असें विचारलें. त्यांचे गुरुनीं (यांचें नांव दिलेलें नाहीं) दृष्टि मिळण्याबद्दल श्री **व्यंकटेशाची** प्रार्थना करण्यास सांगितलं आणि त्याप्रमाणें त्यांनीं प्रार्थना केल्यावर त्यांना परत दृष्टि लाभली.

सुहागशाच्या कबरींतून आनंदाश्रु निघाले आणि तींतून अशी वाणी निघाली कीं–गोपाळराव हे पूर्वी काशीचे रामानंद होते आणि आतां ते गृहस्थ आणि जमीनदार झालेले आहेत. तरीसुद्धां त्याचा पूर्वीचा शिष्य कबीर हा पुनः लवकरच त्यांचेकडे येणार आहे. द्वारकामाई मासिकाच्या अंकाप्रमाणें वर जी माहिती दिलेली आहे त्यांत याचा म्हणजे रामानंदस्वामीचा वगैरे उल्लेख नाहीं.

पुढें गोपाळराव यात्रेहून परत आले आणि आपलें जमीनदारीचें काम पूर्वीप्रमाणें पाहूं लागले. एक वर्षानंतर चि. लक्ष्मणरावांच्या वर्षश्राद्धासाठीं ते काकबली देत असतां एक बुड्ढी फकिरीण पाथरीहून झोळींत एक अमूल्य बोजा–मूल घेऊन आली आणि तें मूल आपल्या पतीच्या फकीराच्या आज्ञेप्रमाणें तिनें गोपाळरावांच्या हवालीं केलें. सुहागशा अवलियाच्या बोलाप्रमाणें बालकबीरच आपल्या घरीं आले आहेत असें त्यांना वाटलें आणि त्यांनीं त्याचें मोठ्या कौतुकानें आणि प्रेमानें संगोपन चालविलें. तें इतकें कीं, त्या बालकासाठीं गोपाळराव वेडे झाले. हा प्रकार त्यांच्या घरच्या मंडळीना आवडला नाही. गोपाळरावाच्या मेव्हण्यांनीं श्रीनिवासराव यांनी त्या मुलाचा कांटाच काढून टाकण्याचा बेत केला. कार्तिक वद्य एकादशीच्या रात्रीं एका बागेंत गोपाळराव पद्मासन घालून बसले होते; बाजूला तें बालक गाढ निद्रा घेत पडलें होतें. अशा वेळीं श्रीनिवासरावाच्या सांगण्याप्रमाणें परशा न्हाव्यानें त्या बालकावर नेम धरून एक अणकुचीदार दगड हाणला. पण तो नेम चुकला. तेव्हां श्रीनिवासरावानें झाडालगतच्या भंगलेल्या वृंदावनाची एक मोठी वीट काढली आणि ती त्या बालकाच्या रोखानें भिरकावली. पण याही खेपेस नेम चुकून ती बालकाला न लागतां गोपाळरावांच्या मस्तकाला लागली आणि त्यांचे मस्तकांतून रक्ताची धार उसळली.

नरसिंहस्वामीजीच्या ग्रंथांत पुढीलप्रमाणें फरक आहे. गांवच्या बदमाष लोकांनीं विटा फेकल्या. त्यांपैकीं एक त्या बालकाला लागणार होती. हें गोपाळरावांच्या लक्षांत आलें आणि त्यांनीं त्या विटेची गति रोखून ती अधांतरीं उभी केली. दुसऱ्या एका इसमानें आणखी एक वीट बालकाच्या दिशेनें फेंकली. तेव्हां गोपाळराव उठून मध्यें येऊन त्यांनीं ती वीट आपल्या मस्तकावर घेतली आणि त्यांना ती लागून त्यांच्या डोक्यांतून भळभळां रक्त वाहूं लागलें. आपल्या कपड्याचा एक तुकडा फाडून त्यांनीं ती जखम बांधली. (भंगलेल्या वृंदावनावर रोखलेली पताका फाडून त्या बालकानें गोपाळरावांची जखम बांधली आणि तेंच रक्तवर्ण फडकें गोपाळरावांनीं आपल्या जखमेवरून सोडलें आणि त्या

बालकाच्या डोक्याला बांधलें असें द्वारकामाई मासिकांतील लेखक म्हणतात.) आणि ते एकदम म्हणाले कीं, आतां तुझ्यापासून दूर होण्याची वेळ आली आहे. या जखमेसाठीं नव्हे, पण माझ्या स्वेच्छामरणाच्या योगशक्तीनें मी उद्यां दुपारीं ४ वाजतां माझा देह सोडणार आहें. याकरितां नजीक चरत असलेल्या कपिला गाईचें दूध घेऊन ये. छोटे बाबा तिकडे गेल्यावर हुल्ला लंबाडी म्हणाला कीं, ती गाय वांझ आहे, व्यालेली नाहीं. तरी त्यांनीं ती गाय ओढून आणलीच. गोपाळरावांनीं तिला शिंगापासून शेंपटीपर्यंत सासपून सांगितलें कीं, आतां स्तनाला हात घाला. तेव्हां त्या लंबाड्यानें पुष्कळ दूध काढलें. तें मंत्रून आणि आशिर्वाद देऊन त्या बालकाला पिण्यास दिलें. याप्रमाणें दीक्षा देऊन गोपळरावांनीं शक्ति निपातानें आपलें सर्व सामर्थ्य त्याच्या स्वाधीन केलें.

(ही शक्तिपाताची आणि सामर्थ्यदानाची दीक्षा कथा द्वारकामाई मासिकाच्या अंकांत नाहीं.)

पुढें दुसऱ्या दिवशीं त्यांनीं सांगितल्याप्रमाणें योग्य कर्मे, उपासना करून सुखानें आणि आनंदानें आपला देह ठेविला. हें करण्यापूर्वीं त्यानीं आपला हात पश्चिमेकडे वळवून सेलू सोडून पश्चिमेकडे आपल्या नूतन स्थानाकडे जाण्याची बाबाना खूणआज्ञा केली. शिरडी हें गोदातटाकीं पश्चिम बाजूस आहे आणि क्रमाक्रमानें अनेक गांवें ओलांडीत बाबा शिरडीस आले आणि तेथेंच कायम राहिले.

वर दिलेली कथा, काल्पनिक, असंभाव्य आणि विसंगत अशी दिसते. हेमाडपंतांचा श्री साईसच्चरित्र हा ग्रंथ श्री बाबांच्या सम्मतीनें आणि आशीर्वादानें तयार झाला आहे आणि त्यामुळें तो ग्रंथ साईबाबाच्या भक्तांना अधिकृत असा वाटतो. त्यांतील गुरुकथेशीं वरील कथा ताडून पाहतां वरील विधान अधिक स्पष्ट दिसतें. याविषयीं स्पष्टीकरणार्थ कांहीं उदाहरणें देतों.

(१) श्री साईसच्चरित्र या संबंध ग्रंथांत गुरूचें नांव गोपाळराव देशमुख ऊर्फ व्यंकुसा यांचा उल्लेख कुठेंहि आढळून येत नाहीं. गुरुविषयीं बाबांचे उल्लेख कांहीं ठिकाणीं आलेले आहेत, पण त्यांत गोपाळराव किंवा व्यंकुसा यांचा नामनिर्देश, तसाच त्यांच्या इष्टदेवतेचा **श्रीव्यंकटेश** किंवा **बालाजी** यांचाहि नामनिर्देश नाहीं, हें चमत्कारिक दिसतें.

(२) द्वारकाभाई मासिकाच्या अंकांत आणि श्री. नरसिंह स्वामीजींच्या ग्रंथांत जी कांहीं हकीगत दिलेली आहे तीवरून बाबांचा आणि त्यांचे गुरु गोपाळराव ऊर्फ व्यंकुसा यांचा सहवास फारच थोडा काळ घडून आला असें दिसतें. साईसचरितांतील कथा याचे विरुद्ध आहे. हेमाडपंत सच्चरितांत सांगतात कीं—

'तैसेच हे श्रीसाईनाथ। तरुण सोळा वर्षांचे वयांत ॥ निंबातळीं शिरडी गांवांत प्रथम भक्तार्थ प्रगटले ॥ (अ. ४–१११)' त्यावेळीं 'ते गोरे गोमटे अति सुंदर,' (११७) वैराग्याचा पूर्ण अवतार, आश्चर्य फार सकलिकां (१२३) असे होते. खंडोबा देव अंगांत आला असतां लोकांच्या प्रश्नावरून खंडोबा देवांनीं एक कुदळ आणविली आणि एका जागीं खणण्यास सांगितलें. तें खणून पहातां, 'मग तेथेंच त्या

गांव कुसा जवळीं। त्याच निंबवृक्षाचें तळीं ॥ मारितां कुदळीवर कुदळी। विटा ते स्थळीं आढळल्या ॥ (१२७) पुरा होता विटांचा थर। जात्याची तळीं सारितां दूर ॥ दृष्टीस पडलें एक भुयार। समया चार जळती जैं ॥ १२८ ॥ चुनेगच्ची तें तळघर। गोमुखी, पाट माळ सुंदर ॥ देव म्हणे बारा वर्षें हा पोर। तप आचरला ये स्थळीं ॥ १२९ ॥ या विषयीं लोक खोदखोदून जेव्हां विचारूं लागले तेव्हां बाबा—'म्हणे हें माझ्या गुरूचें स्थान। अति पवित्र हें माझें वचन ॥ आहे तैसेंच करा ज'न। माना मद्वचन एवढें ॥ १३१ ॥

दुसऱ्या एके ठिकाणीं बाबाच असें सांगतात—

"**बारा वर्षे** पायीं वसवटा।
केला गुरूनें लहानाचा मोठा ॥
अन्न वस्त्रासी नाहीं तोटा।
प्रेम पोटांत अनिवार ॥"—

(साईसच्चरित अ. १९. ६१)

खंडोबा देव आणि बाबा स्वतःच सांगतात कीं, त्यांना गुरूचा सहवास आणि आश्रय बारा वर्षें होता. यावरून द्वारकामाई मासिकांतील व नरसिंहस्वामीजीच्या चरित्रग्रंथातील हकीगत खरी व विश्वसनीय दिसत नाहीं.

## श्रीसाईबाबा हे अवतार कोणाचे ?

दुसरा एक मुद्दा या ठिकाणीं उपस्थित होतो, तो असा कीं, बाबा हे अवतार कोणाचे ? वर दिलेल्या द्वारकामाई मासिकाचे अंक आणि श्री. नरसिंहस्वामीजींचें बाबाचें जीवनचरित्र हा ग्रंथ, यांत दिलेल्या कथेवरून बाबा हे कबीराचे अवतार होते असें दिसतें. पण बाबा अवतार काय ?

श्रीसाईसच्चरित (इंग्रजी) या ग्रंथांत, आवृत्ति दुसरी, पान XX येथें असें प्रतिपादिलें आहे कीं, श्रीसाईसच्चरित अध्याय ५ यांतील भाईचें पादुकास्थापन आख्यान आणि अध्याय २६ यांतील हरिश्चंद्र पितळेची कथा, यावरून बाबा हे अक्कलकोटकर महाराज यांचे म्हणजे श्रीदत्ताचे अवतार होते. अलीकडे श्री. घोंड यांनी लिहिलेल्या आणि साईसंस्थान कमिटीनें प्रसिद्ध केलेल्या श्रीसाईबाबाच्या मराठी जीवन चरित्रांत या विधानालाच जोरदार पुष्टि दिली आहे.

शिवाय **बाबाना मान्य** असलेल्या त्यांच्या आरतींत (अध्याय ३३ पहा) चवथें कडवें असें आहे कीं—"कलियुगीं अवतार। सगुण ब्रह्म साचार। अवतीर्ण झालासे। स्वामी **दत्त दिगंबर** ॥"

## गुरुकृपा

बाबांनीं गुरुकृपा कशी संपादन केली आणि भक्तसाधकांनीं ती कशी करावी याविषयीं श्रीसाईसच्चरितांत (अध्याय १९) वर्णन आहे, त्याकडे आपण वळूं. अदमासें १९१७ सालीं साठे या नांवाचे एक गृहस्थ व्यापारधंद्यांत तोटा आल्यामुळें शिरडीस आले आणि त्यांनीं बाबांचें दर्शन घेऊन त्यांच्या पायीं लोटांगण घातलें आणि बाबांच्या अनुज्ञेनें गुरुचरित्राचा सप्ताह सुरू केला. सप्ताह संपतांच बाबांनीं त्यांना एक स्वप्न दृष्टान्त दिला. आपल्यासमोर साठ्यांना बसवून हातांत गुरुचरित्राची पोथी घेऊन ती वाचून

बाबा निरूपण करीत आहेत आणि साठे स्वस्थ चित्तानें ऐकत आहेत असा तो दृष्टांत होता. साठे यांना त्यामुळें आनंद होऊन त्यांनीं काकासाहेबांमार्फत या दृष्टान्ताचा अर्थ काय, गुरुचरित्राचा पाठ पुनः सुरू करावा किंवा तितकाच पुरा करावा असें बाबांना विचारलें. बाबांनीं सांगितलें कीं, आणखी एक आवृत्ति त्यानें करावी, त्याचें कल्याण होईल. या भाषणाच्या वेळीं तेथें हेमाडपंत हजर होते. त्यांनीं हें ऐकतांच त्यांच्या मनांत अशी वृत्ति उठली कीं, साठ्यांनीं सात दिवस सप्ताह केला, त्याला फळप्राप्ति झाली आणि मी आज चाळीस वर्षें पाठ करितों त्याचा कांहींच विचार नाहीं. एकाला सात दिवसांत फळ तर माझीं सात वर्षें निष्फळ! अंतर्ज्ञानी बाबानी ही वृत्ति ताबडतोब जाणली आणि त्याला म्हणाले कीं, तूं आतां उठ, शामा (माधवराव देशपांडे) कडे जा, त्याचेकडे क्षणभर गोष्टी करून दक्षिणेसहित त्याला घेऊन ये. त्याप्रमाणें हेमाडपंत तेथें गेले आणि श्यामानें त्यांना गोष्टी बोलतां बोलतां बाबांची अतर्क्य लीला गुरुकृपा याविषयीं कथा सांगितली. ती थोडक्यांत अशी— खाशाबा देशमुखाची म्हातारी आई राधाबाई ही संगमनेरच्या लोकांबरोबर शिरडीस आली आणि बाबांचें यथासांग दर्शन घेऊन समाधान पावली बाबानाच गुरु करून त्यांचेकडून कानमंत्र घ्यावा, आणि जों पर्यंत बाबा तो देणार नाहींत तो पर्यंत प्रायोपवेशन करावयाचें असा तिनें निर्धार केला आणि याप्रमाणें तिनें खाणेंपिणें वर्ज्य करून उतरलेल्या ठिकाणीं ती धरणें धरून बसली. तिची ही स्थिति पाहून मी तिची बाबापाशीं रदबदली केली. बाबानीं तिला आपले समोर बोलाविलें आणि मोठ्या प्रेमळपणें म्हटलें—हे आई, तूं हें धरणें कां घेतलेंस, तुला हें मरण कां आठवलें? तूं माझेकडे आपलें लक्ष दे आणि माझी नवलकथा ऐक, तुझें कल्याण होईल. माझा एक गुरु होता. तो कृपासागर मोठा अवलिया होता. मी त्याची सेवा करून थकलों, तरी तो मला कानमंत्र देईना. त्यानें माझ्याकडे दोन पैसे दक्षिणा मागितली. मी ती तात्काळ देऊन टाकिली. व्यावहारिक पैशांची कामना त्यांना मुळींच नव्हती, द्रव्यकांचन घेऊन त्यांना काय करावयाचें? त्यांनीं मागितलेले पैसे म्हणजे **निष्ठा** व **सबूरी** हेच होत. दुसरे नव्हत. मी माझ्या गुरुच्या पायांचा आश्रय एक **तप–बारा** वर्षें केला. मला गुरूनें लहानाचा मोठा केला. अन्नवस्त्रास तोटा नव्हता. त्यांच्या पोटीं अनिवार प्रेम होतें. त्याला शिष्याचा खरा जिव्हाळा, माझ्या गुरुसारखा गुरुच विरळा. मी अहोरात्र गुरुमुखावलोकन करीत असें, मला भूक तहान याची स्मृति नसे. त्याचेशिवाय ध्यान नाहीं, दुसरें लक्ष नाहीं. तेंच माझें अनुसंधान, अशी माझी गुरुपदी निष्ठा होती (एक पैसा दक्षिणा) आणि दुसरा पैसा दक्षिणा म्हणजे सबूरी. सबूरी म्हणजे धैर्य, दम किंवा धीर धरणें माझ्या गुरुच्या अपेक्षेप्रमाणें ही दोन दिडक्या दक्षिणा मी देऊन टाकिली. माझ्या गुरुनें यापेक्षां दुसरी कसली अपेक्षा केली नाहीं आणि माझी कधींहि उपेक्षा न करितां सदैव माझी रक्षा केली, मी कधीं त्यांचे पायापाशीं रहात असे, तर

कव्हां केव्हां दूर परदेशीं राही; पण त्याच्या प्रेमसुखाला मी कधीं अंतरलों नाहीं. हे माई, या मशिदींत ( द्वारकामाईंत ) बसून मी खरें सांगतों, तें तूं प्रमाण मान. माझ्या गुरुनें माझेच कान फुंकले नाहींत ( कानमंत्र दिला नाहीं ) तर मी तुझे कान कसे फुंकूं ? गुरुच्या कूर्म दृष्टीनेंच शिष्यावर अमृतवृष्टि होऊन त्याला स्वानंद सुखाचा लाभ होतो हें तूं नीट ध्यानांत ठेव. उगीच मंत्रतंत्राच्या भानगडींत पडूं नकोस, आतां जा आणि अन्नग्रहण कर आणि जिवाला उगाच अपाय करून घेऊं नकोस. ‘ येणेंप्रमाणें ती म्हातारी बोधितां । ठसली तियेच्या मनीं ती कथा ॥ ठेवूनि महाराजांचे पायीं माथा । व्रतनिवृत्तता आदरिली ॥ ’

याप्रमाणें ही समूळ कथा ऐकून, तिची समर्पकता आणि सार्थकता पाहून हेमाडपंतांना सानंद विस्मय वाटला. बाबांची ही लीला पाहून परमानंदानें त्यांचा कंठ दाटला, प्रेमोद्रेकानें त्यांना गहिंवर आला आणि त्यांचे अंतरीं सद्बोध ठसला. पुढें बाबांची त्यांचेवर कृपा झाली हें सांगणें नलगे.

**गुरु आणि गुरुकृपा**—याविषयीं आणखी एक ‘ निजगुरुदर्शनकारक, महाराज साईमुखीचें वचन ’ साईसचरित, अध्याय ३२ यांत सांगितलेलें आहे, तें आपण आतां पाहूं. येथें आरंभीच सांगितलें आहे, कीं ‘ जरी वेदवेदांग अध्ययन । केलें श्रुतिशास्त्र पारायण । गुरुकृपेवीण नाहीं ज्ञान । इतर तो शीण केवळ ’॥ १७॥

एकदां वनांत असतां, गुरुदर्शन कसें अकल्पित झालें, त्याची कथा बाबा स्वतःच सांगतात कीं, एकदां आम्हीं चौघेजण ज्ञानसंपन्न होऊन ब्रह्मनिरूपण करूं लागलों. ‘ उद्धरेदात्मनात्मानं ’ असें एकजण म्हणाला. दुसरा म्हणाला,—मन स्वाधीन तोच धन्य, याकरितां संकल्प—विकल्प—शून्य असावें, तिसरा म्हणाला कीं, सर्व सविकार अनित्य आहे, एक निर्विकार नित्य आहे म्हणून नित्यानित्य विचार करावा. चवथा (बाबा) म्हणाला कीं पुस्तकीज्ञान व्यर्थ आहे, विहिताचरण करावें, गुरुचरणीं कायावाचा पंचप्राण समर्पण करावें; ‘ गुरु परमात्मा चराचर । भरला असे सबाह्याभ्यंतर । ऐसा व्हावया निज निर्धार । निष्ठा अपार आवश्यक ( ४२ ) ’ या प्रमाणें वादविवाद करीत आम्हीं चौघे स्वबुद्धीनेंच ईश्वराचा शोध लावण्यासाठीं वनांत निघालों. वाटेंत एक वणजारी भेटला आणि त्यानें चौकशी केली कीं, अशा प्रखर उन्हांत किमर्थ आणि कोठवर आपण चालला ? वनवनांतर धुंडावयास, असें आम्हीं सांगितलें. कशाचा शोध लावितां ? असें त्यानें विचारतां आम्हीं त्याला उडवाउडवीचें उत्तर दिलें. तें ऐकून त्या वणजरीचा जीव कळवळला आणि तो म्हणाला कीं, वाटाड्यावीण भर दुपारी वनीं असे सायास कां करावे, तुम्हीं तुमचें गुपित सांगूं नका, पण भाकर तुकडा खा, पाणी प्या आणि नंतर चला. आम्हीं त्याची विनंति मान्य न करितां तसेच पुढें निघालों. आम्हीं बुद्धिमान्, आम्हांला वाटाड्या कशास हवा असा अभिमान आमच्या पोटीं होता. पण तें रान अति विस्तीर्ण, सूर्य किरणांचा तेथें अभाव, त्यांमुळें दिशाभूल होऊन भ्रमण करून दैवयोगानें पुनः पूर्वीच्या ठिकाणीं आम्हीं आलों. रित्या पोटीं शोध लागत नाहीं, देऊं नये अन्नासी पाठ, वाढिलें ताट डावलूं नये, इतकेंच नव्हे तर भाकरतुकडा कोणी

दिला तर कार्य निर्विघ्नकारक पूर्ण शकुन आहे असें मानावें असा अनुभव आला. वणजारीनें पुनश्च आमचें स्वागत केलें आणि म्हटलें की, किंचित् धीर धरा आणि अल्पाहार करा. त्यांना हा सुविचार रुचला नाहीं, शोध लाविल्यावांचून अन्नसेवन नाहीं असे दुराग्रहानें म्हणून पुनः ते निघाले. मला भूक लागली होती, तृषेनें कंठ कोरडा पडला होता, तेव्हां त्या वणजाऱ्याचें अलौकिक प्रेम पाहून मला कौतुक वाटलें आणि त्यानें दिलेली भाकर खाऊन पाणी प्यालों. तो काय चमत्कार सांगावा. एकदम अकल्पित गुरुराज आले आणि वादावादी कसली अस म्हणाले. मी त्यांना घडलेला वृत्तान्त निवेदन केला. तेव्हां माझेबरोबर येतां काय, मी शोध त्वरित लावून देतों, असें ते म्हणाले, इतरांनीं तें मानिलें नाहीं. पण मी तें शिरसामान्य केलें, इतर सर्व निघून गेले आणि गुरुरायानें मला आपल्याबरोबर घेतलें आणि एका विहिरीवर नेलें. आणि पायांस दोर बांधून 'वरती पाय खालती शिर' करून पाण्यावर सोडिलें. पाण्यास हात पोहोंचू नयेत, पाणीहि मुखांत जाऊं नये असें अलग लोंबत विहिरींत सोडिलें. जवळच कांठावर एक झाड होतें, त्याला दोरीचें दुसरें टोक बांधून गुरुराय निःशंक असें कुठें गेले कोणास ठाऊक. दहाबारा घटका गेल्यावर ते माघारे परतले आणि मला झरझर बाहेर काढून विचारलें कीं, तूं बरा आहेस ना ? मी अत्यंत आनंदनिर्भर होतों, जें अपार सौख्य भोगिलें तें मी पामर काय वानूं असें मी उत्तर दिलें. तें ऐकून गुरुराय सुखसंपन्न झाले, आपला हात माझे अंगावर फिरवून मला जवळ ठेवून घेतलें. हें सर्व सांगूं लागलों तर प्रेमाचें उमाळे येतात. मग गुरूनें मला आपल्या शाळेंत नेलें. पक्षिणी आपल्या पिलांसाठीं जशा कळवळतात तसें माझेवर त्यांचे प्रेम होतें, माझ्या गुरूची शाळा किती गोड म्हणून सांगूं! जनकजननीचा लळा सुटला, मोहममतेची शृंखला तुटली लीलेनें मला मुक्ति मिळाली. सगळा दुरापाश सुटला, प्रवृत्ति–प्रतिबंध अर्गळा भंगली आणि या गुरूच्या गळ्यांत गळा घालून त्याला डोळ्यांत बसवावें. त्याचे प्रतिबिंब डोळ्यांत नसेल तर तो शुद्ध मांसाचा गोळा, त्याहून आंधळा बरा मी, अशी ही माझी शाळा झाली. "लागतां या शाळेस पाय। कोण हतभागी माघारा जाय। माझें घरदार बापमाय। सर्वचि गुरुराय जाहले" (७९)

ही जी सर्व कथा सांगितली आहे, ती म्हणजे चौघे सुबुद्ध, त्यांचा वाद, ईश्वर शोधार्थ भ्रमण, वन, वाटाड्या वणजारी, गुरुराज वगैरे शब्दशः घेऊन चालणार नाहीं. ती कथा रूपकात्मक किंवा अलंकारिकच मानली पाहिजे. विशेषतः गुरुराजानें बाबाकडून जी प्रक्रिया म्हणजे 'वरती पाय खालती शिर'—पाण्यावरचें लोंबतें शीर्षासन—करून घेतल त्यावरून हें सिद्ध होतें. याविषयीं स्वतः बाबाहि असें म्हणतात कीं—" खालीं डोकें वरती पाय। टांगी उफराटें जैं गुरुराय। तैं मज आनंद कैसा होय। समर्थ गुरुमाय जाणाया (९०)॥ संतां घरची उलटीच खूण। हें तों अनुभवजन्य ज्ञान। एथें निष्ठाच एक प्रमाण। एक साधन गुरुकृपा ॥ ९१ ॥ हें अनुभवजन्यज्ञान असल्यामुळें या विषयीं अधिक लिहितां येत नाहीं.

"**गुरु परमात्मा चराचर। भरला असे सबाह्याभ्यंतर**" असे जे बाबांचे उद्गार वर दिले आहेत, त्यांशीं समानार्थक अरुणाचलाचे **श्रीरमण भगवान्** यांचे विचार देऊन हें प्रकरण पुरें करितों. **भगवान्** सांगतात कीं, आत्मा (परमात्मा) हाच खरा गुरु, सद्‌गुरु आहे. मनुष्य संसारांतील दुःखानें गांजला म्हणजे तो तिकडून निवृत्त होऊन परमात्म्याचें स्मरण आणि प्रार्थना करूं लागतो. तेव्हां त्याची चित्तशुद्धि होऊन आपल्या वासना तृप्त करून घेण्याऐवजीं तो ईशदर्शना-विषयीं उत्सुक होतो. अशी स्थिति प्राप्त झाली म्हणजे आत्मकृपेचा प्रादुर्भाव होऊं लागतो. तेव्हां परमेश्वर गुरूच्या रूपानें त्याला भेटतो, आणि त्याला सदुपदेश करतो. यामुळें व गुरूच्या सहवासामुळें त्याचें चित्त संसारापासून निवृत्त होऊन अंतर्मुख होऊं लागतें. गुरु दोन प्रकारचे असतात. एक बाह्य गुरु आणि अंतर्गुरु. बाह्यगुरु त्याच्या चित्ताला आंत लोटतो आणि अंतर्गुरु त्याचे चित्त जोरानें आंत ओढतो. जोपर्यंत आपली देहात्मबुद्धि थोडयाबहुत प्रमाणांत कां होईना, कायम असते तोंपर्यंत बाह्य गुरुची आवश्यकता असते. पण ती जेव्हां पार नाहींशीं होते तेव्हां अंतर्गुरु म्हणजे आत्मापरमात्मा हाच खरा गुरु–सद्‌गुरु होय असा अनुभव येतो.

'**श्रीगुरुमहाराजकी जय**

---



* जगांतील सर्वांत दिवाळखोर माणूस म्हणजे ज्याचा उत्साह नष्ट झाला आहे तोच. माणसाचें सर्वस्व गेलें, उत्साह खेरीज करून बाकी सर्व नष्ट झाल, तरी तो पुन्हा सर्व अडचणींवर मात करून यशस्वी होईल.

—**एच्. डब्ल्यू. अर्नोल**

# श्रीरामकृष्ण आणि विद्यासागर

पं. ईश्वरचंद्र विद्यासागर यांना भेटण्यासाठीं श्रीरामकृष्ण परमहंस मुद्दाम होऊन गेले होते. एक व्यासंगी पंडित आणि दुसरा साक्षात्कारी महात्मा—यांच्या भेटीचा व संवादाचा प्रसंग 'एम्' यांनीं आपल्या ग्रंथांत अत्यंत सुरस शैलीनें वर्णन केला आहे. त्या वर्णनाचा श्री. मंडणमिश्र यांनीं केलेला अनुवाद येथें दिला आहे....

श्रीरामकृष्ण यांचें जन्मस्थान असलेल्या कामारपुकूर नजीक बीरसिंग या खेड्यांत पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर यांचा जन्म झाला. एक थोर व्यासंगी विद्वान्, शिक्षणतज्ज्ञ, लेखक आणि समाज सेवक अशा विविध नात्यांनीं ते विख्यात होते.. आधुनिक बंगालीचे ते जनक होत. शिवाय संस्कृत काव्य आणि व्याकरण यांमध्यें ते पारंगत होते. त्यांच्या औदार्यामुळें त्यांचें नांव सर्वतोमुखीं झालेलें होतें. त्यांना जी कांहीं प्राप्ति होई तिचा बहुतेक भाग गतभर्तृका, अनाथ, अपंग, गरजू विद्यार्थी आणि इतर याचक यांना देण्यांत खर्च होत असे. त्यांची दयावृत्ति ही मानवापुरतीच मर्यादित नव्हती. वासराचें दूध आपण तोडणें चांगलें नव्हे या भावनेनें त्यांनीं कित्येक वर्षें दूध वर्ज्य केलें होतें. घोड्यांना श्रम होतात म्हणून ते घोड्यांच्या गाडींत कधीं बसत नसत. ते स्वभावानें मोठे बाणेदार होते. अधिकाऱ्यांशीं कांहीं कारणामुळें पटलें नाहीं म्हणून कलकत्त्याच्या संस्कृत कॉलेजांतल्या मोठ्या पगाराच्या नोकरीवर त्यांनीं लाथ मारली, पण आपला बाणा सोडला नाहीं. त्यांचें आपल्या आईवर अमर्याद प्रेम होतें. त्यांच्या भावाचें लग्न झालें तेव्हां त्या लग्नाला यांनीं हजर असावें अशी त्यांच्या आईची फार इच्छा होती. ते लग्नाला निघाले. वाटेंत नदी लागली. तीपलीकडे जायला त्यावेळीं तर मिळाली नाहीं तेव्हां तर नाहीं म्हणून लग्नाला जाण्याचा बेत रद्द न करतां, आईची इच्छा पूर्ण करण्यासाठीं ते पोहून नदीपार झाले आणि भावाच्या लग्नाला हजर राहिले. त्यांचें सबंध जीवन म्हणजे साधेपणाचा मूर्तिमंत आदर्श असें होतें. त्यांच्या प्रगाढ विद्वत्तेमुळें त्यांना 'विद्या—सागर' ही यथार्थ पदवी प्राप्त झाली होती.

## लोकविलक्षण पुरुष

विद्यासागरना भेटायला जाण्याची श्रीरामकृष्ण यांची बऱ्याच दिवसांपासून

इच्छा होती. एम्. हा त्यांच्याच शाळेंत शिक्षक आहे असें कळल्यावर भगवान् एकदां एम्‌ला म्हणाले, ' तूं मला विद्यासागरांकडे घेऊन जाशील का ? त्यांना भेटावें असें माझ्या फार मनांत आहे.' एम्‌नें भगवानांची ही इच्छा विद्यासागरना बोलून दाखविली. तेव्हां एखाद्या शनिवारीं दुपारीं चार वाजतां एम्‌नें भगवानांना आपल्याकडे घेऊन यावें, असें मोठ्या आनंदानें त्यांनीं त्याला सांगितलें. ते एम्‌ला म्हणाले, ' हे परमहंस कसे काय आहेत ? यांनीं भगव्या वस्त्राची दीक्षा घेतलेली आहे काय ? ' एम् म्हणाला, ' नाहीं. तो अगदीं लोकविलक्षण पुरुष आहे. तांबड्या कांठांचें धोतर ते नेसतात. पायांत सफाईदार पॉलिशचे स्लीपर घालतात. राणी रासमणीच्या देवळाच्या बागेंतील एका खोलींत ते राहातात. त्यांच्या खोलींत गादी, मच्छरदाणी असलेला पलंग आहे. साधुत्वाचें कोणतेंहि बाह्य लक्षण त्यांच्यामध्यें आढळत नाहीं. पण ईश्वराव्यतिरिक्त त्यांना दुसरें कांहींहि ठाऊक नाहीं. दिवसरात्र एका परमेश्वराचेंच अखंड चिंतन ते करीत असतात.'

५ ऑगस्टला दुपारीं एका घोडागाडींतून भावनाथ, एम्. आणि हाझरा यांच्यासह भगवान् दक्षिणेश्वरहून निघाले. मध्यें कलकत्त्यांत बदुरबगनमध्यें विद्यासागर राहात होते. दक्षिणेश्वरपासून हें ठिकाण सहा एक मैलांवर होतें. जातांना वाटेंत श्रीरामकृष्ण गप्पा मारीत होते. पण विद्यासागरांच्या घराच्या जवळ जवळ गाडी आली तसा त्यांच्या वृत्तींत एकदम फरक पडला. दिव्यानंदानें त्यांचें शरीर आनखशिखान्त पुलकित झालें. एम्‌च्या हें ध्यानांत आलें नव्हतें. त्यानें बोट दाखवून राजा राम मनोहर रॉय यांचें राहाण्याचें ठिकाण दाखविलें. भगवानांना तें रुचलें नाहीं. ते म्हणाले, 'आतां असल्या गोष्टींकडे माझें चित्त लागत नाहीं.' ते दिव्यानंदांत मग्न होत होते.

विद्यासागरांच्या घरापुढें गाडी थांबली. एम्. नें हात देऊन भगवानांना खालीं उतरविलें. नंतर वाट दाखवायला एम्. पुढें झाला. आंगणांत अनेक फुल झाडें होतीं. आंगणांतून घराकडे जातांना आपल्या सदऱ्याच्या गुंडीकडे बोट दाखवून लहान मुलासारखे भगवान् एम्‌ला म्हणाले, ' माझ्या सदऱ्याची गुंडी लावलेली नाहीं. विद्यासागरना त्यामुळें राग येईल का ? '

एम्. म्हणाला, ' छे छे ! आपण त्याबद्दल काळजी करूं नका. आपल्या कोणत्याच गोष्टीनें त्यांना राग यायचा नाहीं. आपण गुंडी लावली नाहीं तरी चालेल.' हें ऐकल्यावर त्यांचें लहान मुलाप्रमाणें समाधान झालें.

## सागराची भेट झाली !

विद्यासागर सुमारें बासष्ट वर्षांचे होते. म्हणजे भगवानांपेक्षां ते सोळासतरा वर्षांनीं वडील. इंग्रजी पद्धतीनें बांधलेल्या एका दुमजली बंगल्यांत ते राहात. बंगल्याच्या चारी बाजूंना बाग आणि सभोंवार उंच भिंत होती. जिना चढून वर गेल्यावर श्रीरामकृष्ण व त्यांचे भक्त हे शेवटच्या टोंकाकडील खोलींत शिरले. समोरच विद्यासागर बसलेले होते. त्यांच्यासमोर एक मेज होतें. मेजाच्या उजव्या बाजूला एक

बांक होतें. दुसऱ्या दोन बाजूंना असलेल्या कांहीं खुर्च्यांवर त्यांचे पाहुणे बसलेले होते.

श्रीरामकृष्णांचें स्वागत करण्यासाठीं विद्यासागर उठून उभे राहिले. श्रीरामकृष्ण एक हात टेबलावर ठेवून त्या बांकासमोर उभे राहिले. जणूं कांहीं एकमेकांची पूर्वीची ओळख असल्यासारखे ते विद्यासागरांकडे टक लावून पाहात उभे राहिले. अर्धवट भावावस्थेंत जाऊन त्यांनीं स्मितहास्य केलें. त्या अवस्थेंत ते कांहीं क्षण तसेच उभे होते. मधूनमधून आपलें मन पूर्ववत् व्यावहारिक पातळीवर आणण्यासाठीं ते म्हणत, 'मला थोडें पाणी प्यायला हवें आहे.'

एवढ्या अवधींत घरांतील इतर तरुण मंडळी आणि विद्यासागरांचे कांहीं आप्तेष्ट तिथें जमले. भावावस्थेंतच श्रीरामकृष्ण बांकावर बसले. विद्यासागराकडे आपल्या शिक्षणासाठीं मदत मागायला आलेला सतरा अठरा वर्षांचा एक तरुण त्याच बांकावर बसला होता. त्या मुलापासून थोड्या अंतरावर भगवान् बसले. बसतांना ते भावावस्थेंत पुटपुटले 'आई ! हा मुलगा संसारांत पुरा गुरफटलेला आहे. तुझ्या अविद्यामायेच्या राज्यांतला हा मुलगा आहे.'

विद्यासागरनीं कोणाला तरी हांक मारून पाणी आणायला सांगितलें. ते एम्. ला म्हणाले, 'हे कांहीं मिठाई वगैरे घेतील का ?' एम्. नें 'कांहीं हरकत नाहीं' असें म्हटल्यावर ते स्वतःच अगत्य-पूर्वक आंत गेले आणि मिठाई घेऊन बाहेर आले. ती मिठाई भगवानांसमोर ठेवली. भावनाथ व हाझरा यांनाहि मिठाई दिली. एम्. पुढें मिठाई केली तेव्हां विद्या-सागर म्हणाले, 'अरे ! तो घरांतल्या सारखाच आहे. त्याची नको काळजी करायला.'

एका तरुण भक्ताचा उल्लेख करून भगवान् म्हणाले, 'तो चांगला उमद्या अंतःकरणाचा तरुण आहे. फल्गु नदीसारखा आहे तो. पृष्ठभागावर वाळूच दिसते सगळीकडे. पण थोडें खणलें कीं खालीं पाण्याचा प्रवाह आढळतो.'

थोडी मिठाई घेऊन भगवान् स्मित-पूर्वक विद्यासागरांशीं बोलूं लागले. एव्हांना सबंध खोली माणसांनीं भरून गेली होती. कांहींजण बसलें होते, कांहीं उभे होते.

**भगवान्**—'ठीक ! आज अखेरीस मी सागरापर्यंत येऊन पोंचलों. आतांपर्यंत मी कालवे, दलदली फार तर नद्या यांचें दर्शन घेतलें होतें. पण आज मात्र प्रत्यक्ष सागराचें दर्शन घडलें ( सर्व हंसतात. )

**विद्यासागर**—( हंसून ) 'मग कृपा करून थोडें खारें पाणी घरीं घेऊन जा.'

**भगवान्**—'छे छे ! खारें पाणी काय म्हणून ? तुम्ही कांहीं अविद्येचे सागर नव्हेत. तुम्ही तर आहांत विद्यासागर–क्षीरसागर.' ( सर्व हंसतात. )

**विद्यासागर**—'हां ! तसें वाटलें तर म्हणा.'

पंडित गप्प झाले. श्रीरामकृष्ण म्हणाले, 'तुमचें सर्व कार्य सत्त्वगुणानें प्रेरित झालेलें आहे. कार्यें राजसिक असलीं तरी त्यांची मूळ प्रेरणा सत्त्वगुणाची आहे. दयावृत्ति ही सत्त्वगुणांत जन्म पावते. दुसऱ्यांचें भलें करण्याचें कार्य रजोगुणात्मक असलें तरी त्याचा आधार सत्त्वगुण असल्यामुळें त्यापासून अपाय होत नाहीं.

लोकांना धर्मज्ञान देण्यासाठीं त्यांना ईश्वराचें ज्ञान देण्यासाठीं शुकादि मुनींच्या अंतःकरणांत दयार्द्रबुद्धीचा वास करीत होता. तुम्ही अन्नदान आणि ज्ञानदान करीत आहांत, तेंहि चांगलें आहे. हें कार्य निःस्वार्थी बुद्धीनें केलें म्हणजे तें ईश्वराला पोंचतें. पण बहुतेक माणसें कीर्ति किंवा पुण्यसंपादन हा हेतु धरून आचरण करीत असतात. त्यांच्या कृति स्वार्थनिरपेक्ष नसतात. शिवाय तुम्ही अधिक सिद्ध आहांत.'

**विद्यासागर**—'तें कसें काय महाराज ?'

**भगवान्**—(हंसून 'बटाटे आणि इतर भाज्या चांगल्या शिजल्या, सिद्ध झाल्या म्हणजे त्या मृदु आणि लुसलुशीत होतात. तुमचा स्वभाव तर कमालीचा मृदु आहे. तुमच्या दयाशीलतेला सीमा नाहीं'

**विद्यासागर**—(हंसून)—'पण कलाई डाळीचें पीठ उकडलें म्हणजे तें मृदु न होतां उलट कठीण बनतें.'

**भगवान्**—'पण तुम्ही त्या जातीचे नव्हेत. नुसते पंडित हे किडलेल्या फळांसारखे असतात. अशीं फळें नुसतीं अधिकाधिक घट्ट होत जातात. तीं कधीं पिकायचीं नाहींत. हिरव्या फळांचा ताजेपणा किंवा पक्व फळांची गोडी हीं दोन्ही अशा किडक्या फळांत आढळून येत नाहींत. गिधाडें आकाशांत दूरवर उंच उडतात, पण त्यांची दृष्टि असते जमिनीवर कुठें सडकें प्रेत आढळेल त्याच्यावर. नुसत्या पुस्तकी पंडितांची शहाणे म्हणून ख्याति असली तरी ते कामिनीकांचनावर आसक्त असतात. गिधाडांसारखी त्यांनाहि सडक्या मांसाचीच आसक्ति असते. ते अविद्येच्या जगांत गुरफटलेले असतात. दया, भक्ति आणि त्याग हीं खऱ्या ज्ञानाचीं उज्ज्वल भूषणें होत.'

विद्यासागर स्तब्ध राहून हे शब्द ऐकत होते. बाकीचे लोकहि भगवानांकडे टक लावून, कान देऊन त्यांचा उपदेश ग्रहण करीत होते.

दुसऱ्यांना धर्मशिक्षण देण्याच्या बाबतींत विद्यासागर सदैव मौन पाळीत. त्यांनी हिंदु तत्त्वज्ञानाचा अभ्यास केलेला होता. एकदां एम्.नें त्यांना त्याविषयीं विचारलें. तेव्हां ते म्हणाले होते, 'मला वाटतं आपल्या मनांत नेमकें काय आहे हें स्पष्ट करून सांगण्यांत तत्त्वज्ञांना यश आलेलें नाहीं.' रोजच्या जीवनांत मात्र ते सर्व हिंदु आचार कटाक्षानें पाळीत. ते ब्राह्मण्यनिदर्शक जानवेंहि घालीत. ईश्वराविषयीं ते एकदां म्हणाले होते, 'ईश्वराला जाणणें हें खरोखरी अशक्य आहे. मग आपलें कर्तव्य कोणतें ? आपण अशा पद्धतीनें जगावें कीं, इतरांनीं आपलें अनुकरण केलें तर याच पृथ्वीवर स्वर्ग अवतरेल. असें जीवन जगणें हें आपलें कर्तव्य असें मला वाटतें. प्रत्येकानें जगाचें भलें करण्याचाच उद्योग सदैव करावा हें युक्त होय.'

## ब्रह्माचें वर्णन

आतां ब्रह्मज्ञान या विषयाकडे श्रीरामकृष्णांच्या संभाषणाचा ओघ वळला होता. ब्रह्म हें विद्या आणि अविद्या यांच्या पलीकडे आहे. ज्ञान आणि अज्ञान यांच्या द्वैताचा भ्रम असतो. ज्ञान आणि भक्ति

व कामिनी कांचनाची आसक्ति हीं आपल्याला जीवनांत आढळतात. पाप व पुण्य, चांगलें आणि वाईट " द्वैत आपल्याला दिसतें. पण ब्रह्म या सर्वांहून अलिप्त आहे. चांगलें—वाईट हा जीवाचा गुण आहे. जीवात्म्याचे ते विशेष आहेत. पाप—पुण्यांचा लेप फक्त जीवात्म्याला लागत असतो. ब्रह्म हें या सर्वांच्या अतीत आहे.

'दिव्याच्या उजेडांत एक माणूस भगवद्गीता वाचील, तर त्याच उजेडांत दुसरा एखादा माणूस खोटी सही गिरवील. पण या कृत्यांचा लेप त्या दिव्याला लागत नाहीं. सूर्य आपला प्रकाश सज्जन आणि दुर्जन या दोहोंना सारखाच देत असतो.

'तुम्हीं विचाराल, 'मग दुःख, कष्ट आणि पाप यांची उपपत्ति कशी लावायची ? या प्रश्नाचें उत्तर असें कीं, यांचा लेप फक्त जीवात्म्यावर होतो. ब्रह्म अलिप्त आहे. सापांत विष असतें. इतर लोकांना साप चावला म्हणजे ते मरतात परंतु खुद्द त्या सापावर मात्र स्वतःच्या विषाचा कांहींच परिणाम होत नाहीं.

'ब्रह्म कसें आहे याचें वर्णन करतां यायचें नाहीं. या जगांतील एकूण एक गोष्टी—वेद, पुराणें, तंत्रें, षड्दर्शनें—दोष—पूर्ण आहेत. जिभेनें स्पर्श केलेलें अन्न जसें उष्टें होतें तशीं हीं सर्व शास्त्रें जिभेनें उच्चारलेलीं असल्यामुळें 'उष्टीं' झालीं आहेत. पण हा दोष एकट्या ब्रह्माला मात्र लागलेला नाहीं. कारण 'ब्रह्म अमुक' असें सांगणें आजपर्यंत कोणालाहि शक्य झालेलें नाहीं.'

**विद्यासागर**—( आपल्या मित्रांना उद्देशून ) 'वा ! हे मोठे विलक्षण शब्द आहेत. आज मी कांहींतरी नवें शिकलों.'

**भगवान्**—'एका माणसाला दोन मुलगे होते. बापानें मुलांना ब्रह्मविद्या शिकण्यासाठीं गुरुकडे पाठविलें. कांहीं वर्षांनीं दोघेहि गुरुगृहवास संपवून परत घरीं आले. आल्यावर त्यांनीं बापाला नमस्कार केला. त्यांचें ब्रह्मज्ञान कितपत सखोल आहे हें पाहाण्यासाठीं बापानें वडील मुलाला विचारलें, 'बाळ ! तूं सर्व शास्त्रें पढलास, ब्रह्माचें स्वरूप कसें असतें तें मला सांग बरें !' तो मुलगा ब्रह्मस्वरूपाचें वर्णन करूं लागला, स्पष्टीकरणार्थ वेदांतून उतारे म्हणून दाखवूं लागला. बाप कांहीं बोलला नाहीं. नंतर त्यानें तोच प्रश्न धाकट्या मुलाला विचारला. तो मुलगा कांहीं न बोलतां नुसता खालीं मान घालून उभा राहिला. त्याच्या तोंडांतून एकहि शब्द फुटेना. बापाला त्यामुळें संतोष झाला व तो म्हणाला, 'बाळ ! तुलाच ब्रह्मज्ञान थोडेंतरी झालेलें दिसतें. तें काय आहे हें शब्दांनीं वर्णन करून सांगतां येण्यासारखें नाहीं.

'पुष्कळदां माणसांना वाटतें आपल्याला ब्रह्म म्हणजे काय हें सर्व कळलें आहे. एकदां एक मुंगी साखरेच्या एका डोंगरापाशीं गेली. साखरेच्या एकाच कणानें तिचें पोट भरलें. दुसरा एक कण तोंडांत धरून ती घरीं जायला निघाली. वाटेवर ती मनांत म्हणाली, 'पुढच्यावेळीं मी तो सबंध डोंगरच घरीं नेऊन जाईन.' उथळ मनांतले विचार हे असे असतात. ब्रह्म हें विचारातीत आणि शब्दातीत

असतें हें त्यांना कळत नाहीं. माणूस कितीहि श्रेष्ठ झाला तरी त्याला ब्रह्माचें ज्ञान किती होईल? शुकदेव आणि त्यांच्यासारखे मोठे महर्षि हे फार तर मोठ्या डोंगळ्यांसारखे असतील. ते देखील साखरेचे आठदहा कणच जेमतेम घेऊन जाऊं शकले असतील!

'वेदांत आणि पुराणांत ब्रह्माबद्दल जें काय सांगितलें आहे तें कसें आहे तें सांगूं का? समजा, एखाद्या माणसानें महासागर पाहिला आहे. कोणी-तरी त्याला विचारलें, 'महासागर कसा असतो रे?' आपलें तोंड शक्य तेवढें विस्फारून पहिला माणूस म्हणतो 'काय सांगूं तें दृश्य! केवढ्या मोठ्या मोठ्या लाटा आणि केवढा घनगंभीर आवाज!' धर्म पुस्तकांतील ब्रह्माचें वर्णन असेंच असतें. ब्रह्म हें आनंदरूप आहे असें वेदांत सांगितलेलें आहे. तें सच्चिदानंदमय आहे.

'शुक आणि इतर महर्षि हे या विस्तीर्ण ब्रह्मसागराच्या कांठाशीं उभे राहून त्यांनीं त्या सागराचें दर्शन घेतलें होतें व त्याच्या पाण्याला स्पर्शहि केला होता. एका तत्त्वदर्शकाच्या मतें त्यांनीं या ब्रह्म-सागरांत केव्हांच बुडी मारली नव्हती. यांत एकदां बुडी मारली म्हणजे माणूस परत या जगांत येत नाहीं.

'समाधीमध्यें माणसाला ब्रह्माचें ज्ञान होते, त्याला ब्रह्मसाक्षात्कार होतो. या अवस्थेंत चिकित्सक विचार पूर्ण थांबतो. माणूस मूक बनतो. ब्रह्माचें स्वरूप वर्णन करण्याची शक्ति त्याला असत नाहीं.



'एका दिवशीं एक मिठाची बाहुली महासागराची खोली अजमावून पाहण्या-साठीं गेली. (सर्व हंसतात) पाणी किती खोल आहे हें स्वतः पाहावें नि इतरांना सांगावें अशी तिची इच्छा होती. पण हें तिला जमलेंच नाहीं. कारण तिनें पाण्यांत उडी घातल्याबरोबर ती एकदम विरघ-ळूनच गेली. आतां तिथें सागराची खोली किती, हें सांगायला उरलेंच होतें कोण?'

## भक्तिमार्ग सुलभ

**एक भक्त**—समजा माणसाला समा-धींत ब्रह्मज्ञान झालें, तर मग तो अजिबात त्याबद्दल बोलायचा थांबतो काय?'

**भगवान्**—'इतरांना शिकविण्यासाठीं शंकराचार्यांनीं 'ज्ञानाहंकार' कायम ठेवला होता. ब्रह्मसाक्षात्कार झाल्यावर सामान्यतः माणूस मूक बनतो. त्याला ज्ञान झालें नाहीं तोंवरच तो त्याच्याबद्दल वाद घालीत असतो. शेगडीवर लोणी कढत ठेवलें म्हणजे त्यांतील पाणी निघून जाई-पर्यंत तें चुर्रचुर्र असा आवाज करतें पण सारें पाणी वाफ होऊन निघून गेलें म्हणजे मग बाकी राहिलेलें तूप हें आवाज करीत नाहीं. पुरी लाटून तळायला त्या तुपांत कढईत टाकली कीं ती परत चुर्रर आवाज करते. पण तळून पुरी तयार झाली म्हणजे तिचा सगळा आवाज थांबतो. त्याचप्रमाणें समाधिमग्न झालेला माणूस इतरांना ज्ञान देण्यासाठीं जाणिवेच्या अवस्थेंत आला म्हणजे मग तो ईश्वराबद्दल बोलूं लागतो.

'फुलावर जोंपर्यंत बसलेली नसते तोंपर्यंत मधमाशी गुई गुई करीत इकडून तिकडे उडत असते. पण तीच फुलावर

बसून मध पिऊं लागली म्हणजे तिचा गुंजारव थांबतो. पण कधीं कधीं त्या मधानें धुंद होऊन ती परत गुंजारव करूं लागते.

'रिकामी कळशी पाण्यांत बुडविली म्हणजे ती लगेच बुडबुड आवाज करते. कळशी पाण्यानें पुरी भरली म्हणजे तिचा सगळा आवाज थांबतो. (सर्व हंसतात.) पण आतां या भरलेल्या कळशींतून दुसऱ्या कळशींत पाणी ओता कीं परत आवाज होऊं लागतो. (हंशा)

'प्राचीन ऋषि ब्रह्मज्ञानी होते. संसाराची कणभरहि आसक्ति जोंवर शिल्लक आहे तोंवर माणसाला ब्रह्मज्ञान होणें अशक्य आहे. पूर्वीच्या ऋषीनीं किती कठोर तपस्या केली होती! अगदीं पहांटे उठून ते आपल्या पर्णकुटींतून बाहेर जात आणि कुठेंतरी एकांतांत बसून सबंध दिवस ते ब्रह्माचें ध्यान करीत. रात्रीं ते आपल्या झोंपडींत परत येत आणि थोडें कंदमूळ वा फळ खात. पंचेंद्रियांच्या विषयांपासून त्यांचें मन सदा अलिप्त असे. अशा रीतीनें अभ्यास करून आपला अंतरात्मा म्हणजेच ब्रह्म हा साक्षात्कार त्यांना झाला.

'पण कलियुगांत मनुष्याला जीवधारणेसाठीं सर्वस्वी अन्नावर अवलंबून राहावें लागतें. त्यामुळें आपण म्हणजे देह ही भावना त्याला स्वतःमधून समूळ नष्ट करून टाकतां येत नाहीं. अशी मनाची अवस्था कायम असेतोंवर त्यानें उगाच 'अहं ब्रह्मास्मि' असें म्हणूं नये. सर्व सांसारिक कर्में करीत असतांना 'अहं ब्रह्मास्मि' असें म्हणणें युक्त नव्हे. संसाराची आसक्ति ज्यांना सुटत नाहीं आणि ज्यांची अहंभावना नाहींशी होत नाहीं त्यांनीं 'आपण ईश्वराचे सेवक' 'आपण देवाचे भक्त' अशी भावना ठेवावी. भक्तीचा मार्ग चोखाळून देखील माणसाला ईश्वरसाक्षात्कार होऊं शकतो.

'नेति नेति असा नित्य विवेक करून ज्ञानी पुरुष संसाराबद्दलची आपली आत्मीयता तोडून टाकीत असतो. असें तो करतो तेव्हांच त्याला ब्रह्माचें ज्ञान प्राप्त होतें. जिना चढत असतांना एकेक पायरी मागें सोडून देत, पुढच्या पुढच्या पायरीवर आरूढ होत गच्चीवर जावें तसें संसाराचें एकेक बंधन तोडीत, नेति नेति हें ओळखत ज्ञानी पुरुष ब्रह्मज्ञान मिळवितो. पण ब्रह्मानुभव अधिक उत्कटपणानें झालेला विज्ञानी हा याहून अधिकाची प्राप्ति करून घेत असतो गच्ची आणि पायऱ्या यांसाठीं एकच द्रव्य वापरलेलें आहे हें तो ओळखतो. विटा, चुना, माती हींच गच्चींत व पायऱ्यांत दोहोंमध्यें आहेत. नेति नेति म्हणत एकेका वस्तूचा कल्पनेचा निरास करीत ब्रह्म म्हणून अखेरीस ज्याचा साक्षात्कार होतो तें ब्रह्मच विश्वरूपानें व्यक्त झालें आहे, सर्व प्राणिमात्र म्हणजे तेंच हें अखेर आढळून येतें. गुणधर्मरहित निर्गुण जें आहे तेंच गुणधर्मांनीं युक्त असें सगुण आहे हें विज्ञानी पुरुष ओळखतो.

'माणसाला गच्चीवरच कांहीं सदासर्वकाळ राहातां येत नाहीं. तो परत खालीं येतो. समाधींत ज्यांना ब्रह्मानुभव होतो असे साक्षात्कारी पुरुषहि त्या अवस्थेंतून बाहेर आले, म्हणजे त्या

ब्रह्मानेंच हें विश्वरूप धारण केलें आहे, सर्व प्राणिजात म्हणजे तें ब्रह्मच याचा त्यांना प्रत्यय येतो. गाण्याच्या रागदारींत सा रे ग म प ध नी असे आरोह अवरोहाचे स्वर असतात. पण माणसाला वरच्या पट्टींतील नी या स्वरावर फार काळ आपला आवाज लावून ठेवतां येत नाहीं. अहंकार संपूर्णतः नष्ट होत नाहीं. समाधींतून बाहेर आलेल्या माणसाला असें आढळून येतें कीं ब्रह्मानेंच अहंकार, विश्व, आणि अखिल प्राणिजात यांचें रूप धारण केलें आहे. याला विज्ञान असें म्हणतात.

'ज्ञानाचा मार्ग अखेर सत्याची व आपली गांठ घालून देतो. भक्ति व ज्ञान यांच्या समन्वयानेंहि अंतीं सत्याचा साक्षात्कार होतो. नुसत्या भक्तिमार्गाची अखेर सत्याचा अनुभव घडण्यांतच होते. भक्तिमार्ग व ज्ञानमार्ग हे दोन्हीहि सारखेच खरे आहेत. सर्व मार्गांची अखेर एकाच ध्येय प्राप्तींत होते. पण ईश्वरानें आपल्यांत जोंवर अहंकाराचा अवशेष ठेवला आहे तोंवर भक्तिमार्ग हा चोखाळण्यास अधिक सुलभ आहे.

'ब्रह्म हें मेरु पर्वताप्रमाणें अविचल आणि निष्क्रिय असतें असें विज्ञानी पाहातो. हें विश्व त्रिगुणात्मक आहे—सत्त्व रज आणि तम हे ते तीन गुण होत ब्रह्मांत ते गुण असतात. पण खुद्द ब्रह्म हें मात्र या गुणांनी अलिप्त असतें.

'ब्रह्म आणि भगवान् एकच—अमूर्त ब्रह्म आणि मूर्त ईश्वर हें एकच असा अनुभव विज्ञानी पुरुषाला होतो षड्विधा शक्तीनीं युक्त आणि त्रिगुणातीत असा भगवान् आहे. सर्व प्राणिजात, विश्व, मन, बुद्धि, भक्ति त्याग, ज्ञान हीं सर्व त्याच्याच शक्तींचीं मूर्तस्वरूपें आहेत. (हंसून) एखाद्या थोर कुळांतील माणसाला घरदार, मालमत्ता हीं कांहींच नसलीं अथवा असलेली सर्व त्याला विकून टाकावी लागली तर मग त्याला थोर, कुलीन, अभिजात असें कोणी म्हणत नाहीं (सर्व हंसतात.) ईश्वर सहा अलौकिक शक्तींनीं युक्त असा असतो. असा तो शक्तिसंपन्न नसेल तर त्याचें ऐकेल कोण ? (हंशा)

'हें विश्व किती चित्रविचित्र आहे पहा ! किती विविध वस्तूंनीं तें भरलेलें आहे ! सूर्य चंद्र तारे—आणि सजीव प्राण्यांच्या किती नानातऱ्हा ! लहान मोठे चांगले वाईट, सबळ दुर्बळ—कांहींना विशेष सामर्थ्य लाभलेलें तर कांहींना विशेष दुबळेपण असलेलें.

## नुसती विद्वत्ता निष्फळ

**विद्यासागर**— 'कांहींना विशेष सामर्थ्य व कांहींना कमी शक्ति असे देवानेंच केलें आहे काय ?'

**भगवान**— 'सर्वव्यापी आत्मा या नात्यानें ईश्वराचें अखिल वस्तु जातामध्यें अस्तित्व आहे. मुंगीतहि तो आहे. पण निरनिराळ्या प्राण्यांत त्याच्या शक्तीचा आविष्कार मात्र कमी अधिक प्रमाणांत झाला आहे. असें नसतें तर एखादा माणूस दहाजणांना पळतां भुई थोडी असें करून टाकूं शकतो, तर एखाद्याला एका माणसालाहि धड तोंड देण्याची शक्ति नसते असें आढळून कां येतें ? तुमचेंच उदाहरण घ्याना ? लोक तुम्हांलाच एवढा मान कां देतात ? तुम्हांला काय दोन शिंगें फुटलीं आहेत ? (हंशा) तुमच्यामध्यें विद्वत्ता आणि दयाशीलता हीं अधिक आहेत.

म्हणून लोक तुम्हांला मान देतात आणि तुम्हांला नमस्कार करायला येतात. पटतें ना माझें म्हणणें तुम्हांला ?'

विद्यासागरनीं स्मितहास्य केलें.

भगवान् पुढें म्हणाले, 'नुसती विद्वत्ता निष्फळ असते. ईश्वराचें ज्ञान करून घेण्याचा मार्ग शोधणें हा विद्याभ्यासंगाचा खरा हेतु. ईश्वराचा साक्षात्कार करून घेणें हें ज्ञानार्जनाचें खरें उद्दिष्ट. एका साधूज-वळ एक ग्रंथ होता. त्या ग्रंथांत काय आहे, असा त्याला कोणी प्रश्न केला. त्यानें तो ग्रंथ उघडून दाखविला. सर्व पृष्ठांवर ॐ राम हे शब्द लिहिलेले होते दुसरें कांहीं नव्हतें.

'गीता ग्रंथाचें खरें तात्पर्य काय आहे ! दहा वेळां तो शब्द उच्चारा म्हणजे त्या ग्रंथाचें तात्पर्य तुम्हांला सापडेल. गीता, गीता, असें म्हणूं लागलांत कीं 'तागी' 'तागी' असें म्हटल्यासारखें वाटतें. तागी म्हणजे त्यागी—ईश्वरा व्यति-रिक्त बाकी सर्व गोष्टींचा ज्यानें सर्वथैव त्याग केलेला आहे असा माणूस. गीतेचा धडा असा आहे 'सर्वधर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज'—सर्वत्याग करून एका ईश्वराला शरण जा. गृहस्थाश्रमी असो व संन्यासी असो—त्यानें आपल्या चित्तांतून आसक्तीचें मूळ काढून टाकलें पाहिजे,

'चैतन्यदेव दक्षिणेंतील तीर्थें करण्या-साठीं यात्रेला निघाले. एका दिवशीं एक माणूस गीता वाचतांना त्यांना आढळला. दुसरा एक माणून थोड्या अंतरावर बसून गीता ऐकत होता आणि मोठ्यानें रडत होता. त्याचे डोळे पाण्यानें भरलेले होते. चैतन्यदेवांनीं त्याला म्हटलें, 'अरे तुला हें सगळें कळतें आहे का ?' तो म्हणाला, 'नाहीं. साधुमहाराज ! मला त्यां ग्रंथांतलें एक अक्षरहि कळत नाहीं.' चैतन्यदेव म्हणाले, 'अरे मग तूं कां रडतोस ?' तो भक्त म्हणाला, 'मला अर्जुनाचा तो रथ समोर दिसतो आहे. त्या रथांत पुढील बाजूला श्रीकृष्ण आणि अर्जुन हे दोघे बोलत असलेले माझ्या दृष्टीसमोर दिसत आहेत. हें पाहून मला अश्रु आवरत नाहींसे झालेले आहेत.'

'विज्ञानी ईश्वराबद्दल भक्तिभाव कां ठेवतो ? त्याचे उत्तर असें आहे कीं आपली अहं—भावना भावना समूळ नष्ट अशीं कधीं होत नाहीं. समाधींत ही भावना उरत नाहीं, हें खरें परंतु ती परत उत्पन्न होते. सामान्य माणसांच्या बाबतींत अहं—भावना कधींहि नाहींशी होत नाहीं. अश्वत्थाचें झाड आज तुम्ही तोडलेंत तरी उद्यां परत पाहा—त्याला कोंब फुटलेले तुम्हांला दिसतील (हंशा)

'ज्ञानप्राप्तीनंतरहि ही अहं—भावना कुठून कोणाला ठाऊक पण परत उद्-भवते. तुम्हांला वाघाचें स्वप्न पडतें. नंतर तुम्ही जागे होता. पण जागे झाल्यावरहि तुमचें हृदय धडधडतच असतें. आपलें सर्व दुःख या 'अहं' पणामुळें उद्भवतें. गाय 'हम्मा, हम्मा' म्हणजे 'मी, मी' म्हणून हंबरते. त्यामुळेंच तिला अत्यंत दुःख भोगावें लागतें. तिला नांगरालाहि जुंपतात आणि उन्हा—पावसांत तिला खपावें लागतें. अखेरीस ती खाटकाच्या सुऱ्याला बळी पडते. तिच्या कातड्याचें जोडे करतात, ढोलहि बनवतात. लोक हे ढोल मग जोरजोरानें बडवितात. (हंशा) अजून तिच्या यातना संपलेल्या नसतात. शेवटीं तिच्या आंतड्याच्या दोऱ्या वळून त्या पिंजाऱ्याच्या धनुकलीला लावतात. मग मात्र तो 'हम्मा, हम्मा', 'मी, मी', असें ओरडत नाहीं, मग ती 'तुहु तुहु' म्हणजे 'तूं, तूं' असा आवाज करते. असें झाले म्हणजे

मगच तिचें नष्टचर्य संपतें. देवा, मी तुझा दास आहे. तूं माझा यजमान आहेस. मी मूल आहें तूं माझी माउली आहेस.

'एकदां रामानें हनुमानाला विचारलें, तुला मी कसा दिसतों ?' हनुमान म्हणाला, 'रामचंद्रा ! मला अहंपणाची जाणीव असते त्यावेळीं तूं पूर्ण आहेस आणि मी तुझा अंश आहें, अशी माझी भावना असते; तूं यजमान आणि मी सेवक असा भाव असतो. पण रामा ! जेव्हां मला सत्यज्ञान होतें तेव्हां मात्र तूं म्हणजेच मी आणि मी म्हणजेच तूं असा साक्षात्कार मला होतो.'

'देवाशीं सेव्य–सेवकभाव ठेवणें हेंच युक्त. हा 'मी' जोंवर शिल्लक आहे तोंवर त्याला देवाचा सेवक म्हणूनच राहूं दे.

'मी' आणि 'माझें'—हेंच अज्ञान होय. 'माझें घर,' 'माझी संपत्ति,' 'माझी विद्वत्ता,' 'माझी मालमत्ता,' असें आपल्याकडून म्हणावणारी बुद्धि ही अज्ञानांतून निर्माण होते. याच्या उलट ज्ञानांतून निर्माण झालेली बुद्धि म्हणते, 'देवा ! तूं स्वामी आहेस आणि या सर्व वस्तुजातावर तुझीच मालकी आहे. घरदार, मुलेंबाळें, नोकरचाकर, आप्तमित्र सर्व कांहीं तुझेंच आहे '

'माणसानें मृत्यूचें सदैव स्मरण ठेवावें. मृत्यूच्या तडाक्यांतून कांहींहि सुटत नाहीं. या जगांत कांहीं कर्तव्य करण्यासाठीं आपण जन्माला येतों. खेड्यांतून कांहीं विशिष्ट कामापुरते खेडूत जसे कलकत्त्याला येतात तसे आपण या जगांत येतों. एखाद्या श्रीमंताची बाग पाहायला एखादा माणूस गेला म्हणजे तिथें बागेवर देखरेख ठेवणारा मुनीम म्हणतो 'ही आमची बाग,' 'हें आमचें सरोवर' त्या मुनीमाला कांहीं कारणानें नोकरीवरून काढून टाकले म्हणजे त्याला साधी आंब्याच्या लाकडाची पेटी आपली देखील तिथून नेतां येत नाहीं. ती तो दारावरच्या पहारेकऱ्याकरवीं गुपचूप बाहेर पाठवून देतो. ( हंशा )

'देव दोन वेळां हंसतो. रोग्याच्या आईला वैद्य जेव्हां म्हणतो 'आई ! घाबरूं नका तुम्ही. मी खास तुमच्या मुलाला बरें करतों.' तेव्हां देव हंसतो आणि मनाशीं म्हणतो, 'मी याचे प्राण हरण करणार आहे आणि हा माणूस मारे सांगतो आहे कीं आपण याला वांचविणार आहों.' वैद्याला वाटतें कीं आपण कर्तेकरविते आहोंत पण खरोखरी कर्तुमकर्तुम् असें सामर्थ्य एका देवाच्याच ठिकाणीं कायतें असतें. दोन भाऊ हातांत दोरी घेऊन आपली जमीन विभागून घेतात. एकजण दुसऱ्याला सांगत असतो, 'ही बाजू माझी आणि ती तुझी.' हें ऐकून देव हंसतो आणि स्वतःशीं म्हणतो, 'हें संबंध विश्व माझ्या मालकीचें आहे. पण हे मारे, हा तुकडा माझा नि तो तुझा अशी वांटणी करीत आहेत.'

'युक्तिवादानें माणसाला ईश्वराचें ज्ञान कधीं तरी होऊं शकेल काय ? त्याचे सेवक व्हा, त्याला सर्वस्वीं शरण जा आणि त्याची मनोभावें प्रार्थना करा.

( विद्यासागरनां उद्देशून ) 'काय, तुमची दृष्टी कशी आहे या बाबतींत ?'

**विद्यासागर**—( स्मित करून ) केव्हां तरी मी गुपचुप सांगेन तुम्हांला ( हंशा )

**भगवान्**—( हंसून ) केवळ विद्वत्तेच्या जोरावर युक्तिवादाचा कीस काढून ईश्वराची ओळख कधींच होणार नाहीं.'

# आपले निश्चय कां फसतात ?
# आणि केव्हां साधतात ?

'पुष्कळवळां असें होतें कीं आपण एखादी गोष्ट करायचा निश्चय करतों, अमकी अमकी गोष्ट उद्यांपासून करायचीच असा निर्धार आपण मनाशीं करतों. काय वाटेल तें होवो, अमका अमका निश्चय आपण पाळणारच अशी प्रतिज्ञा अंतःकरणांत अतीव उत्कटतेनें आपण उच्चारतों. पण कसोटीची वेळ आली कीं आपला निश्चय डळमळतो, आपला निर्धार लटपटतो, आपली प्रतिज्ञा कोलमडते आणि खरोखरी जें आपल्या हातून घडूं नये असें आपल्याला वाटत असतें तेंच नेमकें घडून येतें. मग ती गोष्ट हातून घडून गेल्यावर आपण पस्तावतों, स्वतःवर अतिशय जळफळतों आणि अखेर 'असा कसा अगदीं नतद्रष्ट मी ! एवढासा निश्चय सुद्धां माझ्या हातून पाळला जाऊं नये ही किती नामुष्कीची गोष्ट !' या विचारानें आपल्या दुबळेपणाची आपण आपल्याशींच सारखी खंत करीत राहातों.

## परीक्षेच्या वेळचे निश्चय

आपल्या शाळेचे दिवस आठवा. परीक्षा जवळ येई तेव्हां आपली तयारी बरीच कमी आहे, असें तुम्हांला आढळून येत असे. मग तुम्ही मनाशीं म्हणत असां 'यंदा चांगल्या रीतीनें पास होणें हें कांहीं शक्य नाहीं. यंदा कसे तरी थातुरमातुर करून पास होऊंया. पण ही परीक्षा झाली म्हणजे पुढच्या इयत्तेंत मात्र अगदीं प्रारंभापासून आपण अगदीं व्यवस्थित अभ्यास करणार. म्हणजे परीक्षेच्या वेळीं यंदांसारखी धांदल व्हायची नाहीं आणि खालीं नंबर जाण्याची नामुष्कीहि पदरीं पडायची नाहीं.' मग तुम्ही कसेबसे पास होत होतां. पण त्यानंतर पुढील इयत्तेंत प्रारंभापासून अभ्यास करण्याचा तुमचा निश्चय, कसा कोण जाणें, तुम्ही पार विसरून जात होतां. मग पुढची परीक्षा जवळ आली म्हणजे तुम्हांला परत पश्चात्ताप होत होता नि परत पहिला निश्चय तुम्ही नव्या निर्धारानें करीत होतां......

## व्यसनें सुटत नाहींत

आजहि आपली हीच दशा आहे. कधीं कधीं आपण ठरवितों कीं 'बस्स् ! उद्यांपासून चहा बंद !' चहानें आपली भूक कशी कमी झाली आहे, आपला खर्च कसा वाढला आहे आणि आपल्या देहाची खराबी कशी झाली आहे, याचें वर्णन आपण स्वतःशीं व इतरांशीं करतों आणि नंतर जाहीर करतों कीं 'अमक्या दिवसापासून आपण चहा साफ सोडणार !'

पहिली तारीख, आठवड्याचा पहिला वार, अथवा देवीचा म्हणून मंगळवार किंवा शुक्रवार, अथवा चांगला म्हणून गुरुवार, अथवा टिळक पुण्यतिथि, साई

पुण्यतिथि, स्वातंत्र्यदिन, असा कोणता तरी वार आपण ठरवितों आणि त्या दिवसापासून चहा बंद, अशी आपण घोषणा करतों. मग त्या ठरविलेल्या दिवसाच्या आदल्या दिवशीं आपण नेहमीं-पेक्षां अधिक चहा पितों! वीट येईपर्यंत चहा घेतला म्हणजे ठरविलेल्या दिवसा-पासून आपल्याला चहा पिण्याची आसक्ति उत्पन्न होणार नाहीं, या कल्पनेनें आपण अगोदरच्या दिवशीं खूप चहा पिऊन घेतों!

मग तो निश्चयाचा दिवस उजाडतो. सकाळीं घरांतील इतर माणसें चहा पीत असतांना पाहून आपल्याला त्यांची कींव येते. इतकें टॅनिन विष हीं माणसें रोज घशांत ओततात याचें आपल्याला नवल वाटतें! आपण या दुबळ्या चहा-पिऊ माणसांपेक्षां किती श्रेष्ठ आहोंत, हें मनांत येऊन आपल्याला थोडें बरेंहि वाटतें.

सबंध सकाळभर आपण चहा घेत नाहीं. दुपारीं अवचित एखादा पाहुणा आपल्या घरीं येतो. आतिथ्य पाळायचें म्हणून आपण त्याला चहा देतों. तो आश्चर्यानें विचारतो.

'आणि तुम्ही?'

तुम्ही आपल्या श्रेष्ठत्वाचा अहंकार न दर्शवितां विनयानें म्हणतां,

'मी ना? मी चहा सोडलाय् आज-पासून!'

चहाचा उचलेला कप खालीं ठेवून पाहुणा उद्गारतो,

'वा वा! असं कसं होईल? तुम्ही चहा घेत नसाल तर मलाहि नको!'

तुम्ही थोडे रागावून म्हणतां,

'अहो पण असं काय करतां? मी चहा प्यायचा नाहीं असा निश्चय केलाय!'

पाहुणा म्हणतो,

'कबूल आहे! पण आजचाच आहे ना निश्चय? मग थोडा चहा माझ्याबरोबर घ्या तुम्ही! मग परत पिऊं नका. मी वारंवार थोडाच येतों इथं! एकट्यानें चहा प्यायला मला नाहीं बुवा बरं वाटत!'

मग पाहुण्याच्या 'आग्रहाखातर' तुम्ही घोटभर चहा घेतां. तुमची जीभ लाल-चावते नि पाहुणा गेल्यावर तुम्ही घरांत जाऊन म्हणतां,

'अग! चहा कर बरं कपभर झकसा! उगाच तोंड चाळवलं मघांच्या घोटभर चहानं. एवींतेवीं निश्चय मोडलाच. मग मनासारखा तरी चहा पिऊं या!'

निश्चय मोडण्यासाठीं तुम्ही असे निमित्ताला टेंकलेले असतां आणि त्या शुभदिनीं मोडलेला तुमचा निश्चय पुढचा असाच एखादा शुभदिन येईपर्यंत 'मोडलेलाच' राहातो!

चहा, सिगारेट, व्यायाम, सकाळीं अर्धा तास लवकर उठणें, रोज फिरायला जाणें, रोज डायरी लिहिणें, रोज ज्ञानेश्वरी अथवा साईसच्चरित वाचणें, हॉटेलांत भजीं न खाणें,—इत्यादि इत्यादि विषयींच्या आपल्या साऱ्या निश्चयांची हीच गत नेहमीं होत आलेली आहे!

## विस्मयजनक सिद्धान्त

आपली इच्छाशक्ति दुर्बळ असते म्हणून आपले निश्चय मोडतात का?

आपला निर्धार भक्कम नसतो म्हणून आपल्याला अपयश येतें का? आपली प्रतिज्ञा जितकी असावी तितकी उत्कट नसते का?

निश्चय करण्याच्या वेळची आपली मनःस्थिति आपण आठवतों तेव्हां आपण खरोखरीच्या उत्कटपणानें निश्चय केलेला असतो असें आपल्याला स्मरतें. आपल्या निश्चयांत बिलकुल अप्रामाणिकपणा नसतो. खरोखरीच यापुढें आजन्म, आमरण, आपण चहा पिणार नाहीं, सिगारेट ओढणार नाहीं किंवा ज्ञानेश्वरीच्या पन्नास ओंव्या रोज वाचल्याखेरीज राहाणार नाहीं अशी आपली खात्री असते. मग ही खात्री पुढें खोटी कां ठरते? नि आपण हास्यास्पद कां होतों?

आपल्या निश्चयभंगाबद्दलचा नियम अगदीं साधा आहे. तो असा कीं—

> कोणताहि निश्चय करतांना तो आपण पाळलाच पाहिजे, यासाठीं आपल्या मनाचा आकांत जितका अधिक तितका तो निश्चय पार पडण्याचा संभव कमी!

वरील सिद्धान्त वाचतांक्षणींच तुमच्या मुद्रेवर सखेदाश्चर्य पसरलें असेल आणि 'काय खुळ्यासारखें बहकतोय हा प्राणी!' असेहि उद्गार तुम्हीं काढले असतील. पण मी या सिद्धान्ताच्या पुष्टीकरणासाठीं जीं उदाहरणें देणार आहें आणि जें विवेचन करणार आहे तें प्रथम नीट वाचा आणि नंतर माझें म्हणणें तुमच्या अनुभवाशीं जुळतें कीं नाहीं हें पारखून पहा.

एखादी गोष्ट घडावी यासाठीं आपल्या मनाचा आकांत जितका जास्त, तितकी आपल्या अपयशाची शक्यता अधिक हा सिद्धांत दिसायला विचित्र दिसला तरी आपला नेहमींचा अनुभव मात्र या सिद्धांताला जुळेसाच असतो.

## कसा तो पहा

(१) तुम्हीं रात्रीं अंथरुणावर पडलां आहांत. घराच्या एका खिडकीचा ताण निघालेला आहे. खिडकीच्या एका दाराचें बिजागर 'ऊंऽकिर्रर्र' असा आवाज करतें आणि वाऱ्यानें दार फाडकन् आपटतें. तुम्हीं अगदीं झोंपेला आलां होतां, पण त्या दाराच्या फाडकन् आवाजानें तुमचें लक्ष तिकडे वेधतें. परत 'ऊंऽकिर्रर्र—फाड् फाड्' आवाज होतो. आतां तुमची झोंप पार उडते, एवढेंच नाहीं तर तें बिजागर परत 'ऊंऽकिर्रर्र' असा आवाज केव्हां करतें आणि दार फाडकन् परत केव्हां वाजतें याची तुम्ही वाट पाहूं लागतां. 'काय त्रासदेणें दार आहे!' असें तुम्हीं चिडून मनाशीं म्हणतां आणि डोळे मिटतां, पण तुमचें शरीर अगदीं ताणावल्यासारखें होतें नि त्या आवाजानें आपली झोंप जाऊं नये म्हणून तुमच्या मनाची अगदीं तगमग होते. पण तुमच्या इच्छेविरुद्ध 'ऊंऽकिर्रर्र—फाड् फाड्' या आवाजांत तुमचें मन गुंतून राहातें नि तुम्ही कमालीचे अस्वस्थ होऊन जातां.

(२) एखाद्या ठिकाणीं तुम्ही पाहुणे म्हणून जातां. रात्रीं तुम्हांला छान झोंप लागते. सकाळीं घराचे यजमान म्हणतात, 'झोंप लागली होती का चांगली तुम्हांला? इथें थोडेसे ढेंकूण आहेत म्हणून विचारतों.'

तुम्ही म्हणतां 'झक लागली होती झोंप मला.'

पण त्या दुसऱ्या दिवशीं मात्र तुम्हांला झोंप येत नाहीं नीट. 'चावलें वाटतें कांहीं!' असें म्हणत तुम्ही आंगाखाली चांचपतां. मध्येंच दिवा लावून पाहातां. ढेकूण वगैरे तुम्हांला आढळत नाहीं. तरीहि दिवा मालवून पडल्यावर तुम्हांला सारखें कांहीं चावल्यासारखा भास होतो. तुम्ही डोळे मिटलेले असतात. तुम्हांला झोंप यायला हवी असते. पण तरीहि आपल्या आंगाला कुठें कांहीं चावतें आहे काय, असा संशय सारखा तुम्हांला येत असतो नि झोंप हवी असूनहि तुम्ही अर्धवट जागृतींत अंथरुणावर तळमळत राहतां.

(३) तुम्हीं वार्षिक परीक्षेचा—विशेषतः मॅट्रिकसारख्या महत्त्वाच्या परीक्षेचा पहिला दिवस आठवा. तुमच्या हातीं पेपर आला. तुम्हीं तो चाळला आणि एक प्रश्न निवडून त्याचें उत्तर लिहूं लागलां. सर्व पेपर ठरल्या मुदतींत व्यवस्थित लिहून व्हायचा तर जलद लिहिणें अत्यंत आवश्यक होतें, नाहीं? पण तुम्हीं लिहायला प्रारंभ केला तेव्हां पहिला बंद लिहून होईपर्यंत तुमचा हात कसा कांपत होता नि तुमच्या इच्छेविरुद्ध तुम्हांला सावकाशच कसें लिहावें लागत होतें हें आठवतें का तुम्हांला? पहिला बंद लिहून संपायच्या सुमारास 'भरभर लिहिलें पाहिजे बाबा!' ही कल्पना मनांतून जाऊन जें उत्तर तुम्ही लिहीत होतां त्याच्या विषयाशीं तुम्हीं तन्मय झालां होतां आणि मग तुमचा हात भराभर चालूं लागला होता. पण 'जलद लिहिलें पाहिजे' या इच्छेचा आकांत जागृत होता तोंवर मात्र तुमच्या हातानें तुमच्याशीं असहकार पुकारला होता.

(४) बँकेंतून पहिल्या प्रथम तुम्हीं पैसे काढलेत तो दिवस स्मरतो का तुम्हांला? तुमच्या नमुन्याच्या सहीशीं जुळणारी तुमची सही, पैसे काढायच्या फॉर्मवर पाहिजे असें कारकुनानें तुम्हांला सांगितलें होतें. तुम्हीं नेहमींसारखी सफाईदार सही करायला टांक उचलला होता. पण चटकन् सही करायला न येतां तुमचीं बोटें उगाचच वरखालीं वरखालीं वळवळत होतीं आणि शेवटीं कांपऱ्या हातानें थांबत थांबत तुम्हीं सही केली होती, हें तुमच्या लक्षांत आहे काय?

(५) तुम्हीं व्यासपीठावर उभें राहून पहिलें भाषण केलें तेव्हांची तुमची दशा तुमच्या ध्यानांत आहे का? ऐटदार उभें राहून, योग्य आविर्भाव करीत, दमदार आवाजांत, अस्खलित बोलण्याची तुमची महत्त्वाकांक्षा होती. पण तुमचें शरीर त्यादिवशीं तुमच्या वैऱ्यासारखें वागलें. आपल्याला गुढघे आहेत ही जाणीव त्याच दिवशीं तुम्हांला उत्कटपणें झाली होती. गुढघे 'विठ्ठल विठ्ठल' असें भजन करतात हें तुम्हांला प्रथमच प्रत्ययास आलें होतें. तुमचे ओठ सुकले होते, जीभ कोरडी पडली होती, आपल्या या इतक्या दोन हातांचें काय करावें हें तुम्हांला कळत नव्हतें आणि अखेर कसेबसे चार शब्द बोलून खालीं उतरतांना आपले पाय नीट न वांकतां कसेतरी वेडेवांकडे पडत आहेत असा कांहीं विचित्र भास तुम्हांला झाला होता. आपण उत्कृष्ट भाषण करून सभा जिंकावी अशी केवढी

आकांताची आस तुमच्या चित्ताला लागून राहिली होती! पण झालें सगळें तिरपागडेंच!

## इच्छाशक्ति आणि भावना

अशी उदाहरणें कितीतरी देतां येण्यासारखीं आहेत. परंतु मला जो मुद्दा सांगायचा त्यासाठी हीं पांच उदाहरणें पुरेशीं आहेत. आपल्याला जें जिवाच्या आकांतानें करायचें असतें त्याच नेमक्या बाबतींत आपल्या हातून आपल्या इच्छेच्या विरुद्ध आचरण घडतें आणि आपण त्या प्रसंगीं अगतिक होतों, असें या पांचहि उदाहरणांत दिसून येतें. आपल्या प्रयत्नांची दिशा एक तर, आपल्या पदरीं पडणाऱ्या फळाची दिशा बरोबर विरुद्ध असें आपल्याला आढळून येतें.

हें ज्या नियमानें घडतें त्याला मानसविज्ञ **'लॉ ऑफ् रिव्हर्सड् एफर्ट'** असें म्हणतात. मराठींत जाडजूड शब्द वापरून म्हणायचें तर हा **'प्रतिनिवृत्त प्रयत्नाचा कायदा'** आहे. आपण केलेला प्रयत्न जणूं मुरडून माघारीं येतो आणि आपल्याला अपयशाचीच प्राप्ति करून देतो.

पण कां? प्रयत्नाचें फळ नेमकें विरुद्ध कां मिळावें? याचें कारण असें कीं, **आपलें आचरणहें इच्छाशक्तीच्या बळावर घडत नसून भावनेच्या बळावर घडतें.** मला उत्कृष्ट भाषण करायची उत्कट इच्छा आहे, पण मी उत्कृष्ट भाषण करीन अशी माझी उत्कट आंतरिक भावना नसेल, तर माझें भाषण चांगलें तर होणार नाहींच, पण माझी इच्छा जितकी अधिक प्रबळ असेल, तितकें माझें भाषण अधिक वाईट होईल. **इच्छाशक्ति आणि भावना** —म्हणजे **'विल'** आणि **'इमॅजिनेशन'**—यांचा संघर्ष असेल तर त्यांत अखेर भावनाच विजयी होते हा निरपवाद सिद्धान्त आहे.

वरचा परिच्छद, मला वाटतें, फारच विद्वत्तापूर्ण झाला आहे! त्यामुळें माझा आशय वाचकांना नीट कळला नसेल! यासाठीं दोन उदाहरणें देतों.

ज्या वाचकांना सायकलवर बसतां येत असेल त्यांना आपला प्रारंभीचा अनुभव आठवत असेल. मागें कोणी हात न देतां स्वतःच्या बळावर तुम्हीं सायकल नुकतीच चालवूं लागलां होतां. एकदां रस्त्यावरून डळमळ डळमळ करीत तुम्ही सायकलीनें निघाला होतां. रस्त्यावर चिटपांखरूं नव्हतें. पण—अरे नशिबा! रस्त्यावर समोरच्च केवढा दगड होता हा! तसा कांहीं मधोमध नव्हता तो दगड; होता रस्त्याच्या कडेलाच. पण तो दिसल्याबरोबर 'तो टाळून पुढें गेलें पाहिजे' असें भयभीतपणें तुम्ही म्हणालां होतां आणि—आणि काय! तुम्ही सरळ त्या दगडावर जाऊन आदळलां होतां!

पण सगळ्याच वाचकांना सायकलवर बसतां येत नसेल. दुसरें उदाहरण देतों. ही बघा इथें जमिनीवर दीड फूट रुंद आणि साठ फूट लांब फळी आहे. या फळीवरून धिमेपणानें सरळ चालत जा पाहूं. जमिनीवर पाय न टेकतां फळीवरून चालत गेलें पाहिजे. अरे वा! अगदीं दोरीसूत स्थिर पावलांनीं गेलांत कीं तुम्ही!

ठीक! आतां ही फळी जमिनीवरून उचलली आहे. या दोन सहा सहा मजली उंच इमारती रस्त्याच्या दोहोंकडांना समोरासमोर आहेत. या इमारतींच्या गच्च्यांना जोडून ही फळी टाकली आहे. आतां हें साठ फूट अंतर मघांसारखें चालून जा पाहूं. जमिनीपासून सुमारें ८०–९० फुटांच्या उंचीवर दोन गच्च्यांना जोडून ही दीडफूट रुंदीची फळी आहे. बाजूला कठडे वगैरे कांहीं नाहींत. चला, फळीवरून चालत निघा. दोन पावलें चालून जरा खालीं पहा—मोटारगाड्या, माणसें हीं कशी वरून मुंग्यांसारखीं दिसतात, नाहीं? अरे हें काय? तुमचे पाय लटपटायला लागले; वरून खालीं पहातांना तुमच्या डोळ्यांपुढें अंधेरी आली आणि पडलांतच कीं तुम्हीं कोसळून खालीं.

फळी एकच. पण जमिनीवर असली म्हणजे जिच्यावरून जातांना कणमात्र भय वाटत नाहीं, तीच अधांतरीं असली म्हणजे मात्र फारच अरुंद आणि भयप्रद कां वाटते नि तिच्यावरून चालतांना माणूस कां पडतो?

याचें कारण असें कीं फळी जमिनीवर असते तेव्हां इच्छा आणि भावना या परस्परपूरक असतात; फळीवरून पलीकडे जाण्याची इच्छा असते आणि 'जाऊं शकूं' अशी भावना असते. या दोहोंत विरोध नसतो, संघर्ष नसतो म्हणून जमिनीवरच्या फळीवरून आपण सहज चालून जाऊं शकतों. पण अधांतरीं असलेल्या फळीवरून जाण्याची इच्छा असली तरी 'जातां येईल' ही भावना नसते. 'गेलेच पाहिजे' या इच्छेचा आकांत अधिक असला तरी 'कसे जाणार?' या भयाची भावना प्रबळ असते. या दोहोंच्या संघर्षांत भावना विजयी होते आणि इच्छा विफल ठरते.

## निश्चयांच्या बाबतींतहि असेंच घडतें

आपल्या निश्चयाच्या बाबतींत असेंच घडतें. 'आपण चहा सोडावा' ही आपली इच्छा असते. दांत करकचावून 'सुटणारच मी चहा' असें आपण मोठ्या निर्धारानें म्हणतों, त्याचवेळीं 'कसा सोडणार चहा माझा?' ही भावना तितकीच प्रबळ होते. आणि ही भावनाच शेवटीं इच्छेवर मात करते.

इथें एक प्रश्न असा उपस्थित होतो कीं, इच्छा ही माझीच व भावना हीहि माझीच. मग या दोहोंत संघर्ष कां? जशी माझी इच्छा, तशीच माझी भावना असें कां असूं नये? याचें कारण एवढेंच कीं, अमुक अमुक झालें म्हणजे अमुक अमुक होईल अशी 'सूचना' आपण आपल्या मनाला देऊन तशी भावना बनविलेली असते.

वरचें फळीचें उदाहरण परत आठवा. अधांतरीं असलेल्या अरुंद फळीवरून चालतांना मी पडण्याचें वास्तविक कारण काय आहे? वास्तविक कांहींच कारण नाहीं. परंतु 'इतक्या उंचावरून मी अरुंद फळीवरून चालतांना खालीं पडणारच' ही भावना आपण आपल्या मनांत पक्की करून ठेवलेली असते, म्हणून आपण पडतों.

आपल्या निश्चयाच्या बाबतींत काय घडतें तें आतां तुमच्या लक्षांत येईल. चहा आपल्याला आवडतो. ही आवडीची वस्तु सोडावी अशी आपली 'इच्छा'

असते. पण ' मला चहा नको ' ही भावना आपण निर्माण केलेली नसते. आदले दिवशीं आपण अधिक चहा पितों याचा खरा अर्थ असा कीं, आपण चहाला जणूं म्हणत असतों, ' बाबा! उद्यां तूं मला सोडून जाणार ना? नको रे जाऊं! किती आवडतोस तूं मला!' आपण चहा सोडायला शुभ दिवस पाहात असतों याचा अर्थच असा कीं, ' चहा मला अति प्रिय आहे—मी तो सोडणें हें खरोखरी किती कष्टाचें आहे! अति दुःखाचें आहे हें! पण या शुभदिवसाची लाज ठेवून तरी मी तो सोडणें अवश्य आहे ' असें तुम्ही वस्तुतः म्हणत असतां. पण या शुभ दिवसाची तुम्हांला वाटणारी पत्राज जितक्या किंमतीची तितकाच तुमचा निश्चय टिकण्याची शक्यता. ' प्रिय वस्तु सोडावी ' या इच्छेपेक्षां ' प्रिय वस्तु राखावी ' ही भावनाच अखेर विजयी होणें हें अगदीं स्वभाविक आहे.

आपले निश्चय कां फसतात, याची कारणमीमांसा ही अशी आहे. निश्चया-बरोबर किंवा निर्धाराबरोबर शक्यतेची भावनाहि प्रबळ असेल तरच निश्चय टिकतील. ही भावना निर्माण करणें शक्य आहे का? कीं ही भावना आपल्या आंवाक्याबाहेर आहे? आपल्याला इष्ट वा योग्य त्या भावना निर्माण करतां येतात. विशिष्ट पद्धतीनें विशिष्ट ' सूचना ' आपल्या मनाला देऊन आपल्याला हव्या त्या भावना आपण चित्तांत रुजवून निश्चयपालनच नव्हे तर रोगनिवारणहि करूं शकतों असें सूचना—पद्धतीच्या पुरस्कर्त्यांचें म्हणणें आहे.

ही सूचना पद्धति काय आहे? त्या पद्धतीची थोडक्यांत येथें माहिती देतों.

## संज्ञाशील मन व संज्ञातीत मन

' मी माझ्या मनानें एखादी गोष्ट ठरविली आणि ती आचरणांत आणली,' असें जेव्हां आपण म्हणतों, तेव्हां ज्या मनाची आपल्याला जाणीव असते, त्या मनाच्या प्रेरणेनें आपण कृति केली असें आपल्याला म्हणायचें असतें. ही समजूत चुकीची आहे असें मानसविज्ञ म्हणूं लागले आहेत. आपल्या मनाचे दोन भाग आहेत असें मानसविज्ञांना आढळून आलें आहे. आपल्याला ज्याची जाणीव असते त्या ' संज्ञाशील ' मनाच्या पलीकडे ' संज्ञातीत ' असा मनाचा फार मोठा भाग असतो असा मानसविज्ञांनीं अनुभवानें निष्कर्ष काढला आहे. त्यांच्या या मताचा अर्थ स्पष्ट करण्यासाठीं एक उदाहरण देतों.

## मोहनिद्रित माणसाचें उदाहरण

प्रसिद्ध मानसविज्ञ वुइल्यम मॅकडुगल यानें एकदां एका माणसाला मोहनिद्रा आणली. माणसाला हिप्नॉटाइझ् केल्यानंतर अथवा मोहनिद्रा आणल्यानंतर त्याचें इतर बाह्य जगाचें भान जातें; पण ज्यानें मोहनिद्रेची प्रेरणा दिली असेल त्या प्रेरकापुरतें त्याचें मन जागृत असतें. तो प्रेरक त्याला ज्या सूचना करील त्या तो बिनतक्रार आणि निर्विवाद मानतो. मॅकडुगलनें त्या माणसाला मोहनिद्रा आणल्यानंतर त्याला सांगितलें, ' आज दिवसाचें काम आटोपल्यानंतर, आम्ही दुसरे दोघे खोलींत आहोंत तोंवर तूं खोलीबाहेर जाऊं नकोस.'

त्यानंतर मॅकडुगलनें त्याला मोहनिद्रेंतून मुक्त केलें. संध्याकाळीं काम संपून निघून

जाण्याची वेळ आली तेव्हां हा माणूस खुर्चीवर बसूनच राहिला. मॅक्डुगलनें त्याला म्हटलें, "तूं आतां जाऊं शकतोस. काम झालें आहे आपलें."

त्या माणसानें जायचें नाकारलें. तो म्हणाला, 'मी मागाहून जाईन.' मॅक्डुगलनें व तिथें हजर असलेल्या दुसऱ्या एकानें मिळून त्या माणसाचे खांदे पकडले आणि ते त्याला खोलींतून ढकलूं लागले. त्यानें आपली सगळी शक्ति एकवटून त्यांना स्वतःला ढकलूं दिलें नाहीं! इतर दोघे निघून गेल्यानंतरच त्यानें त्या खोलीबाहेर पाऊल टाकलें!

## संज्ञातीत मनाचें अधिराज्य

निश्चयांच्या विवेचनापासून तो मोह निद्रेंत मिळणाऱ्या सूचनांच्या विवेचनापर्यंत आपण फारच मोठें विषयांतर केलें आहे असें वाचकांना वाटण्याचा संभव आहे. पण या दोहोंचा परस्पर संबंध अत्यंत निकट आहे.

तो असा—

माणूस मोहनिद्रेंत असतांना त्याला बाह्य जगाची संवेदना राहिलेली नसते. त्याचें संज्ञाशील मन हें जागृत नसतें. मग प्रेरकानें दिलेल्या सूचना तो कशा ग्रहण करतो? या सूचना कोणतें मन ऐकत असतें? त्याचें संज्ञातीत मन त्या सूचना ग्रहण करतें. नंतर मोहनिद्रेंतून तो जागा होतो. आतां त्यांचें संज्ञाशील मन जागृत झालेलें असतें. आपण मोहनिद्रित असतां प्रेरकानें आपल्याला काय सांगितलें हें तो साफ विसरून गेलेला असतो. त्याला खोदून खोदून आठवण करायला सांगितलें तरी मोहनिद्रेंत असतांना आपल्याला कोणत्या सूचना दिल्या गेल्या आहेत त्याचें त्याला यत्किंचित्‌हि स्मरण होत नाहीं.

पण ज्या सूचना त्याला मोहनिद्रेंत मिळालेल्या असतात त्या तो बिनचूक पाळतो. वरील उदाहरणांत दिलेली सूचना त्या माणसानें किती धडपड करून पाळली पहा. वस्तुतः तो मोहनिद्रेंत असतां मॅक्डुगलनें त्याला सूचना दिली होती. संध्याकाळीं तो पूर्ण जागृत असतां तोच मॅक्डुगल त्याला पूर्वीच्या सूचनेविरुद्ध वागायला सांगत होता. पण तें त्यानें ऐकलें नाहीं! मोहनिद्रेंत मिळालेल्या सूचनेप्रमाणेंच तो वागला.

याचा अर्थ असा कीं, आपलें आचरण हें संज्ञाशील मनाच्या नियंत्रणाखालीं नसून संज्ञातीत मनाच्या नियंत्रणाखालीं असतें!

समुद्रांत मोठे मोठे बर्फाचे पर्वत असतात, तसें आपलें मन आहे. त्या हिमपर्वतांचा समुद्राच्या पृष्ठभागावर दिसणारा भाग अत्यंत थोडा असतो; त्या मानानें समुद्राखालीं असणारा भाग अत्यंत मोठा असतो. आपल्या मनाच्या संज्ञाशील भागाच्या मानानें त्याचा संज्ञातीत भाग हा कितीतरी मोठा असतो व तो भाग हाच आपल्या एकंदर वर्तनाचा व विचाराचा निर्णायक स्वामी असतो. हा मुद्दा खरोखरी खूप विस्तारानें सांगितला पाहिजे इतक्या महत्त्वाचा आहे. पण आजच्या आपल्या विषयापुरतें त्या मुद्याचें मुख्य सूत्र तेवढें इथें विचारांत घेतलें आहे.

## सूचना संज्ञातीत मनाला पोंचली पाहिजे

केव्हां केव्हां रात्रीं झोंपतांना तुम्हीं मनाशीं म्हणतां, 'उद्यां पांच वाजतां आपण उठायचं बरं का!' आणि आश्चर्य असें कीं खरोखरच बरोबर पांचाच्या टोक्याला तुम्हीं झोंपेंतून जागे होतां. हें नेहमींच घडत नाहीं. कां? कारण उघड आहे. तुमच्या संज्ञातीत मनानें तुमची सूचना जेव्हां ग्रहण केलेली असते तेव्हां तें तुम्हांला पांच वाजतां उठवितें. जेव्हां ही सूचना त्याच्यापर्यंत पोंचत नाहीं तेव्हां अर्थातच पांच वाजून गेले तरी तुम्हीं जागे होत नाहीं.

आपल्या हातून एखादी गोष्ट घडावी असें जर तुम्हांला वाटत असलें तर ती सूचना तुमच्या संज्ञाशील मनालाच केवळ देऊन कांहीं उपयोग नाहीं. तुमच्या संज्ञातीत मनाला ती पोंचली पाहिजे.

हेंच तत्त्व निश्चयांना लागू आहे. हाताच्या मुठी वळून, डोळे गरगरां फिरवून, दांत चावून तुम्ही जरी म्हणालांत कीं, 'उद्यांपासून मी चहा पिणार नाहीं, सिगारेट ओढणार नाहीं, पहांटे पांच नंतर अंथरुणावर लोळत पडणार नाहीं, किमान दोन तास अभ्यास केल्याविना राहाणार नाहीं—' तरी त्याचा कांहींहि उपयोग नाहीं. तुमच्या या सर्व सूचना तुमच्या संज्ञातीत मनापर्यंत पोंचल्या पाहिजेत, त्याला कळल्या, पटल्या पाहिजेत, तरच तुमच्या संवयींत बदल घडेल. तोंवर नुसते आकांताचे निश्चय उच्चारणें हें खरोखरी सोमेश्वरीं आग लागली असतां रामेश्वरीं तांतडीनें बंब घेऊन जाण्याइतकें हास्यास्पद आहे!

निश्चय टिकविण्यासाठीं मग काय केलें पाहिजे? आपल्या संज्ञातीत मनाला या निश्चयांची सूचना पोंचेलसें केलें पाहिजे. हें करतां येण्याचें कांहीं विशिष्ट नियमबद्ध तंत्र आहे का? कीं केवळ योगायोगानें सूचना संज्ञातीत मनाला पोंचतील तेव्हां निश्चय टिकतील आणि पोंचणार नाहींत तेव्हां निश्चय फसतील असें आहे?

असें नियमबद्ध तंत्र आपल्या इकडील योग्यांनीं आणि पश्चिमेंत नॅन्सी येथील सूचनापद्धतीच्या पुरस्कर्त्यांनीं बसविलेलें आहे.

मोहनिद्रेंत प्रेरक हा मोहनिद्रित माणसाच्या संज्ञातीत मनाशीं संबंध राखूं शकतो. मोहनिद्रेंत संज्ञाशील मन कार्यरहित झालेलें असतें आणि संज्ञातीत मनाला जागृति आलेली असते.

आपल्याला दुसऱ्यानें मोहनिद्रा आणल्याखेरीजहि ही मनाची स्थिति जर आपण उत्पन्न करूं शकलों, तर त्यावेळीं आपण आपल्या मनाला दिलेल्या सूचना पाळल्या जातील.

ही मनाची स्थिति कशी निर्माण करतां येईल?

## हा पहिला अभ्यास

रात्रीच्या शांत वेळीं तुम्ही आंथरुणावर पडलां आहांत. इतर स्तब्धता असल्यामुळें घड्याळाचा टिक्-टिक्, टिक्-टिक् हा आवाज तुमच्या कानावर येतो आहे. तुम्ही त्या आवाजाशीं मन एकाकार करा. आपलें सर्वांग आंथरुणावर अगदीं सैल टाकून, शरीराच्या कोणत्याहि भागाला ताण नाहीं अशी खात्री करून घेऊन मग स्वस्थपणें घड्याळाच्या त्या

आवाजावर मन एकाग्र करा. हें एकदम साधणार नाहीं. घड्याळाची टिक्‌टिक् ऐकतांना आपलें मन केव्हां काशीरामेश्वराच्या यात्रेला निघालें, आणि घड्याळाची टिक्–टिक् आपल्याला केव्हां ऐकायला येईनाशी झाली हें तुमच्या लक्षांतहि येणार नाहीं. पण संवयीनें घड्याळाच्या आवाजावर मन एकाग्र करणें साधेल. असें एकाग्र मन त्या आवाजाच्या पुनरावृत्तीला जणूं कंटाळून त्या आवाजापासून माघारीं मुरडून येतें. पण दुसरा कोणता विचार मनांत शिरलेला असतो असेंहि मात्र नाहीं. कोणत्याच विशिष्ट विचारानें मन व्यापलेलें नसून तें थोडा वेळ जणूं निष्पंद बनतें या शून्य अवस्थेंत जी सूचना मनाला मिळेल ती कार्यकारी होते.

या विवेचनानें मनाची कोणती अवस्था नेमकी अभिप्रेत आहे हें कदाचित् वाचकांच्या लक्षांत आलें नसेल. त्यासाठीं त्यांच्या नेहमींच्या अनुभवाचें असें एक उदाहरण सांगतों:—

एखाद्या वेळीं अपरिचित अशा जागीं झोंपण्याचा प्रसंग आल्यानंतर सकाळीं जागें होतांना कोणता अनुभव आला तो वाचकांना स्मरतो काय? तुम्ही डोळे उघडलेत. परंतु नेहमींच्या वस्तु सभोंवार न दिसल्यामुळें आपण कुठें आहोंत हें तुम्हांला नेमकें आठवलें नाहीं. भिंवया आकुंचित करून तुम्ही थोडा विचार केलात आणि मग हळूंहळूं एकेक गोष्ट तुम्हांला आठवली, व आपण अमक्या जागीं झोंपलों होतों याचें तुम्हांला स्मरण झालें.

झोंपेंतून उठतांक्षणींच आणि झोपेची झांपड डोळ्यावर येते तेव्हां, अशा दोन वेळीं आपलें मन धड जागृत नाहीं, धड निद्रित नाहीं अशा स्थितींत असतें. या स्थितींत मनाला ज्या सूचना द्याव्या त्या कार्यकारी होतात असा अनुभव आहे.

या सूचना देतांना कांहीं पथ्यें कटाक्षानें पाळावीं लागतात.

समजा, आपला धूम्रपानाची सवय तुम्हांला मोडून काढायची आहे. तर मग वर सांगितल्याप्रमाणें आपल्या मनाची मोहनिद्रासदृश अवस्था आणून तुम्ही सिगारेट सोडण्याची सूचना आपल्या मनाला द्या. पण त्यावेळीं शब्द कोणते वापराल? 'उद्यांपासून मी सिगारेट सोडली' किंवा 'यापुढें मी एकहि सिगारेट ओढणार नाहीं.' अशी सूचना द्याल तर पस्तावाल. जी सूचना द्यायची ती देतांना तिच्या सत्यतेबद्दल यत्किंचित् शंका तुमच्या मनांत उत्पन्न होतां कामा नये. 'मी यापुढें एकहि सिगारेट ओढणार नाहीं' असें म्हणतां म्हणतां 'पण हें होईल का माझ्या हातून?' ही सभय शंका जर का तुमच्या मनांत उद्भवली—आणि ती उद्भवेलच—तर मागच्या भागांत वर्णिल्याप्रमाणें 'प्रतिनिवृत्त प्रयत्नाच्या कायद्यानुसार' तुमचें धूम्रपानाचें व्यसन अधिक वाढेल. माशी कोळयाच्या जाळ्यांत जितकी धडपडते तितकी ती त्या जाळ्यांत अधिकाधिक गुरफटते, तशी तुमची अवस्था होईल.

सध्यां आपल्या निश्चयांच्या बाबतींत हेंच होत असतें.

मग सूचना कशी द्यायची? धूम्रपानाबद्दलची सूचना अशी असावी—'यापुढ मला धूम्रपानाचा उबग उत्पन्न होईल.'

ही सूचना एखाद्या मंत्रासारखी भराभर उच्चारली पाहिजे. त्या एका सूचनेनें आपलें मन त्या वेळापुरतें भरून गेलेलें असलें पाहिजे.

रात्रीं वाऱ्यानें एकादें खिडकीचें दार फाडफाड वाजत असलें म्हणजे आपलें मन आपल्या इच्छेविरुद्ध त्या आवाजाकडे वेधलें जातें. त्याप्रमाणें जी सूचना आपण देऊं त्या सूचनेचा जपहि आपल्या जणुं इच्छेविरुद्ध चालू राहिला पाहिजे. त्या सूचनेनें आपलें मन पूर्ण व्यापून टाकलें पाहिजे.

अशा सूचना देऊन केवळ आपल्या कांहीं सवयींनाच आपण वळण देऊं शकतों असें नाहीं. सूचनेचा अभ्यास नीट जमला तर आपले अनेक आजार देखील केवळ सूचना पद्धतीनें घालवितां येतात.

या सूचना पद्धतीवर चार्लस बॉदुइन याचा ' सजेश्चन ॲण्ड ऑटोसजेश्चन ' हा ग्रंथ बराच गाजलेला आहे, लॅन्सेटसारख्या वैद्यकीय विषयाला वाहिलेल्या नामवंत नियतकालिकांनीं हा ग्रंथ वाखाणला आहे. या ग्रंथांत केवळ सूचना पद्धतीनें रोग निवारण झाल्याचीं अनेक उदाहरणें ग्रंथकारानें दिलीं आहेत. संधिवातापासून क्षयापर्यंत अनेक रोग सूचनेनें कसे बरे केले याचें वर्णन या ग्रंथांत आहे. डॉ. एमिल कुए यानें या सूचनापद्धतीचा प्रथम पद्धतशीर पुरस्कार केला. माझ्या लेखांनें वाचकांची जिज्ञासा जागृत झाली असल्यास त्यांनीं कुए व बॉदुइन यांचे ग्रंथ अवश्य पहावे.

—द. पां. खां.

---

## भावनेला किंमत आहे

एकदां मी रेल्वेनें जात होतों. यमुनेच्या पुलावर गाडी आली. हृदय पुलकित होऊन जवळच्या एका माणसानें नदींत दिडकी टाकली. शेजारीं एक चिकित्सक गृहस्थ होते. ते म्हणाले, 'आधींच देश दरिद्री. हे लोक असे पैसे व्यर्थ दवडतात.' मीं त्यांना म्हटलें, 'तुम्हीं त्या माणसाचा हेतु नाहीं ओळखला. ज्या भावनेनें त्या दोन दिडक्या त्यानें फेकल्या त्या भावनेची किंमत दोन—चार पैसे होईल कीं नाहीं. ते पैसे इतर सत्कार्यास दिले असते तर जास्त चांगलें दान झालें असतें तें सारें मागून पाहूं. परंतु ही नदी म्हणजे ईश्वराची जणूं करुणा वाहून राहिली आहे, असें मनांत येऊन त्या भाविकाच्या मनांत कांहीं भावना उत्पन्न होऊन त्यानें त्याग केला. त्या भावनेला तुमच्या अर्थशास्त्रांत कांहीं स्थान आहे का ? देशांतील एक नदी पाहून त्याचें अंतःकरण द्रवलें. ही भावना तुम्हांस समजेल तर मग मी तुमच्या देशभक्तीची पारख करीन.'

—विनोबा

# सुश्लोकगीता

: अनुवादक :

वि. के. छत्रे

गीतानुवादें जरि या कुणाला
गीताशय स्वल्प कळून आला
संतोष झाला जरि अंतरास
होई मला नी जगदीश्वरास
× × ×
गीतार्थ चित्तीं दृढची ठसावा
ठसून तो आचरणींहि यावा
म्हणून झालों कविता–प्रवृत्त
कर्ता खरा श्रीहरि मी निमित्त

## अध्याय ११ वा

अर्जुन म्हणाला—

प्रसाद माझ्यावरती कराया निवेदिलें विस्तृत देवराया ।
अध्यात्मनामें मज गुह्य थोर गेला तयानें मम मोह पार ॥ १ ॥

उत्पन्न होतीं कशिं सर्व भूतें जातात तीं केंवि तथा लयातें ।
त्वदीय थोरत्वहि, नाश ज्या न मी ऐकलें सर्व तुझ्याकडून ॥ २ ॥

हें वर्णिलें आपण आपणांस प्रत्यक्ष तैसेंचि पहावयास ।
तें ईश्वरी हो अपुलें स्वरूप इच्छा मला, हे भगवन् अमूप ॥ ३ ॥

पहावया शक्य असे मला तें असें जरी वाटतसे तुम्हां तें ।
योगेश्वरा हो तरि आपुलें तें दावा प्रभो अव्यय रूप मातें ॥ ४ ॥

भगवान् म्हणाले—

पहा पहा शंभरशें हजार मदीयरूपें, गणि कोण पार ।
अनेक वर्णीं, विविधाकृतीही धनंजया, दिव्य तशींच कांहीं ॥ ५ ॥

आदित्य बारा वसु तेवि आठ हे रुद्र पाही अकराहि नीट ।
हे अश्विनी दोन कुमार–यांतें एकूण पन्नास मरुद्गणांतें ॥ ६ ॥

न पाहिलीं आजवरी कधींही नसेल ज्यांची तुज कल्पनाही ।
अनेक दृश्यें तुज ऐशीं, पार्था आश्चर्यकारी दिसतील आतां ॥ ७ ॥

या देहिं माझ्या जग सर्व पाहीं तूं जंगम–स्थावर एक–ठायीं ।
पहावया जें दुसरेंहि कांहीं तूं इच्छिसी, पाहुन तेंहि घेई ॥ ८ ॥

मातें पहाया तव लोचनांनीं सामर्थ्य नाहीं तुजला म्हणूनी ।
मी दिव्यदृष्टी तुज देत आहें हें योगसामर्थ्य मदीय पाहें ॥ ९ ॥

**संजय म्हणाला—**

पार्था सख्यालागिं वदून ऐसें योगेश्वर—श्रेष्ठ जगन्निवासें ।
विशाल ऐसें निजविश्वरूप दावीयलें हे धृतराष्ट्र—भूप ॥ १० ॥
अनेक डोळे वदनें अनेक दृश्यें तशीं अद्भुत तीं अनेक ।
माळा गळां दिव्य, तशींच वस्त्रें उभारलीं दिव्य अनेक शस्त्रें ॥
उटी सुगंधी, सकलांगिं दिव्य सामावलें कौतुक ज्यांत सर्व ॥११—१२॥
हजार ते भास्कर त्या नभांत जरी उदेले सहसा क्षणांत ।
प्रभा तदा दिव्य दिसेल जैशी तुळेल ती स्वल्प हरि प्रभेशीं ॥ १३ ॥
बहु प्रकारांत विभागलेलें तेथेंच एकत्रित जाहलेलें ।
हें विश्व सारें तंव अर्जुनाला श्रीकृष्णदेहीं दिसलें, नृपाला ॥ १४ ॥
पार्था तदा विस्मय होय भारी रोमांच हर्षें उठले शरीरीं ।
देवापुढें मस्तक वांकवूनी वदे तदा तो स्वकरा जुळूनी ॥ १५ ॥

**अर्जुन म्हणाला—**

देवा तुझ्या या दिसतात देहीं सारे ऋषी, देव पणींद्र तेही ।
नानाविध प्राणिसमूह तैसे ब्रह्मा प्रभू, जो कमलांत बैसे ॥ १६ ॥
अनेक बाहू, उदरें अनेक, अनेक डोळे, वदनें अनेक ।
न आदि ना मध्य, न अंत, रूपा त्वदीय, विश्वेश्वर, विश्वरूपा ॥ १७ ॥
हस्तीं चक्र गदा, शिरीं मुकुट, नी सर्वत्र देदीप्यमान्
नेत्रातें दिपवी, असा दिससि तूं तेजोगिरी कीं महान् ।
चंडांशु—द्युति ती निदाघिं, अधिक प्रज्वालिताग्निप्रभा
त्या तेजासम कांहिंशीं, न कुणि ती मापूं शकेनाच भा ॥ १८ ॥
अखेरचें ज्ञेय, न जें विनाशी आधारही शेवटचा जगासी ।
जो रक्षिता शाश्वत धर्म तो तूं सनातनीही पुरुष प्रभो तूं ॥ १९ ॥
न आदि ना मध्य, न ज्यास अंत अनंत बाहू, बलही अनंत ॥
डोळे शशी—सूर्य असे जयाला प्रदीप्त अग्नी मुखही जयाला ॥
अशा स्वरूपी भगवन् तुम्ही जे आहांत ते तापवित स्वतेजें ।
विशाल ऐशा सकला जगातें मातें दिसे यापरि दृश्य येथें ॥ २० ॥
त्वां व्यापिलें, भू—नभ—अंतरातें एकाकिनें, दाहि तथा दिशातें
स्वरूप उग्राद्भुत हें बघूनी त्रैलोक्य गेलें बघ हें भिऊनी ॥ २१ ॥

हे देव संघें शिरती तुझ्यांत भ्याले कुणी प्रार्थिति बद्धहस्त
महर्षि ते आणिक सिद्ध-संघ देवा, तुझ्या बा, स्तवनांत दंग ॥ २२ ॥
हे आदित्य नि विश्वदेव, वसु हे, हे रुद्र, हे अश्विनी
हे सारे पितृदेव आणिक मरुत्, हे साध्य नामें मुनी।
हे गंधर्व नि यक्ष राक्षस तसे हे सिद्ध सारे जन
देवा, पाहत राहिले तुजकडे, साश्चर्य सारे जण ॥ २३ ॥
डोळे नि पोटें नि मुखें अनेक दाढा, भुजा पाय उरू अनेक।
विक्राळ या थोर तुझ्या स्वरूपें भयें जग व्याकुळ, मीहि कांपें ॥ २४ ॥
नानारंगि, तथा नभास भिडला जाऊन उंचावर
तोंडाचा जबडा सताड उघडा, तेजें भरे अंबर।
तेजःपुंज विशाल नेत्र बघुनी हा अंतरात्मा सख्या
झाला व्याकुल, धीर सर्व सुटला, शांतीहि गेली लया ॥ २५ ॥
दाढांमुळें काल-शिखी समान विक्राळ तुझीं वदनें बघून।
दिशा कळेना, मन होई सुन्न देवाधिदेवा झणिं व्हा प्रसन्न ॥ २६ ॥
दुर्योधनादी धृतराष्ट्र-पुत्र सारेहि हे भूपति, सूतपुत्र।
आचार्य हे, द्रोण नि भीष्म थोर, जे आपुले आणिक मुख्य वीर ॥ २७ ॥
भराभरा हे शिरतात सारे विक्राळ ऐशा तुझिया मुखीं रे।
दाढांत कित्येकहि सांपडून दिसे, शिरें होऊनि जाति चूर्ण ॥ २८ ॥
जसे जलाचे अगणीत लोट येतात कीं सागरिं धांव घेत।
मुखांत तूझ्या जळत्या तथा हे नृवीर वेगें शिरतात, पाहें ॥ २९ ॥
प्रदीप्त अग्नींत जसे पतंग मरावयाला शिरती सवेग।
तुझ्या मुखीं धांवत देवराया हे लोक तैसे शिरती मराया ॥ ३० ॥
गिळित सकल लोका पेटलेल्या मुखांनीं
सगळिकडुन, जिव्हा चाटितां कीं फिरूनी।
प्रखर बहुत तेजें, व्यापका देवराया
भरुनि सकलही कीं टाकितां, हो जगा या ॥ ३१ ॥
सांगा असे उग्र आहांत कोण? प्रणाम देवा, मज व्हा प्रसन्न
जाणावया उत्सुक मी तुम्हांतें कळेचिना काय करीतसां तें ॥ ३२ ॥

**श्री भगवान् म्हणाले—**

मी लोक-संहार करावयाला सुसिद्ध तो कालचि वाढलेला।
या सर्व वीरां गिळणार मृत्यु पार्था, न यातें वधिलें जरी तूं ॥ ३३ ॥

शत्रूस जिंकी तरि ऊठ आधीं राज्योपभोगा नि यशास साधीं ।
आधींच मी हे वधिले समस्त तूं अर्जुना केवळ हो निमित्त ।। ३४ ।।
जयद्रथ द्रोण नि कर्णशूर आचार्य हे भीष्म नि अन्य वीर ।
मी मारिले पूर्वींच, भी न कांहीं रणीं तुझाची जय, दे लढाई ।। ३५ ।।

**संजय म्हणाला—**

परिसुनि प्रभु—भाषण यापरी सभय कांपत सद्‌गदित स्वरीं ।
कर जुळून लवून नि वंदुन वदतसे फिरुनी वच अर्जुन ।। ३६ ।।

**अर्जुन म्हणाला—**

हें विश्व हर्षें तव गूण गाई सप्रेम गातांहि रमून जाई ।
पळून जाती भयभीत दैत्य हे सिद्धही वंदिति, होय योग्य ।। ३७ ।।
पितामहाचाहिं पिता, नि थोर तुळा, न कां ते तरि वंदणार ।
अनंत देवेश जगन्निवास 'आहे' 'न' तूं, नाहिं तुळा विनाश ।। ३८ ।।
जुना जुन्यांतील नि आदिदेव तूं आश्रयस्थान जगांस सर्व ।
जाणावया योग्य नि जाणता तूं व्यापी जगा या पद उच्च, तें तूं ।।३९।।
तूं वायु, अग्नी, यम तूं, शशी तूं आजा विधाता नि वरूणही तूं ।
सहस्रवार प्रणिपात देवा पुनः पुन्हा हा प्रणिपात घ्यावा ।। ४० ।।
असो नमस्कार तुला पुढून मागून तैसा सगळीकडून ।
न माप शक्तीस पराक्रमास तूं सर्व कीं व्यापिसि या जगास ।। ४१ ।।
नेणोनी महिमा तुझा, चुकुन वा, प्रेमांत वा येउन
मर्यादा त्यजुनी, समानचि सखा, ऐसा तुला मानुन ।
मी संभाषणिं जें असेन वदलों, कृष्णा, सख्या, यादवा
ऐसें, त्याकरितां क्षमा मज करा, ही प्रार्थना माधवा ।। ४२ ।।
खातां आणि पितां तसेंच शयनीं, वा बैसतां खेळतां
एकाकी असतां प्रभो तुम्हि कधीं लोकांत वा बैसतां ।
थट्टा आणि विनोद यास्तवाचि जें बोलूं नये बोलुन
केला हो अपमान, त्यास्तव करा मातें क्षमा आपण ।। ४३ ।।
पिता प्रभो तूंचि चराचराचा पूजेसि तूं योग्य, गुरू गुरूंचा ।
प्रभावशाली तुजसा न कोणी त्रिलोकिंही, श्रेष्ठ मिळे कुठूनी ? ।। ४४ ।।
प्रार्थी म्हणूनी तनु वांकवून पूज्य प्रभो व्हा तरि हो प्रसन्न ।
पिता सुता, जेंवि सखा सख्यातें निजप्रिया घ्या पदरांत मातें ।। ४५ ।।

झाला मला हर्ष अपूर्वरूपें परी भयें व्याकुल चित्त कांपे ।
तें रूप मातें पहिलेंच दावा प्रसन्न देवा, जगदीश्वरा व्हा ।। ४६ ।।

करीं गदा, चक्र, शिरीं किरीट इच्छा पहाया तव हाचि थाट ।
टाकून हे बाहु तरी हजार धरा प्रभो ते पहिलेच चार ।। ४७ ।।

**श्रीभगवान् म्हणाले—**

पार्था तुला होऊन सुप्रसन्न मी दाविली योगबळें—करून ।
जी आद्य तेजोमय विश्वमूर्ति तुझ्याविना कोणि न पाहिली ती ।। ४८ ।।

यज्ञें न वेदाध्ययनें न दानें कर्मे न वा उग्र अशा तपानें ।
हें रूप माझें तुजवीण अन्या पहावया शक्य महीतलीं या ।। ४९ ।।

स्वरूप हें घोर असें बघून कष्टी न हो, जाइ न गांगरून ।
भीति त्यजी, होउन सुप्रसन्न घे रूप तें हें पहिलें बघून ।। ५० ।।

**संजय म्हणाला—**

देवें असें पंडुसुता वदून स्वरूप तें दाखविलें फिरून ।
त्या सौम्यरूपें भय घालवूनी पार्था दिला धीर तदा प्रभूंनीं ।। ५१ ।।

**अर्जुन म्हणाला—**

हें सौम्य नी मानव देहधारी स्वरूप पाहून तुझें मुरारी ।
आलें अतां हें मन कीं ठिकाणीं मी जाहलों सावधही फिरूनी ।। ५२ ।।

**श्रीभगवान् म्हणाले—**

मिळे पहायास महाप्रयासें तूं देखिलें जें ममरूप ऐसें ।
प्रत्यक्ष तें रूप पहावयास सदैव देवांसहि तीव्र आस ।। ५३ ।।


तूं पाहिलें या मज विश्वरूपीं तसें पहायास मला कदापी ।
कोणा नसे शक्यचि यज्ञदानें वा वेद अभ्यासुन, वा तपानें ।। ५४ ।।

अशा प्रकारें मजला पहाया माझें खरें ज्ञान करून घ्याया ।
तत्त्वें शिराया मजमाजि पार्थ अनन्य भक्तीच करी समर्थ ।। ५५ ।।

माझ्यासाठिंच जो करी सकलही कर्मे सदा आपुली
कोठेंही परि अल्पमात्रहि नसे आसक्ति ज्या राहिली ।
नाहीं वैर कुणाशिंही जगिं, करी प्रीतीच सर्वांवरी
मातें येउन भक्त हा मिळतसे जो ध्यास माझा धरी ।। ५६ ।।

——:x:——

# शब्दांचा महिमा



केरळमध्यें आचार्य विनोबा भावे यांना भेटण्यासाठीं कांहीं साहित्यिक गेले होते. त्यांना उद्देशून विनोबांनीं जें भाषण केलें तें 'भूदान यज्ञ 'वरून येथें दिलें आहे. संस्कृत भाषेतील शब्दांच्या सामर्थ्याबद्दल विनोबांनीं केलेलें हें विवेचन वाचकांना अपूर्व, मनोवेधक आणि विचारप्रवर्तक वाटेल. . .

मला शब्दांची फार किंमत वाटते. शब्दांत जी शक्ति आहे, ती दुसऱ्या कोणत्याहि वस्तूंत आढळत नाहीं. माझ्या जीवनावर शब्दांचा जो प्रभाव पडलेला आहे, त्या अनुभवावरूनच मी हें सांगत आहें. पाणिनीचें एक सूत्र आहे.

'एकः शब्दः सम्यक् ज्ञातः सम्यक् प्रयुक्तः स्वर्गे लोके कामधुक् भवति ' ।

'एक शब्द यथायोग्य अर्थानें जाणला आणि तसाच यथायोग्य अर्थानें वापरला तर स्वर्गातल्या कामधेनूप्रमाणें सर्व अर्थ पूर्ण करणारा होतो.'

आपल्या या संस्कृत भाषेंत शब्द-शक्ति पुष्कळच प्रकट झालेली आहे. इंग्रजी भाषेत लाखों शब्दांचा संग्रह आहे, हें तुम्ही जाणतांच. परंतु तो केवळ शब्दसंग्रहच आहे, त्यापासून शक्ति प्रकट होत नाहीं. एकेका यंत्राचे असंख्य भाग असतात. प्रत्येकाला निरनिराळें नांव असतें. अशा रितीनें एकेका यंत्रामध्यें दहा-दहा, पन्नास-पन्नास शब्दांचा उपयोग केलेला असतो. परंतु अशा तऱ्हेच्या शब्दभांडारामुळें शब्दशक्ति वाढतेच असें नाहीं. जीवनांत जेवढा परिग्रह वाढेल, कचरा वाढेल, तेवढे शब्दहि वाढतील. अशा रितीनें शब्दांचा ढीग लागेल, परंतु त्यायोगें विचारसंपदा वाढणार नाहीं. तसें पाहिलें तर इंग्रजींत विचारसंपदा पुष्कळ आहे. परंतु संस्कृत भाषेत शब्दांचा जो महिमा पहावयास मिळतो, तो तिथें नाहीं. पन्नास नवीन नवीन वस्तु बनवल्या तर त्यांच्यासाठीं पन्नास नवीन शब्दही बनतील परंतु अशा शब्द संग्रहामुळें व्यर्थ परिग्रह मात्र वाढतो. आतां हें पाश्चात्य लोकांनाही कळलें आहे. म्हणून आज एकेका यंत्राच्या भागाला स्वतंत्र नांव दिलें जात नाहीं. आंकड्यांत नांव दिलें जातें यंत्राचा भाग खरेदी करावयाचा असेल तर 'अमूक नंबरचा भाग द्या ' असें म्हणावें लागेल. आंकड्यांतच मागणी करावी लागेल. अशा रितीनें यंत्राच्या अनेक भागांना स्वतंत्र नांवें देण्याऐवजीं आंकड्यांच्या साहाय्यानें काम भागवलें जात आहे. परंतु संस्कृतमध्यें आपल्याला काय दिसतें !

## शब्दांना व्यक्तित्व आहे:—

संस्कृतमध्यें 'विचाराचा प्रतिनिधि' म्हणून शब्द बनवला गेला आहे; जसें— पृथ्वी, जमीन हे शब्द आहेत. इंग्रजी भाषेंत म्हणतात अर्थ् (Earth), लॅटिनमध्यें टेरा (terra) म्हणतात. अशा रितीनें एक शब्द 'अर्थ' आणि दुसरा शब्द 'टेरा'. परंतु संस्कृतमध्यें पृथ्वीला ५० शब्द मिळतात.

'पृथ्वी' म्हणजे पसरलेली. 'धरा' म्हणजे धारण करणारी. 'भूमि' म्हणजे तऱ्हेतऱ्हेच्या पदार्थांना जन्म देणारी. 'गुर्वी' म्हणजे भारी, वजनदार. 'उर्वी' म्हणजे विशाल. 'क्षमा' म्हणजे सहन करणारी. आम्ही लाथ हाणली तरी ती सहन करते. अशा प्रकारें एकेक शब्द म्हणजे गुणवाचक आहे. एकेका शब्दाबरोबर त्याचा एकेक गुण ध्यानांत येतो. कवि कविता करतांना किती किती मात्रांचा शब्द पाहिजे हें पाहतो. अमुक एक मात्रांचा पाहिजे असेल, तर तो जुळवतो व एक छंद बनवतो. आणि छंद बनवण्यासाठींच हे इतके शब्द आहेत, असें समजतात. परंतु हे सर्व शब्द केवळ छंद बनवण्यासाठीं नसून एकेका वस्तूंतील विशेष गुणदर्शन घडवण्यासाठीं आहेत. जेव्हां आपण व्यापक, दूरवर पसरलेली 'पृथ्वी' म्हणतों, तेव्हां त्या पदार्थाकडे आपण आंतरिक दृष्टीनें पाहूं लागतों. अशा तऱ्हेनें संस्कृत शब्दांत विचार भरलेला आहे. प्रत्येक शब्द आपल्याशीं जणूं बोलतो. इंग्रजी शब्द अशा तऱ्हेनें बोलत नाहीं. 'वॉटर' हा शब्द कांहीं बोलत नाहीं. आम्हीच जर त्याच्याशी बोलूं लागलों तर ती गोष्ट निराळी, परंतु संस्कृत शब्द आपल्याशीं बोलायला लागतो, 'पयः' पोषण करणारा 'पानीयम्' तृप्त करणारा, 'उदकं' अंतरांतून बाहेर आलेला. 'समुद्र' हा शब्द छोटासा दिसतो खरा, परंतु तो गोष्टी करतो. 'सम्' म्हणजे चोहोंबाजूला समान रीतीनें पसरलेला. 'उद्' म्हणजे वर आलेलें पाणी आणि 'रम्' म्हणजे आल्हाददायक खेळत असलेला, उसळत असलेला. तेव्हां 'समुद्र' म्हणजे 'सम्+ उद्+रम्'.

'समुद्रात् उर्मिः मधुमान् उदारत्'

वेदानें म्हटलें आहे कीं, या हृदयांत समुद्राप्रमाणें असंख्य भावना उठत आहेत. हें हृदय म्हणजे जणूं समुद्रच आहे. समुद्राचें दृश्य या हृदयांत प्रकट होतें. 'सी' (sea) म्हटलें तर काय कळणार? आहे एक पदार्थ. कारण, तो शब्द बोलत नाहीं, मुका आहे.

'दुग्धम्' म्हणजे दोहन केलेला, साररूप. 'घृतम्' म्हणजे अत्यंत पवित्र निर्मळ, कचरा काढलेला. 'घृतं मे चक्षुः' विश्वामित्र म्हणतो: 'माझे डोळे म्हणजे जणूं तूप आहे'—इंग्रजी अथवा दुसऱ्या कुटल्याहि भाषेंत असें कोणी म्हटलेलें आढळत नाहीं. 'घृतं मे चक्षुः' म्हणजे 'माझे डोळे इतके पवित्र आहेत, कीं कसल्याहि प्रकारचें पाप ग्रहण करण्याची शक्ति त्यांच्यांत नाहीं. ते अत्यंत निर्मळ आणि स्वच्छ आहेत.'

'अग्नि' म्हणजे Fire. फायर म्हटल्यानें काय कळलें? कांहीं नाहीं. परंतु अग्नि म्हणजे 'अंजनात् अग्निः' एकरूप प्रकट झालें, व्यक्त झालें. 'वन्हि' म्हणजे

जो वाहक आहे, संदेश घेऊन जातो तो. यज्ञांत आहुति टाकली तर अग्नि आपली भक्ति वर ईश्वराकडे पोहोंचवितो. तेव्हां 'अग्निमीळें पुरोहितम्' याच्या-ऐवजीं 'वन्हिमीळे पुरोहितम्' हें नाहीं चालणार. अगदींच निराळा अर्थ होईल. अशा तऱ्हेनें एकेका शब्दाचें कांहीं विशेष महत्त्व आहे. संस्कृतमध्यें एकेका शब्दाला व्यक्तित्व आहे. 'पीयूषं', 'अमृतं' आणि 'सुधा' हे तीन शब्द अमृतासाठीं आहेत, परंतु प्रत्येकापासून विशेष अर्थाचा बोध होतो. 'अमरा निर्जरा देवाः' अमरकोशाचा आरंभच या वाक्यानें होतो. पण 'अमरा' निराळे आणि 'निर्जरा'हि निराळे. अमर तो कीं जो मरत नाहीं. परंतु समजा कीं, एक वृद्ध आहे; रोगानें पिडलेला आहे, तर तो काय अमर होणें पसंत करील? तो ईश्वराची प्रार्थनाच करील कीं, 'मला लौकर घेऊन जा.' म्हणून 'निर्जरा' म्हटलें आहे. 'निर्जरा' म्हणजे जरारहित. जरारहित जो असेल, तो अमर होऊं शकतो.

## शब्दांतर्गत प्रवेश

संस्कृतच्या शब्दकोशांतहि काव्य आहे! एकेका शब्दाची किती तरी प्रकारची व्युत्पत्ति असते. एका शब्दाचे अनेक अर्थ आणि अनेक अर्थांचा एक शब्द! म्हणून संस्कृतमध्यें जेवढ्या निर्मळपणाने वाक्दर्शन होतें तेवढें क्वचितच दुसऱ्या कुठल्या भाषेंत होत असेल. मला सांगा-वयाचें आहे तें हें कीं या देशांत शब्दशक्ति पुष्कळ आहे. ॲरेबिक, ग्रीक, लॅटिन या भाषांतहि कांहीं शक्ति आहे. त्यांच्याशीं थोडी तुलना होऊं शकते; परंतु संस्कृत-मधला शब्द जसे व्याख्यान द्यायला सुरुवात करतो, तसें या भाषांतील शब्द देत नाहींत. 'घट' हा शब्द आहे. 'घट' म्हणजे घडा—घागर. परंतु 'घट' म्हणजे शरीर असाहि अर्थ होतो. घागरींत पाणी ठेवतात, तसें या शरीरांत काय आहे? पाणीच भरलेलें आहे. पूर्ण कुंभ—पाण्यानें भरलेली घागर घेऊन आपण स्वागत करतों. यामधून आपल्याला काय दाखवावयाचें असते? 'आमचें हें सारें हृदय भक्ति-भावनेनें भरलेलें आहे'—या अर्थानें हा 'घट' शब्द उपयोगी पडेल. नानकांनीं म्हटलें आहे: "प्रभू घट घट में भरा है।" माझ्यासमोर जे बसले आहेत, ते सर्व 'घट'च आहेत. सर्व भरलेले आहेत, परंतु कशानें भरलेले आहेत कुणास ठाऊक! कांहीं निरुपयोगी वस्तूंनींहि भरलेले असूं शकतील. सांगण्याचा मथितार्थ असा कीं, 'घट' शब्दांतील ही जी खुबी आहे, ती पॉट (Pot) शब्दांत कांहीं येत नाहीं. कारण 'घट' याची एक घटना आहे ना! आपल्या या शरीराची एक घटना आहे. 'घट' हा शब्द ही घटना सूचित करतो. अशा तऱ्हेनें इंग्रजी, फ्रेंच आदि आप-ल्याला त्यांच्या आंत प्रवेश करूं देत नाहींत. परंतु येथील शब्द असा प्रवेश करूं देतात. आणि म्हणूनच शब्दांची शक्ति प्रकट होते.

## आपलें दुर्लक्ष

'चक्षु' शब्द आहे. 'चक्ष' हा धातु निर्मलतेचा, स्वच्छतेचा द्योतक आहे. डोळ्यांनीं जेवढें आपण बोलतों तेवढें तोंडानीं बोलत नसतों. आपल्याला राम

येतो, तेव्हां डोळे बोलतात. अंतःकरणांत करुणा असेल, तर डोळे बोलतात. शब्दांपेक्षांहि अधिक प्रकाश डोळे देत असतात. त्याचप्रमाणें 'व्याचक्षते' म्हणजे व्याख्यान देणें चक्षुपासूनच व्याख्यान हा शब्द निघाला. आम्हां हिंदुस्तानच्या लोकांची महापुरुषांच्या दर्शनावर जेवढी श्रद्धा आहे, तेवढी कांहीं व्याख्यान ऐकण्यावर नाहीं. महापुरुषांच्या डोळ्यांवाटे जें दिसतें, तें कोणत्याहि अन्य रीतीनें प्रकट होत नाहीं. त्यांच्या डोळ्यांत कारुण्य भरलेलें असतें. 'कारुण्य' म्हणजे काय ? Mercy, Kindness कांहींहि म्हणा; अर्थ प्रकट होत नाहीं. परंतु 'करुणा' काय सांगते ? कांहीं ना कांहीं करण्याची प्रेरणा देते. हृदयांत प्रेम आहे, पण तें व्यक्त करण्याची प्रेरणा नसेल, तर ती करुणा नव्हे. करुणा स्वस्थ बसत नाहीं. लोक विचारतात; 'बाबा कां फिरत आहे ! इतकें फिरतों आहे, थकवा कसा नाहीं ?' तेव्हां ही जी 'करुणा' आहे ती बाबाला फिरवीत आहे. तीच त्याला कांहीं तरी करण्याची प्रेरणा देत आहे. ती बसूं देत नाहीं. एखाद्या लहान मुलाला जर विंचू चावला तर काय आपण पहात बसतों ? त्यांच्या सेवेसाठीं एकदम धांवून जातों. करुणा जागेवर स्वस्थ बसूं देत नाहीं. आणि हेंच तिचें विशेष लक्षण आहे. माझ्यापुढचें हें शुभ्र वस्त्र मी पाहातों आहें. शुभ्र म्हणजे काय ! 'शुभ्र' म्हणजे पवित्र. 'शुभ्र' म्हणजे केवळ White नव्हे. 'शुभ' या शब्दाशीं त्याचा संबंध आहे. 'शोभा' याहि अर्थाशीं त्याचा संबंध आहे. तेव्हां 'शुभ्र' या शब्दांत सौंदर्य आणि पावित्र्य एकरूप झालें आहे. पुढें आकाशांत 'शुक्रा'चा उदय होतो. शुक्र पवित्र आहे. 'शुचि' या शब्दापासून 'शुक्र' हा शब्द बनलेला आहे. शुक्राला पाहतांच पावित्र्याची भावना प्रकट होते. आतां आकाशांत 'सूर्य' आहे. तो सर्वांना प्रेरणा देतो. 'सू' धातूपासून 'सूर्य' हा शब्द बनला. 'सू' म्हणजे प्रेरणा देणें. 'मित्र' शब्द आहे. मित्र काय करतो ? प्रेम करतो. सूर्याला 'मित्र' ही संज्ञा हिंदुस्थानचे लोक देतात. आपल्या किरणांच्या द्वारा तो प्रखर वाटला, तरी आपण त्याला घाबरत नाहीं. मित्र तोच होऊं शकतो कीं जो आपल्याकडून कार्य करवून घेतो. आपण झोपलेलों असतों, तेव्हां तो उठवतो, बसलेलों असतों तेव्हां काम करवून घेतो; हें सर्व करणाराच मित्र होय. तेव्हां 'मित्र' ही संज्ञा केवळ सूर्यवाचक नाहीं, तर प्रेमानें सर्वांची सेवा करणारा, असाहि अर्थ त्यांत आहे. मी येथें बसलों आहे, खोलीचे दरवाजे बंद आहेत, सूर्यनारायण तिकडे उगवत आहे, तेव्हां तो काय करील ? बाहेरच बसून राहील. माझी सेवा करण्यासाठीं, सेवक या नात्यानें तो दरवाजावर हात ठेवून उभा राहील. मी थोडासा दरवाजा उघडतांच थोडासाच आंत येईल. एकदम सगळें दार उघडीन तर तोहि आंत मुक्त प्रवेश करील. परंतु दरवाजा बंद आहे म्हणून दाराला धक्का देणार नाहीं, बाहेरच उभा राहील. ही 'मित्रा'ची मर्यादा आहे. कधींहि गैरहजर राहणार नाहीं. मालक हवें तर उशीरापर्यंत झोपून राहील, पण तो नाहीं झोंपणार. सेवकाचें संपूर्ण चित्र आपण सूर्यात पाहूं शकतों. अशा रीतीनें शब्द आपल्याशीं बोलत असतात.

भारतांत अशा प्रकारची साहित्यशक्ति आहे, यांकडे आत्तांपर्यंत आपलें लक्ष गेलें नव्हतें. आपण जीवनाच्या आंत जोंपर्यंत प्रवेश करणार नाहीं, तोंपर्यंत आपलें लक्ष या गोष्टीकडे जाणार नाहीं. 'सुमन' म्हणजे उत्तम पुष्प. तें आपण अर्पण करतों म्हणजे आपलें जें जें स्वच्छ, निर्मळ मन आहे, तेंच आपण अर्पण करीत असतों. 'सुमन' या शब्दांतली ही खुबी दुसऱ्या शब्दांत नाहीं. हें सर्व ध्यानांत घेऊन आम्हांला आमचें चिंतन नीट रीतीनें करावयाचें आहे आणि तेव्हांच दुसऱ्या देशापेक्षां हिंदुस्तानचें चिंतन निराळ्या प्रकारचें होईल.

## शब्दांची आवक

आज काय होत आहे? बाहेरून—Imported—शब्द आणले जात आहेत. ते शब्द आमच्या भाषेवर लादले जात आहेत, परिणाम असा होतो कीं, हे शब्द कांहीं आमच्या जीवनाशीं Assimilate—एकरूप होत नाहींत.

आतां ही 'सेक्युलर स्टेट' ची कल्पना आहे. ही कल्पना अगदीं एकांगी स्वरूपाची आहे. आम्हांला ती assimilate होऊं शकत नाहीं. युरोपांत तशी परिस्थिति होती, त्यामुळें तशा प्रकारचा रिवाज चालूं शकत होता. हिंदुस्तानांत धर्म या शब्दाचा उदय झाला. धर्म म्हणजे काय? सर्वांना धारण करणारा, 'स्टेट' चेंहि धारण करणारा. 'स्टेट' चा धर्माशीं कांहीं संबंध नाहीं, असें जर कोणी म्हणेल, तर त्याचा हिंदुस्तानांत अगदींच निराळा अर्थ होईल, 'सेक्युलर म्हणजे काय परलोकाचा विचार न करतां या इहलोकाचा विचार करणारीच संस्था! आणि तरीहि 'एकता,' 'समता' या गोष्टीवर विश्वास! या विरोधी कल्पना कशा मानल्या जातात? इहलोकाची प्रतिष्ठा करूं आणि सर्वांना जर सारखा मताधिकार देऊं, तर मग आतां सांगा समान मताधिकाराचें अधिष्ठान भौतिक सृष्टीला काय अनुकूल आहे? याचें उत्तर त्यांच्याजवळ नाहीं. बाह्य समानता तर कुठल्याहि परिस्थितींत होऊं शकत नाहीं. कारण एखादा बलवान् असतो तर दुसरा दुर्बल असतो. बुद्धिबद्दलहि तेंच. कोणाला बुद्धि असते तर कोणाला नसतेच. एकाच घरांत ज्ञानीहि असतो आणि अज्ञानीहि असतो. तेव्हां सर्वांना एक मताचा अधिकार देण्यांत काय न्याय आहे? याचें उत्तर आध्यात्मिक सृष्टींत गेल्याशिवाय मिळणार नाहीं. आपण सर्वांना एक मताचा अधिकार दिला आहे, म्हणजेच आपण आत्मिक एकता कबूल केली आहे. बुद्धीचीच जर मर्यादा घालून घेतली असती तर माणशीं एकमताचा विचार खतम् झाला असता. पण तरीसुद्धां आपण सर्वांना एक मत दिलें आहे; तेव्हां कसलें साम्य पाहिलें? भौतिक साम्य पाहिलें? नाहीं. आत्मिक साम्य पाहिलें. याचाच अर्थ असा कीं आपण आत्म्याची एकता मान्य केलेली आहे. तेव्हां आम्ही केवळ भौतिक चिंतनच करतों हा दावा करतां येणार नाहीं. म्हणजे 'सेक्युलर स्टेट' मध्यें 'आध्यात्मिक मूल्य' मान्य केलें. 'सेक्युलर स्टेट' या शब्दाची न्यूनता ध्यानांत आली, तेव्हांच सर्वांना एक मताचा अधिकार देण्यांत आला. योग्य शब्दांचा उपयोग केला गेला तर ठीक, नाहीं तर त्यायोगें चुकीचीहि धारणा होऊं शकते. 'इंडिपेंडन्स' हा किती अर्थशून्य शब्द आहे. जगांत

काय चालते ? प्रत्येक व्यक्ति एकमेकावर अवलंबून असते. तेव्हां मग कुठें आहे इंडिपेंडन्स. परंतु 'स्वराज्य' हा शब्द Positive अर्थ दर्शवितो. तें राज्य स्वतःचें असतें. स्वयंप्रकशित असतें. आज येथें आम्ही परदेशांतलीच बुद्धि घेतों, तेव्हां मग हें 'स्वराज्य' कसें होणार ? केवळ आम्ही आमचें राज्य चालवतों, एवढ्यानें काय स्वराज्य झालें ! वेदांत आदित्याला स्वराज्याची उपमा दिली आहे. सूर्य आहे 'स्वराट्', कारण तो स्वयंप्रकाशित आहे. चंद्र आहे परप्रकाशित. वेदांत अत्रिमंडळांत म्हटलें आहे : 'यतेमहि स्वराज्ये'– स्वराज्यासाठीं आम्हीं प्रयत्न करीत आहोंत. त्या काळीं त्यांच्यावर कोणाचें तरी राज्य होतें, अथवा ते परतंत्र होते, अशी तुमची कल्पना आहे काय ? परंतु तसा अर्थ नाहीं. त्याचा अर्थ असा आहे कीं जोंवर बुद्धि आत्मनिष्ठ होत नाहीं, तोंवर स्वराज्य नाहीं. आंतून प्रकाश मिळेल, तरच स्वराज्य प्रकट होईल. परंतु आपण म्हणतां 'इंडिपेंडन्स'; पण कोणाचें कोणाशीं पटत तर नाहीं !

## सोशॅलिझम–एक अर्थशून्य शब्द

आतां म्हटलें जातें कीं 'सोशॅलिस्टिक स्टेट' बनवायचें आहे हिटलरचाहि एक प्रकारचा सोशॅलिझमच होता. या शब्दांतून कांहीं अर्थच निघत नाहीं. व्यक्तीला समाजापासून अलग काढलें जातें आणि समाज व्यक्तीपासून निराळा समजला जातो, तेव्हां मग कसा अर्थ निघणार ? जे कल्पनेंतहि अलग होऊं शकत नाहीं तें अगोदर अलग केलें गेलें आणि मग दोघांमधला संघर्ष मान्य केला गेला आतां म्हणतात, हा संघर्ष मिटविण्याकरितां सोशॅलिझम् आणला पाहिजे.

आज प्रत्येकजण आपआपला स्वार्थ पाहतो आहे. सर्व चिंतनच चुकीच्या मार्गानें चाललेलें आहे. जोंपर्यंत आपण आपल्या शब्दांची शक्ति जाणणार नाहीं आणि जोंपर्यंत आपण पश्चिमेकडून शब्द घेत राहूं, तोंपर्यंत आपलें चिंतन अशाच चुकीच्या मार्गानें चालू राहणार. आपण आपल्याच शब्दांत चिंतन करूं तर सर्व दुनियेपेक्षां आपलें चिंतन निराळें होईल आणि हें सर्व साहित्यिकांना करावयाचें आहे. इंग्रजी, चिनी, जपानी, फ्रेंच अनेक भाषांतून साहित्य आहे. जी चांगली गोष्ट आहे. आणि आपल्या लायक आहे ती तेथून घेतली पाहिजे हें खरें आहे. पण अशीच गोष्ट आपण घेतली पाहिजे कीं जी आमच्या शब्दांत बसते. ती गोष्ट जर आमच्या शब्दांत नीट बसत असेल तर ती आपल्या दृष्टीनें ठीक आणि नीट बसत नसेल तर चुकीची आहे, असें समजलें पाहिजे. आपल्या चिंतनांत पुष्कळसे चुकीचे शब्द आहेत. परिणामीं चिंतनच चुकीचें होत आहे. म्हणूनच शब्द–शोधनाचें कार्य साहित्यिकांनीं केलें पाहिजे, लोकांच्यासमोर योग्य शब्द ठेवले पाहिजेत. आणि तेव्हांच पुष्कळशीं भांडणें मिटतील.

## हें सारें सत्पुरुषांचेंच कार्य

आज एका गृहस्थांनीं मला प्रश्न विचारला कीं, 'अनेक संत पुरुष होऊन गेले. त्यांनीं कित्येक गोष्टी सांगितल्या, परंतु जबरदस्ती केल्याशिवाय का कोठलें काम होऊं शकते !' परंतु इतके साधुसंत होऊन गेले म्हणूनच आम्ही आज जसे आहोंत तसें राहिलों आहोंत, हें लक्षांत घेतलें पाहिजे ते जर नसते तर आपण जनावर बनलों असतों. आपण कोठून कोठवर आलों आहोंत याचा विचार

करा. महाभारतांत प्रसंग आहे, प्रश्न उद्‌भवला आहे कीं, पत्नीवर पतीचा हक्क आहे कीं नाहीं ? त्या वेळीं हा प्रश्न फार कठिण वाटला. मोठमोठे ज्ञानी, विद्वान् लोक तेथें होते. परंतु भीष्म, द्रोण, विदुर सर्वजण विस्मित बनले. कोणीहि या प्रश्नाचें उत्तर देऊं शकलें नाहीं. परंतु आजचा लहान मुलगाहि या प्रश्नाचें उत्तर जाणतो. विदुर म्हणजे काय ? पाणिनीचें सूत्र आहे : 'यथा विदुर भिदरौ' भेद करण्यांत अत्यंत प्रवीण तो भिदुर. भिदुर म्हणजे तोडणारा–फोडणारा. तोडणारें–फोडणारे तर वज्र असतें. वज्रालाच भिदुर म्हणतात. सूत्रांत हेंच सांगितलें आहे कीं विद् आणि भिद् हे दोन धातु असे आहेत कीं ज्यांना 'उरु' प्रत्यय लावून विशेष अर्थांचे शब्द बनले आहेत. 'भिद्' धातूला 'उरु' प्रत्यय लावून 'भिदुर' शब्द बनला. त्याचा अर्थ होतो भेद करण्यांत प्रवीण. आणि 'विद्' धातूला 'उरु' प्रत्यय लावून 'विदुर' हा शब्द बनला. त्याचा अर्थ होतो महाज्ञानी. असा महाज्ञानी तेथें बसला होता. पण तरीसुद्धां निर्णय होऊं शकला नाहीं. प्रश्न असा होता कीं चैतन्यमय प्राण पणाला लावतां येतो कीं नाहीं ? धर्मराज धर्मनिष्ठ, सत्यनिष्ठ राजा होता. त्याला द्यूताचें निमंत्रण दिलें गेलें तेव्हां तो 'नाहीं' म्हणूं शकला नाहीं. नकार देणें हें धर्माच्या विरुद्ध आहे, अशी त्याची समजूत. आज द्यूत खेळणें बेकायदेशीर आहे, अनैतिक आहे, असें कायदाहि म्हणेल. परंतु धर्मराज त्या वेळीं नकार देऊं शकला नाहीं. अधर्म होईल अशी त्याला भीति वाटत होती. केवढ्या संकुचित कल्पना होत्या ! परंतु त्या काळापासून या काळापर्यंत आपण आलो आहोंत. हें सारें सत्पुरुषांचेंच कार्य आहे.

## शब्दशुचित्वाकडे लक्ष द्या

आज जगांत सर्वजण जागतिक शांततेकरतां (World peace) प्रयत्न करीत आहेत. परंतु होत मात्र कांहींच नाहीं. याचा अर्थ मात्र असा नव्हे कीं संतांनीं आणि महापुरुषांनीं जें कार्य केलें आहे त्याचा कांहींच प्रभाव पडलेला नाहीं. 'पीस' आज अशासाठीं नाहीं कीं त्या शब्दांत कांहीं अर्थच नाहीं. तो शब्दच अर्थशून्य आहे. ज्याला आपण 'शांति' म्हणतों ती 'पीस' नव्हे. ही 'पीस' तर Voilent (हिंसक) होऊं शकते. एखाद्या देशावर व्यापारी बहिष्कार घातला जातो. ही अगदीं 'पीसफुल ॲक्शन' आहे. परंतु त्यांतही 'हिंसा' होते. तेव्हां ही 'शांति' नव्हे. 'शांति' या शब्दाचा 'पीस' या शब्दाशीं कांहींहि संबंध नाहीं. 'पीसफुल' म्हणजे प्रत्यक्ष लाठी चालवणार नाहीं इतकेंच. मग युक्तिप्रयुक्तिनें केलेलें कामहि 'पीसफुल' समजलें जातें. म्हणून 'पीस' हा शब्द विश्वशांति स्थापन करण्याच्या दृष्टीनें अगदीं कुचकामाचा शब्द आहे. पाश्चात्य शब्दांमुळें आपल्या चिंतनांत सर्व विचारदोष शिरतात. म्हणून यापुढें आतां साहित्यिकांना एवढेंच करावयाचें आहे कीं त्यांनीं शब्दशुचित्वाकडे लक्ष द्यावें. शुद्ध शब्दाचा जर आविष्कार होईल, तर आचारविचारहि शुद्ध होईल.

---

# वंशश्रेष्ठत्व आणि वर्णश्रेष्ठत्व दोन भ्रामक कल्पना

‘ जगांत कांहीं मानव–वंश हे इतर मानव–वंशांपेक्षां श्रेष्ठ आहेत, म्हणून त्यांनीं जगावर प्रभुत्व गाजवावें आणि इतर मानव–वंशांनीं आपली कनिष्ठता ओळखून आपखुषीनें त्या श्रेष्ठांचें दास्य पत्करून सुखानें राहावें, ’ अशी कल्पना प्राचीन कालापासून आजतागायत प्रचलित आहे. या कल्पनेपोटींच गोऱ्यांनीं काळ्या लोकांना पायदळीं तुडविलें आहे, युरोपीय लोकांनीं आशियाई लोकांवर वर्चस्व गाजविण्याचा सतत प्रयत्न केला आहे, ‘ आर्यन् ’ लोकांनीं यहुद्यांना छळलें आहे. ही वंशश्रेष्ठत्वाची कल्पना कितपत बरोबर आहे ! तींत कितींसें तथ्य आहे ?

या प्रश्नाचा विचार समाजशास्त्रानें आपल्यापरी केला आहे. आतां या प्रश्नाचा उलगडा करण्यासाठीं मानसशास्त्रहि आपल्या पद्धतीनें प्रयत्न करीत आहे. या पद्धतींत माणसाचा मनोविकास आणि बुद्धिविकास मापला जातो. आफ्रिकेंतील निग्रो आणि महाराष्ट्रांतील ब्राह्मण यांच्या बुद्धीचें मोजमाप घेऊन जर असें आढळलें कीं, निग्रो व ब्राह्मण यांमध्यें बुद्धीचें परिमाण सारखेंच आहे, तर निग्रो हा ब्राह्मणापेक्षां कनिष्ठ, निदान बुद्धीनें कनिष्ठ असें म्हणतां यायचें नाहीं.

## बुद्धिमापनाची रीत

हें बुद्धिमापन करण्याची रीत कोणती ! एक फ्रेंच मानसशास्त्रज्ञ आल्फ्रेड बिने यानें एक ‘ बुद्धिमापन–कसोटी ’ तयार केली. त्यानें कांहीं विशिष्ट सोप्या सोप्या प्रश्नांचे गट तयार केले. अमका प्रश्न–गट इतक्या वेळांत सोडविणाऱ्या माणसाचें मानसिक वय अमुक असें ठरविणारी कसोटी अनेक प्रयोगांअंतीं त्यानें तयार केली. या कसोटीचाच उपयोग करून विविध मानव–वंशांची बुद्धिविषयक भिन्नता अजमावून पहाण्याचा प्रयत्न अनेक मानसविज्ञांनीं सध्या चालविला आहे.

ही कसोटी लावतांना अर्थातच ज्यांना प्रश्न विचारायचे त्यांची सांस्कृतिक आणि सामाजिक पार्श्वभूमि लक्षांत घ्यावी लागते. अमेरिकन मानसविज्ञ एस्. एल्. प्रेसी यानें एक गमतीचें उदाहरण आपल्या ‘ सायकॉलॉजी अँड धि न्यूअर एज्युकेशन ’ या ग्रंथांत दिलें आहे

## गंमतीचें उदाहरण

केंटकींतील डोंगराळ मुलखांतल्या मुलांचें बुद्धिमापन एक संशोधक करीत होता. हा मुलुख मागासलेला व शिक्षणाच्या सोयी कमी असलेला असा होता. या संशोधकानें आपल्या प्रश्नावलींतला पुढील एक प्रश्न एका मुलाला विचारला,—

'जर तूं दुकानांत जाऊन सहा सेंटची चिकी विकत घेतलीस आणि दुकानदाराला दहा सेंट दिलेस तर तुला किती सेंट परत मिळतील ?'

मुलानें उत्तर दिलें, 'माझ्याशीं दहा सेंट कधीं असतच नाहींत, नि कधीं मिळालेच तर मी ते चिकीसाठीं खर्च करणार नाहीं. आधीं घरांत आईच तर चिकी तयार करते !'

परीक्षकानें पुन्हा प्रयत्न करून पाहिला, 'समज,' तो म्हणाला, तूं दहा गाई चरायला घेऊन गेलास. त्यांतल्या सहा कुठें हरवल्या तर तू घरीं किती गाईंना परत आणशील ?'

मुलगा म्हणाला, 'आमच्या घरीं दहा गाई नाहींत. पण असल्या आणि सहा हरवल्या तर मला घरीं परत जायचं धाड-सच करवणार नाहीं !'

परीक्षकानें अखेरचा प्रयत्न करण्यासाठीं पुन्हा विचारलें, 'शाळेंत दहा मुलं असलीं आणि त्यांतल्या सहांना कांजिण्या आल्या तर बाकी मुलं शाळेंत किती रहातील ?'

'शून्य !' तत्काळ उत्तर मिळालें, 'शून्य ! कारण इतर मुलांनाहि कांजिण्या होण्याची भीति वाटेल नि तींहि शाळेंत येणार नाहींत.'

## परिस्थितीचें महत्त्व

या विशिष्ट उदाहरणांतील मुलगा दहां-तून सहा उणे करूं शकत नाहीं असा याचा अर्थ नाहीं. परंतु प्रश्नांतील परि-स्थिति ही कितपत खरी मानायची याबाब-तचा मुलांचा समज हाहि त्याचें बुद्धि-मापन करतांना विचारांत घ्यावा लागतो.

एखाद्या अस्पृश्य मुलाला जर तुम्हीं प्रश्न केलात कीं, 'समज, तूं नि एक ब्राह्मण मुलगा असे दोघेजण फुलं घेऊन देवळांत पूजा करायला गेलांत...' तर तुमचा प्रश्न पुरा होण्याच्या आंतच तो भयानें गर्भगळित होऊन जाईल; मग प्रश्नाचें उत्तर देणें दूरच राहिलें !

बुद्धिमत्तेचें मापन करतांना ज्यांना प्रश्न विचारायचे त्यांची रहाणी व संस्कार या गोष्टी अवश्य विचारांत घ्याव्या लाग-तात. प्रो. एस्. डी. पोर्टियस यांनीं 'धि सायकॉलॉजी ऑफ ए प्रिमिटिव्ह पीपल' या आपल्या ग्रंथांत एक मजेदार अनुभव दिला आहे. ऑस्ट्रेलियन खुज्या टोळी-वाल्या लोकांच्या एका गटाचें बुद्धिमापन ते करीत होते. त्यांनीं अनेक व्यूहांचीं चित्रें काढलीं होतीं, व त्या व्यूहांतून वाट काढ-ण्याचा प्रश्न त्यांनीं त्या गटांतील टोळी-वाल्यांना विचारला होता. प्रत्येक माणसानें स्वतंत्रपणें आपल्यापुढील व्यूहांत रेषा काढून व्यूह बाहेर पडण्याचा मार्ग दाख-वायचा होता. पण या ऑस्ट्रेलियन रहिवा-शांना हा प्रश्नच मोठा विचित्रपणाचा होता. कारण असें कीं, आपले सगळे प्रश्न एकमेकांची सल्लामसलत घेऊन सोडवि-ण्याची त्यांची जन्मजात रीत आहे. त्यामुळ जेव्हां व्यूहांतून वाट दाखवितांना

ते अडत, तेव्हां परीक्षक आपल्याला मदत करीत नाहीं या गोष्टीचें त्यांना स्वाभाविक मोठें नवल वाटे. अर्थातच या कसोटींत वस्तुतः त्यांच्या ठिकाणीं असलेल्या अंगभूत बुद्धीपेक्षां कमी बुद्धि असल्याचें दर्शविणारे गुण त्यांना मिळाले यांत आश्चर्य नाहीं.

## संस्कारांचें महत्त्व

स्पर्धेत झटपट आपल्यापुढील काम संपवून इतरांवर ताण करण्याची वृत्ति आपल्या 'पुढारलेल्या' समाजांत आढळते. पण ही वृत्ति जिथें नाहीं तिथें आमच्या संस्कृतीला साजेशा कसोट्या निरर्थक ठरतात. ऑटो क्लिनबर्ग यानें याकिमा नांवाच्या एका अमेरिकन इंडियन टोळींत तेथील समाजजीवनाचें संशोधन चालविलें होतें. त्यानें कांहीं 'कृति—कसोट्या' तयार केल्या होत्या. निरनिराळ्या आकाराचे लांकडी ठोकळे मुलांना देऊन त्यांची विशिष्ट आकृति झटपट कमींत कमी वेळांत बनवून दाखवायची, अशी ही कसोटी होती. पण या 'रेड इंडियन' मुलांना 'हा एवढी धांदल कां करतो' हेंच कळेना. त्यांचें सगळें जीवन शांत नि सावकाश. त्यांत धांदलीचा संबंध क्वचितच येई. त्यामुळें त्यांनीं आपल्या संस्कारानुसार सावकाश ते ठोकळे रचले. अर्थातच सुधारलेल्या गोऱ्या मुलांपेक्षां त्यांना वेळ अधिक लागला; पण त्याबरोबरच त्यांच्या चुका त्या प्रमाणांत खूप कमी झाल्या.

याच मानसविज्ञानें 'दक्षिण डाकोटा' मुलखांतील डाकोटा इंडियनांची कसोटी पहाण्याचे प्रयोग केले होते. या इंडियनांच्या रीतीभातींत एक रीत अशी आहे कीं, अनेक लोकांना एक प्रश्न विचारला असला आणि त्या अनेकांपैकीं एखाद्याला त्या प्रश्नाचें उत्तर देतां येत नसलें, तर त्याच्यादेखत दुसऱ्या कोणी उत्तर देणें हें चांगलें नव्हे. याच इंडियन मुलांत अशीहि भावना दृढ केलेली असते कीं, आपल्याला एखाद्या प्रश्नाचें उत्तर नक्की माहीत नसलें तर केवळ तर्कानें कांहींतरी उत्तर द्यायचें नाहीं. या मुलांना प्रश्न विचारले म्हणजे तीं अंदाजी उत्तर कधीं देत नाहींत. स्वाभाविकच त्यांना कसोटींत गुण कमी मिळतात.

प्रो. एस्. ई. ॲश यांनीं ॲरिझोनामधील होपी इंडियन मुलांच्या बुद्धीचें मापन करण्यासाठीं कांहीं कसोट्या ठरविल्या. या मुलांमध्यें एकमेकांशीं स्पर्धा करणें हें वाईट असें बिंबविलेलें असे. एकदां या मुलांचें बुद्धिमापन करण्यासाठीं शिक्षकानें फळ्यावर गणिताचे कांहीं साधे प्रश्न लिहिले आणि नंतर मुलांना फळ्यासमोर रांगेंत उभें केलें. आपलें उत्तर तयार झालें कीं त्या मुलानें फळ्याकडे पाठ करायची असें शिक्षकानें सांगितलें होतें. परंतु आपलें उत्तर तयार झालें कीं मुलें इतरांकडे पाहूं लागली, व सगळ्यांनीं उत्तर काढलें अशी खात्री झाल्यावर मगच सर्वांनीं एकदम फळ्याकडे पाठी फिरविल्या!

या सर्व उदाहरणांमागील तत्त्व असें कीं, कोणालाहि बुद्धिमापनाच्या कसोट्या लावतांना त्या व्यक्तीच्या सांस्कृतिक पार्श्वभूमीप्रमाणें कसोटी पहाण्याचा त्याचा दृष्टिकोन असणार, हें लक्षांत घेतलें पाहिजे. त्यामुळें त्या कसोटींत त्याला अमुक गुण मिळाले नाहींत म्हणून त्याची बुद्धीच कमी आहे, असा सिद्धांत मांडतां येणार नाहीं.

## परिस्थितीचा परिणाम

बुद्धिमापनाच्या प्रत्येक कसोटीला जर अशी संस्कृतीची मर्यादा असेल तर या पद्धतीनें निरनिराळ्या मानव-वंशांमधील साधर्म्य अथवा वैधर्म्य ओळखण्याचा मानसशास्त्राला कांहींच मार्ग नाहीं काय ! दोन भिन्न संस्कृतिगटांतील माणसांचें चालू पद्धतीनें बुद्धिमापन करून पाहिलें आणि त्यांत कमी-अधिकपणा दिसला तर असें म्हणावें लागतें कीं प्रत्येकाच्या भोंवतालची परिस्थिति आणि आनुवंशिक संस्कार यांचा परिणाम होऊन हा कमी-अधिकपणा दिसतो. पण मुळांत हा माणूस अधिक बुद्धिमान् व हा कमी बुद्धिमान् असें म्हणतां यायचें नाहीं. समजा, दोन भिन्न संस्कृतींच्या माणसांना एकाच परिस्थितींत वाढविलें तर मग मात्र त्यांना एकच कसोटी लावून पहातां येण्यासारखी आहे. त्या कसोटींत जर विशिष्ट वंशाचा माणूस सरस व विशिष्ट वंशाचा उणा ठरला तर एक वंश हा दुसऱ्या वंशाहून श्रेष्ठ आहे, असें म्हणता येण्यासारखें आहे. अशा संशोधनांत शास्त्रज्ञांना काय आढळून आलें आहे !

पॅरिस अथवा न्यूयॉर्क या शहरांतील मुलांचें बुद्धिमापन करतांना जी कसोटी उपयुक्त ठरते ती कसोटी मोझांबिक किंवा न्यू गिनीमधील मुलांना लावली तर अर्थातच-न्यूयॉर्कच्या मुलांइतके गुण त्यांना मिळणें कठिण आहे.

पहिल्या महायुद्धांत दहा लाखांवर नीग्रोंची अमेरिकन लष्करांत भरती करण्यांत आली होती. त्या वेळीं ते नीग्रो व गोरे अमेरिकन यांना एकच कसोटी लावून पहाण्यांत आली. तींत असें आढळून आलें कीं दक्षिणेकडच्या नीग्रोंपेक्षां उत्तरेकडील नीग्रो अधिक चलाख आहेत. या गोष्टीचें कारण सहज समजण्यासारखें होतें. दक्षिण-अमेरिकेंत नीग्रोंवर जेवढीं बंधनें आहेत, तेवढीं उत्तर-अमेरिकेंत नाहींत. त्यामुळें उत्तर-अमेरिकन नीग्रोंचा गोऱ्या अमेरिकन लोकांच्या जीवनाशीं अधिक संबंध आलेला आहे. या कसोटींत आणखीहि एक सूचक गोष्ट आढळली ती ही कीं, उत्तर-अमेरिकेंतील अनेक नीग्रो हे दक्षिण-अमेरिकेंतील गोऱ्या लोकांपेक्षां बुद्धीनें सरस ठरले. उत्तर-अमेरि[illegible] ही दक्षिण-अमेरिकेपेक्षां अधिक पुढारलेली आहे हें ध्यानांत घेतलें म्हणजे या घटनेचा अर्थ कळूं शकतो.

या कसोट्यांवरून मानसविज्ञांना असें आढळून येऊं लागलें कीं, बुद्धिश्रेष्ठत्व हें वर्णावर अवलंबून नसून माणसाच्या परिस्थितीवर आणि त्याला मिळणाऱ्या उत्कर्षाच्या संधीवर अवलंबून आहे.

गोरीं माणसें व काळीं माणसें यांच्या भिन्नभिन्न संस्कारांमुळें त्यांच्या बुद्धीचा कमी-अधिकपणा ठरत असेल तर, त्यांच्यावर कसलेच संस्कार होण्यापूर्वी त्यांच्या मनाचा कस पाहिला तर काय आढळेल ? या प्रश्नावर मानसविज्ञांनीं संशोधन करून पाहिलें. १९४६ सालच्या 'जर्नल ऑफ जेनेटिक सायकॉलॉजी' मध्यें, प्रो. आर्नोल्ड गेसेल यांच्या नेतृत्वाखालीं डॉ बी. पॅसमानिक यांनीं केलेल्या कांहीं प्रयोगांची माहिती देण्यांत आली आहे. या प्रयोगांत असें आढळलें कीं, नीग्रो अर्भकें व गोरीं अमेरिकन अर्भकें यांच्यामध्यें बुद्धीची समानता आहे.

हें कसें घडलें ? दुसऱ्या महायुद्धांत अनेक निग्रोंना संरक्षण-खात्यांत, लष्करांत अमेरिकन गोऱ्यांच्या बरोबरी कामें

मिळालीं असल्यामुळें त्यांची आर्थिक परिस्थिति सुधारली होती. त्यामुळें नीग्रो स्त्रियांना स्वास्थ्य लाभलें होतें. बाळंतपणांत त्यांची हयगय झाली नव्हती. अशा स्वास्थ्यशील परि- परिस्थितींत जन्माला आलेली नीग्रो मुलें तशाच परिस्थितींतील अमेरिकन मुलांच्या इतकींच चुणचुणींत ठरलीं.

अशा तऱ्हेचे अनेक प्रयोग करून मानसविज्ञांची अशी खात्री झाली आहे कीं, अमुक मानव–वंश श्रेष्ठ आणि अमुक कनिष्ठ असें ठरविण्याइतकी बुद्धीची विषमता भिन्नभिन्न मानव–वंशांत आढ- ळत नाहीं. जी भिन्नता दिसते ती परि- स्थिति, संस्कार आणि संधीचा लाभ किंवा अभाव यांमुळेंच प्रामुख्यानें आढळून येते.

## शरीररचना व मन

एखाद्या माणसाची मुद्रा पाहून त्याच्या मानासिक स्थितीची कल्पना येते अशी एक समजूत प्रचलित आहे. उदाहरणार्थ, उंच कपाळ हें कुशाग्रबुद्धीचें निदर्शक आहे, उतरती हनुवटी दुबळेपणा व अनि- श्चय दाखविते, जाड ओंठ कामातुरवृत्ति दर्शवितात, वगैरे अनेक समजुती अस्ति- त्वांत आहेत. निरानिराळ्या मानव–वंशांची शरीररचनेंतील भिन्नता ही त्या वंशांच्या श्रेष्ठ–कनिष्ठतेची निदर्शक आहे ही कल्पना पुरातन कालापासून चालत आलेली आहे.

पण या बाबतीतहि मानसविज्ञांनीं केलेलें संशोधन असल्या समजुतींना धक्का देणारें ठरलें आहे. उंच कपाळाचीं व अरुंद कपाळाचीं अनेक माणसें निवडून काढलीं व त्यांचें प्रमाणभूत कसोट्यांनीं बुद्धिमापन केलें. तेव्हां अरुंद कपाळांच्या माणसांहून उंच कपाळांच्या माणसांना अधिक बुद्धि असल्याचें आढळून आलें नाहीं.

त्याचप्रमाणें सोनेरी केंस व काळेभोर केंस असलेलीं, उंच व टेंगू असलेलीं, वाटोळ्या डोक्यांचीं व लांबट डोक्यांचीं, वाटोळ्या डोळ्यांचीं व अरुंद डोळ्यांचीं, जाड ओंठांचीं व पातळ ओंठाचीं, अशीं माणसें घेऊन त्यांची कसोटी घेतां, विशिष्ट शरीररचना आणि बुद्धि यांमध्यें कोणतेंहि नातें असल्याचें आढळून आलें नाहीं.

दोन भिन्नवंशीय व्यक्तींत विवाह झाले तर अशा संमिश्र विवाहांनीं होणारी संतति ही बुद्धीनें कनिष्ठ असते असा एक समज आहे. सी. बी. डेव्हेनपोर्ट या वंशशास्त्रज्ञाचें असें म्हणणें आहे कीं, अशी संमिश्र संतति ही सुसंवादी नसते. अशा वसाहतींत एका वंशाचे कांहीं गुण उतरतील व हे गुण परस्परपूरक नसल्यास त्यांची अवस्था वाईट होईल. तो म्हणतो 'नीग्रोचे बाहू व तंगड्या हे अवयव त्याच्या धडाच्या मानानें लांब असतात; तर हेच अवयव गोऱ्या जातीच्या माण- सांत आंखूड असतात. आतां नीग्रो-गोरा विवाहसंबंधानें जी संतति होईल तिला जर नीग्रोच्या लांब तंगड्या आणि गोऱ्याचे आखूड बाहू लाभले तर जीवनसंग्रामांत त्याला खचित अधिक कष्ट पडतील. जमिनीवरून कांहीं उचलायचें झाल्यास त्याला वाजवीपेक्षां अधिक वांकावें लागेल.'

हें उदाहरण डेव्हेनपोर्टची बाजू फारशी भक्कम करीत नाहीं. कारण मिश्र–संततींत गोऱ्याच्या आंखूड तंगड्या आणि नीग्रोचे लांब बाहू उतरले तर त्या माणसांना जीवनसंग्रामांत कमी कष्ट पडतील. जमिनी- वरचे पदार्थ उचलतांना त्यांना कमी वांकावे लागेल.

डेव्हेनपोर्टचे निष्कर्ष बरोबर नाहींत असें इतर अनेक वंशशास्त्रज्ञांनीं आग्रहानें प्रतिपादन केलें असून, शरीराचा आकार व त्याचे अवयव हे परस्परांना साजेसे संततींत उतरतात असें त्यांचें म्हणणें आहे.

पण हा प्रश्न प्राणिशास्त्रज्ञांचा आहे. मानसशास्त्रापुरतें पहायचें तर मिश्र-संततीची बुद्धि कमी असते असें म्हणण्यासारखा पुरावा उपलब्ध झालेला नाहीं. अर्थात या बाबतातहि शास्त्रज्ञांचा परस्परांच्या मतांशीं विरोध पुष्कळच आहे. खुद्द डेव्हेनपोर्ट आणि मॉरिस स्टेगार्डा यांनीं संशोधन करून असा निर्णय दिला कीं, निर्भेळ गोरे, निर्भेळ काळे आणि दोहोंच्या मिश्रणानें जन्मलेले 'पिंगट' लोक यांच्या बुद्धिमत्तेचें मापन केल्यावर असें आढळलें कीं, काळे गोऱ्यांहून थोडे कनिष्ठ ठरले व पिंगट हे काळे व गोरे या दोघांहून अत्यंत कनिष्ठ ठरले.

परंतु अनेक शास्त्रज्ञांनीं केलेल्या संशोधनाचा संकलितपणें निर्णय पाहिल्यास असें स्पष्ट दिसतें कीं, वंश-मिश्रण आणि बुद्धिमत्तेचा दर्जा यांमध्यें परस्परसंबंध कांहीहि नाहीं.

मानव-वंशाबाबत युनेस्कोनें अशीं अनेक संशोधनें पाहून स्वतःचा निर्णय दिला आहे. तो असा:—

'वंश-मिश्रण हें वंशदृष्ट्या कांहीं अनिष्ट परिणाम घडविणारें आहे, असें म्हणण्यासारखा निर्णायक पुरावा उपलब्ध झालेला नाहीं. शारीर दृष्ट्या व मानसिक दृष्ट्या मिश्र-संतति ही अनिष्ट लक्षणें दर्शविणारी विसंवादपूर्ण व मनोविकृति असलेली अशी असते असें म्हणण्यासारखा कोणताहि पुरावा नाहीं मिश्र-संततीचे जे कांहीं परिणाम दिसतात ते अखेरीस भोंवतालची परिस्थिति आणि इतर सामाजिक कारणें यांवरच अवलंबून असतात.

आपल्याइकडे ब्राह्मण हे ब्राह्मणेतरांहून बुद्धीनें श्रेष्ठ, स्पृश्य हे अस्पृश्यांहून बुद्धीनें सरस असें म्हणणारे लोक खूप आहेत. त्यांना पाश्चात्यांत चाललेल्या या संशोधनाचें अवश्य मनन करावें. वर्णश्रेष्ठत्वाची भावना ही सुसंस्कृति दर्शविणारी नसून दुष्टपणाची, अज्ञानाची व संभाव्य अधोगतीची निदर्शक आहे, ही जाणीव जितकी सार्वत्रिक होईल तितकें तें सर्वांनाच हितकर ठरणार आहे.

---


# ए. आर. सावंत अॅन्ड ब्रदर्स

**२६३, मंगळदास मार्केट समोर, मुंबई नं. २.**

ARSA PRODUCTS

## ❀ होजियरी ❀ तयार कपडे ❀ फर्निशिंग फॅब्रिक्स

व इतर सर्व तऱ्हेच्या कापडाचे व्यापारी

**रिटेलर्स व होलसेलर्स टे. नं. २२८४४**

# अन्वययोग व व्यतिरेकयोग

श्री. गजानन लक्ष्मण रेगे, बी. ए., एस्. टी. सी. डी.

वेदान्तशास्त्राच्या सामान्य वाचकांच्या वाचनांत अन्वययोग व व्यतिरेकयोग हे शब्द मधून मधून येत असतात. परन्तु अन्वय व व्यतिरेक या शब्दांचे पारिभाषिक अर्थ न समजल्यामुळें त्यांपासून व्यक्त होणारा अर्थ वाचकांच्या ध्यानीं येत नाहीं. अशा वाचकांच्या सोयीकरतां अन्वय व व्यतिरेकांचें स्पष्टीकरण शक्य तितक्या साध्या व सोप्या भाषेंत करण्याचें प्रस्तुत लेखात योजिलें आहे.

## योग म्हणजे काय ?

योग हा शब्द युज–जोडणें या संस्कृत धातूपासून झाला आहे हें प्रसिद्ध आहे. योग शब्दाचा पारिभाषिक अर्थ जीव व शिव यांचें ऐक्य साधणें असा आहे. महर्षि पतञ्जलीनें आपल्या योगदर्शनांत योगाची व्याख्या पुढीलप्रमाणें दिली आहे. ' योगः चित्तवृत्तिनिरोधः । ' योग म्हणजे चित्तवृत्तींचा निरोध. चित्तामध्यें विचारांचे अथवा कल्पनांचे नाना तरंग उत्पन्न होतात, त्यांना वृत्ति म्हणतात. ह्या वृत्तींचा चित्तामध्येंच लय करणें या क्रियेला योग असें नांव आहे. या वृत्तींचा लय केल्यावर चित्तांमध्यें शून्यता उत्पन्न होण्याचा संभव उद्भवतो. ही शून्यता उत्पन्न होऊं नये म्हणून तें जड चित्त आपल्या शरीरामध्यें वसत आलेल्या चैतन्यामध्यें स्थिर केलें जातें. व त्यामुळें साधकाला आपल्या मूळ स्वरूपाची ओळख पटते. ' द्रष्टुः स्व–स्वरूपे अवस्थानम् ' । योगसूत्र I. 2

चित्तवृत्तींचा चित्तामध्यें लय झाल्यावर तें चित्त स्व–स्वरूपाचे ठिकाणीं स्थिर केलें गेलें म्हणजे वृत्तींचा वियोग होतो व योग आपोआप सिद्ध होतो.

चित्त जड असल्यामुळें त्यांत उत्पन्न होणाऱ्या वस्तु अर्थात् जडच असणार. जडवृत्तींचा संयोग हा दुःखाला कारणीभूत होतो म्हणून भगवान् श्रीकृष्णांनी भगवद्गीतेंत ' दुःख संयोग वियोगः योगः ' अशीही योगाची व्याख्या केली आहे. वामन पंडितांनाहि हीच व्याख्या संमत आहे असें दिसतें. ' तं विद्याद् दुःख संयोग वियोगं योगसंज्ञितम् ' ! या श्लोकार्धावर टीका करतांना ते म्हणतातः–

म्हणोनी जो दुःखसंयोग ।  
त्याचा होतां वियोग ॥  
तोचि जाणावा योग ।  
कृष्ण म्हणे ॥ य. दी. अ. ६ वा

परब्रह्म विश्वामध्यें ओतप्रोत भरून राहिलें आहे. विश्वांतील स्थावर जंगमामधील प्रत्येक कण त्यानें व्यापिला आहे. व त्याही व्यतिरिक्त तो निराळा दहा अंगुळें अवशिष्ट राहिलाच आहे. ' स भूमिं विश्वतो वृत्वा अत्यतिष्ठद्दशांगुलम् । ' ब्रह्म जसें विश्वांत भरून राहिलें आहे तसेंच तें प्रत्येक व्यक्तीच्या अंतःकरणांतहि आत्मा किंवा जीवरूपानें अवस्थित आहे या जीवशिवाच्या ऐक्यापासून योग्यास परमात्म्याचा साक्षात्कार होतो व ब्रह्मानन्द अनुभवायास

मिळतो. यालाच याज्ञवल्क्य मुनि योग असें म्हणतात. 'संयोगो योग इत्युक्तः जीवात्मपरमात्मनोः ।'

मनुष्याला सुख व दुःख हे भोग अनादिकालापासून त्याच्या शुभाशुभ कर्मामुळें चिकटलेले आहेत. स्व-स्वरूपाचें विस्मरण झाल्यामुळें चित्तामध्यें सत्व, रज तम या गुणांनीं युक्त अशा जडवृत्ति उत्पन्न होतात.

एवं जड वृत्ति संयोग ।
तोची अनादि दुःख भोग ।
य. दी.

योगाचें अंतिम ध्येय आत्यंतिक सुखप्राप्ति व शाश्वत दुःखनिवृत्ति हें आहे. सुख-दुःखें उत्पन्न होण्याला मन, इंद्रियें व विषय ह्या तीन साधनांची जरूरी असते. शब्द, स्पर्श, रूप, रस आणि गंध या पांच गुणांनीं उत्पन्न होणारे निरनिराळे विषय कर्ण, त्वचा, नेत्र, रसना व घ्राण या आपापल्या इंद्रियांच्या द्वारें मनाकडे जातात. व पुढें आत्म्याचा संयोग झाल्यानंतर त्या विषयाचें ज्ञान प्राप्त होतें. चित्तामध्यें विशिष्ट विषयांकडे जाण्याची इच्छा म्हणजेच वासना उत्पन्न होतात. ह्या वासनाच सर्व दुःखाचें मूळ असतें. ज्याच्या वासना नाहींशा झाल्या आहेत, अशाच मनुष्याची दुःखनिवृत्ति होते. आत्मसुख हें इंद्रियांना अनुभवतां येण्यासारखें नाहीं. तें अतींद्रिय आहे. फार तर तें बुद्धिग्राह्य म्हणतां येईल. तें सूक्ष्म अशा बुद्धीलाच आकलनीय आहे. आत्मसुख हेंच आत्यंतिक सुख. ब्रह्मसंस्पर्श असेंही त्याला दुसरें नांव आहे. सुखं आत्यंतिकं यत्तद् बुद्धिग्राह्यं अतींद्रियम् गी. VI २१ हें सुख एकदां प्राप्त झालें म्हणजे योगी पर्वतप्राय दुःखाचे भारानें ही दबला जात नाहीं. यस्मिन् स्थिते न दुःखेन गुरुणापि विचाल्यते । भ. गी. VI २२ वासना निर्मूल झाल्यावर मन प्रशांत होण्यास मदत होते. वृत्तिरूप दोष (कल्मष) नाहींसे होतात. भगवान् श्रीकृष्ण म्हणतात, 'युञ्जन्नेवं सदाऽऽत्मानं योगी विगतकल्मषः। सुखेन ब्रह्मसंस्पर्शं अत्यंतं सुखं अश्नुते ' भ. गी. VI २८.' या प्रकारें सदर योगाभ्यास करणारा योगी निष्पाप होऊन ब्रह्मप्राप्ति म्हणजे ब्रह्मसंस्पर्शरूप निरतिशय सुखाचा उपभोग सुखानें घेतो.

## आवरण व विक्षेप

जीवाला स्व स्वरूपाचें विस्मरण होण्याला आवरण व विक्षेप हीं कारणीभूत होतात. अर्थात् ज्ञानाचा उदय होण्याला हींच प्रतिबंधक ठरतात. ब्रह्माचें अविद्येतील जें प्रतिबिंब त्यालाच शास्त्रकारांनीं जीव ही संज्ञा दिली आहे. अविद्येमुळें जीवाचे ठिकाणीं विस्मरण (भ्रम) उत्पन्न होतें. आवरण व विक्षेप हें अविद्येचेच प्रकार (शक्ति) आहेत. आवरणामुळें स्व स्वरूपाचें विस्मरण होतें. विक्षेप म्हणजे वस्तुबद्दल विपरीत ज्ञान उत्पन्न होणें. दोरीवर सर्पाचा भास होणें हा विक्षेप. मी म्हणजेच देह समजणें हें विक्षेपाचें लक्षण होय. आवरण नष्ट झालें म्हणजे विक्षेपही नष्ट होतो. झांकणाखालीं एखादी वस्तु नकळत टेविली तर तिजबद्दल आपणांस अज्ञान असतें व ती काय असेल याबद्दल निरनिराळे तर्क (विक्षेप) सुरू होतात. पण तें आवरण दूर केलें कीं वस्तुचें सत्यस्वरूप कळतें व विक्षेपादि तर्कवितर्क नाहींसे होतात. आवरण आणि विक्षेप हीं जशीं दोन रूपें

अविद्येचीं तशीं ब्रह्मविद्येचीं दोन रूपें अन्वय आणि व्यतिरेक हीं होत. मी म्हणजेच देह समजणें हें विक्षेपाचें लक्षण होय. आणि मी म्हणजे देहाव्यतिरिक्त, देह सोडून, स्वस्वरूप आहें, आत्मस्वरूप आहे असें कळणें हें व्यतिरेक रूप होय.

## अन्वयज्ञान व व्यतिरेकज्ञान

अन्वययोग व व्यतिरेकयोग हे जसे योगाचे दोन प्रकार कल्पिले आहेत, तसेच ज्ञानाचे पण अन्वयज्ञान व व्यतिरेकज्ञान असे दोन प्रकार मानले आहेत. अन्वय व व्यतिरेक या दोघांनाही दोन वस्तूंची अपेक्षा असते. अन्वय म्हणजे दोन किंवा अधिक वस्तूंचा संयोग. तसेंच दोन किंवा अधिक वस्तु एकमेकांपासून व्यतिरिक्त म्हणजे निराळ्या करणें. आपण प्रथम व्यवहारांतीलच उदाहरणें घेऊं. दूध आणि पाणी एकत्र करणें ह्याला अन्वयाची खूण म्हणतां येईल. हंसाला दूध आणि पाणी निराळें करतां येतें. तसें एकाविण एक पाहणें यांचें नांव व्यतिरेक. जल आणि तरंग—जलांत तरंग आहेत. आणि तरंगांत जल आहे. हीं दोन्हीं एकत्र पाहणें याचें नांव अन्वय व दोन्ही वेगवेगळीं पाहणें याचें नांव व्यतिरेक. याप्रमाणें तरंगच उदक अलंकारच सुवर्ण, पटच तंतु आपण पाहतों त्याप्रमाणें जड वस्तूंत चैतन्य पाहणें ह्यालाच अन्वयज्ञान म्हणतात. ह्या जगांत सत्य अशी एकच वस्तु. ती म्हणजे चैतन्य. 'ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या, जीवो ब्रह्मैव, नापरः' केवळ एक ब्रह्म सत्य आणि चित् असून बाकी यच्चयावत् वस्तु जड आणि मिथ्या आहेत, हें व्यतिरेकानें जाणलें जातें. पण त्याचबरोबर हें सर्व विश्व एकमेवाद्वितीय असें जें सच्चिदानंद ब्रह्म त्यानें व्यापलें आहे, त्यांत भरून राहिलें आहे, हें जें जाणणें तें अन्वयज्ञान होय. 'एकीं एकत्वें अनेक पाहणें' एका ब्रह्मामध्यें अखिल विश्व पाहणें हा अन्वय-बोध. देहाव्यतिरिक्त, विश्वाव्यतिरिक्त एकट्या परमात्म्याला पाहणें हा व्यतिरेक बोध. भगवद्गीतेंत तेराव्या अध्यायांतील बाराव्या श्लोकांत न सत् न असत् अना-दिमत् पर अशा तऱ्हेनें वर्णिलेल्या ब्रह्माचें ज्ञान हें व्यतिरेक ज्ञान होय. त्यांत विश्वाची कल्पना नाहीं. केवळ एकट्या परब्रह्माची आहे. 'यो बुद्धेः परतस्तु सः' परमात्मा बुद्धीच्याही पलीकडे आहे. बुद्धीलाहि तो आकलनीय नाहीं. हेंही त्याच वर्गांतील ज्ञान होय. निगमसारांत म्हटलें आहे.

अन्वय म्हणजे दुग्ध–उदक।
जैसें मिश्रित एकांत एक।
त्याचें वेगळें करणें व्यतिरेक।
तत्वज्ञ म्हणती ॥

जसें दुधामध्यें पाणी, तसें नेत्रांनीं दिसणाऱ्या प्रत्येक आकाराला आलेल्या वस्तूमध्यें ब्रह्म व्यापलेलें आहे. ज्याप्रमाणें रस उदकामध्यें उदकच होऊन बसतो किंवा तन्तु हे वस्त्रामध्यें वस्त्ररूप होऊन बसतात, त्याप्रमाणें ब्रह्म हें सर्व जगाचें आदिकारण असून सर्व वस्तूंत दृष्टीस पडतें.

घटीं मृत्तिका पाहे।
वस्त्र पाहतां तंतु आहे।
आकारीं व्यापून राहे।
ब्रह्म तैसें ॥ सि. सं. IV–२०२.

या वरील उदाहरणांवरून द्वैताचा जरी भास झाला तरी हें सर्व जग मिथ्या-रूप आहे असें गृहीत धरल्यामुळें अद्वै-ताची कोणत्याही प्रकारें हानि होत नाहीं.

हें लक्षांत ठेवलें पाहिजे. ज्ञानेश्वर महाराज म्हणतातः—

म्हणौनि गा श्रुति । द्वैतभावें अद्वैतीं ।
निरूपणाची वाहती । वाट केली ॥
XIII ८९०

म्हणून श्रुतींनीं द्वैताच्यां रूपानें अद्वैताचें प्रतिपादन करण्याचा राजमार्ग सुरू केला. कारण अद्वैत स्पष्ट करून सांगावयाचें म्हणजे द्वैताचा स्वीकार करूनच स्पष्टीकरण करावें लागतें. गीतेच्या बाराव्या अध्यायांत अक्षरं, अनिर्देश्यं, अव्यक्तं अचलं, अचिंत्यं, कूटस्थं, या पदांनीं वर्णिलेलें ब्रह्म व्यतिरेकरूपी आहे, तर तेराव्यांतील 'सर्वतः पाणिपादं तत् सर्वतोक्षिशिरोमुखं...' त्याला सर्वत्र हात व पाय आहेत, सर्व बाजूंनीं डोळे, डोकीं व मुखें आहेत. या श्लोकांत अन्वय सांगितला आहे. पुढच्याच श्लोकांत सर्वेंद्रिय गुणाभासं, सर्वेंद्रिय विवर्जितं, असक्तं, सर्वभृत् निर्गुणं गुणभोक्तृ या गुणांनीं ज्ञात होणारीं परमेश्वराचीं रूपें हीं अन्वय व्यतिरेकाचीं उत्तम उदाहरणें आहेत. सृष्टीच्या विकासांतील परमेश्वराचें रूप हा अन्वयबोध समजला तर तिच्या उत्पत्तीपूर्वीचें रूप हा व्यतिरेक समजण्यास हरकत नाहीं. थोडक्यांत निर्गुण निराकार, असक्त असें शुद्ध चैतन्य ब्रह्म हें व्यतिरेक रूप तर शबल ब्रह्म हें अन्वयरूप मानण्यांत येतें.

ऐसें अन्वयें पैं केलें ।
सर्व ब्रह्म दृष्टीसीं आलें ।
जेथलें देखणें सामावलें ।
तेथेंचि कीं ॥
सि. सं. IV–१६४.

## अन्वय व व्यतिरेक योग

अन्वय आणि व्यतिरेक हे योगाच्या प्रकारांत मोडतात असें वर सांगितलें. आतां ते प्रकार पाहूं. गीतेंत विशेषतः सहाव्या अध्यायांत ह्या दोन्ही प्रकारच्या योगांचें वर्णन आलें आहे. सहाव्या अध्यायांत २१ ते २८ या श्लोकांत व्यतिरेक योगाचीं लक्षणें सांगितलीं आहेत. भौतिक इंद्रियांनाही जें अप्राप्य, केवळ सूक्ष्मबुद्धीलाच जें गम्य, दुःखाचा लेशही नसणारें असें हें आत्यंतिक सुख प्रशांत मनाच्या, ज्याचे सर्व दोष धुवून गेले आहेत, ज्याचे रज तम हे गुण नष्ट झाले आहेत जो जवळ ब्रह्मच झाला आहे, अशा आत्मचिंतन करणाऱ्या योग्यालाच अनायासानें म्हणजे वृत्तिनिरोधाकरितां मुद्दाम प्रयत्न न करतां सहज समाधीनें प्राप्त होतें. अशा प्रकारचा योग व्यतिरेक योग म्हणतां येईल. सर्व विश्वापासून 'न सत् न असत्' असें हें परब्रह्म वेगळें काढून त्याचे ठिकाणीं धारणा ठेवून समाधि लावणें हा व्यतिरेक योग. जगांतच राहून जगाकडे समदृष्टि ठेवून वागण्याच्या पद्धतीला अन्वययोग म्हणतां येईल. सर्व भूतस्थं आत्मानं सर्व भूतानि चात्मनि ईक्षते योगयुक्तात्मा सर्वत्र समदर्शिनः ॥ VI–२० जणूं सर्व प्राणी आपल्या मध्यें आहेत व आपण सर्व भूतामध्यें व्यापून आहों अशी भावना ठेवणें हा अन्वययोग. अर्थात् आपल्याप्रमाणें सर्व जग मानणें व जगराहाटीप्रमाणें विश्वाच्या सामान्य घटनेंत आपणांस सामावून घेणें व आपलें सुखदुःख जगावेगळें आहे असें न मानणें हें अन्वययोगाचें लक्षण आहे हा अन्वययोग साधल्याशिवाय आयुष्याला पूर्णता येत नाहीं असें द्वैतमार्गांतील थोर थोर अधिकारी सांगत आले आहेत. एरवीं जड वाटणाऱ्या जगांत प्रत्येक

प्राण्यांत, प्रत्येक वस्तूंत सच्चिदानंद भरून राहिला आहे, असा प्रत्यय वाटून जो आनंद प्राप्त होतो त्याला अन्वयज्ञान किंवा अन्वय योग हेंच एक साधन आहे. जीवनन्मुक्ताला हा योग फारच उपकारक आहे, असें द्वैतपंथी आचार्यांचें म्हणणें आहे. जड वस्तु जड नाहीं–ती चिन्मात्र आहे–त्यांतही चैतन्य सुप्त आहे–सर्व विश्वांत चैतन्य भरून आहे अशी भावना टिकून राहाते व मनुष्य जीवन्मुक्त स्थितीला अनायासें पोंहोचतो. पण व्यतिरेक योगानें जीवनन्मुक्ताला ब्रह्मानन्दाचा अनुभव येत नाहीं असें कसें म्हणतां येईल ? व्यतिरेक योगापेक्षां अन्वययोग हा द्वैतपंथाला अधिक जवळचा आहे हें उघड आहे. व्यतिरेकांत निर्गुणाची उपासना असते. जीवन्मुक्ताला दोन्ही अवस्था सारख्याच. मधुसुदन सरस्वती म्हणतात, हरीचें भजन करणें हा जीवन्मुक्ताचा स्वभावच बनून जातो. 'जीवन्मुक्ति दशायां तु न भक्तेः फल कल्पना' अद्वेष्टत्वादिवत्तेषां स्वभावो भजनं हरेः

॥ ३७ ॥ म. व्याख्या

जीवन्मुक्ताला आपल्या भक्तीच्या फलाची कल्पनाच नसते.

अन्वय व व्यतिरेक योग ह्यांत आणखी एक सूक्ष्म भेद आहे. 'अहं ब्रह्म' 'तत्त्वमसि' मीच ब्रह्म आहें, हें जीवा, तूं तें परब्रह्म आहेस, ह्या महावाक्यांवरून होणारा बोध हें व्यतिरेक योगाचें लक्षण आहे. अन्वययोगांत एकांत अनेकांचा साक्षात्कार होतो. दिसतें तें सर्व ब्रह्म आहे 'सर्व खल्विदं ब्रह्म' अशी भावना असते. व्यतिरेकानें अविद्येचें आवरण नाहींसें होतें. आवरण नाहींसें झालें कीं विक्षेप अर्थातच नष्ट होतो. अन्वयानें विक्षेप नाहींसा होतो. अज्ञानापेक्षां विक्षेपानें (भ्रमानें) अधिक हानि होते, अज्ञानामुळें फार तर आत्मा कसा आहे ह्याची कल्पना येणार नाहीं. पण विक्षेपानें आत्मा हा देह आहे, विश्वच आत्मा आहे अशा तऱ्हेच्या भ्रामक कल्पना आपण उराशीं बाळगून अज्ञानावस्थेंतच आपण संतुष्ट राहूं व पुढील प्रयत्न करणार नाहीं अशी थोडीशी भीति अन्वय योगाच्या पूर्वभूमिकांवर असणाऱ्या साधकांसंबधीं असत. म्हणून अन्वययोगाच्या साधकांनीं आवरण–ही नष्ट करण्याची योग्य ती काळजी प्रथम पासूनच घेतली पाहिजे. ह्या दृष्टीनें तुकाराम महाराजांचे पुढील अभंग लक्षांत ठेवण्यासारखे आहेत. तुकाराम महाराज म्हणतात :—

तुका म्हणे बाह्यरंग ते विठ्ठल ।
अंतरंग निवाले ब्रह्मरसें ।
बोलों अबोलणें मरोनियां जीणें ।
असोनियां नसणें जनीं आम्हां ॥
"तुका म्हणे नव्हे दिसतों मी तैसा ।
पुसणें तें पुसा पांडुरंगा ॥३६०१..."

"याप्रकारें हे ज्ञानी संत अंतरंगीं (व्यतिरेकानें) (दृश्यविरहित) त्या परमात्म्याच्या आनंदरूपाचा अनुभव घेतात; व अन्वयानें (दृश्यामध्यें) त्याच्या सगुण साकार रूपाची भावना करून प्रेमस्वरूपाचा प्रत्यय घेत असतात. अशा तऱ्हेनें आनंद व प्रेम अखंड राहूं शकतें. भक्ति ही मी भक्त, तूं देह अशी द्वैतपर असून त्यांची अनन्यभक्ति प्रेमज्ञानयुक्त असते. ह्या भक्तिप्रेमाचा प्रत्यय द्वैत भावनांतच येऊं शकतो. यामुळें प्राकृतजनांना या भक्तिमार्गांत वाव आहे. म्हणून

अन्वययोग हा द्वैतमार्गाला अधिक जवळचा आहे. कारण त्यांत दृश्यांत म्हणजे सगुण साकारांत परमेश्वराचें रूप पाहण्याचा उपदेश केला आहे.

न्यायशास्त्रांतही अन्वय व्यतिरेकाचा विचार आला आहे. अथोत् लौकिकदृष्टीनें. 'यत्र यत्र धूमः तत्र तत्र वन्हिः' जेथें धूर तेथें विस्तव. हें न्यायदर्शनांतील उदाहरण सर्वांच्या परिचयाचें आहे. धुराचें व विस्तवाचें निकट साहचर्य हें अन्वय व्याप्तीचें उदाहरण. आतां व्यतिरेकाचें. व्यतिरेक म्हणजे अभाव. जेथें—विस्तवाचा अभाव, तेथें धूराचा अभाव.

## उपसंहार

वरील विवेचनावरून अन्वय व व्यतिरेक ज्ञान यातील सामान्य भेद लक्षांत येण्यास अडचण पडूं नये. घटांतील माती, अलंकारांतील सुवर्ण किंवा पटांतील तंतु वेगळे करून पाहण्याच्या पद्धतीला व्यतिरेक म्हणतात व हे मूळ पदार्थ निरनिराळ्या आकारांत पाहण्याच्या पद्धतीला अन्वय म्हणतात. मातींत घट नाहीं असें आपण म्हणतों तेव्हां मातींत घटाचा व्यतिरेक आहे असें आपण समजतों. घटांत माती भरली आहे असें म्हणतों, तेव्हां घटांत मातीचा अन्वय आहे असें म्हणतां येईल. तेंच वेदान्ताच्या भाषेंत बोलायचें झाल्यास ब्रह्मांत जगाचा व्यतिरेक (अभाव) आहे व जगामध्यें ब्रह्माचा अन्वय आहे. एकच पदार्थ इतर पदार्थांहून वेगळा करून त्याकडे पाहाणें हा व्यतिरेक हें आपणांस समजलें. चिद्वस्तु किंवा आत्मवस्तु इतर अनात्म जड वस्तूंपासून विवेकानें वेगळी करून त्यावर व्यतिरेक योगी संयम करतात, ध्यान, धारणा, समाधि लावतात. अर्थात् ही वस्तु दृश्य विरहित—निर्गुण निराकार—असणार हें उघड आहे. ह्याच्या उलट अन्वय. एकांत अनेकरूपानें असलेलें विश्व दृश्य असणार हें क्रमप्राप्त ठरतें. ज्ञान हें अंतरंग साधन असून त्याचें ध्येय निर्गुण निराकार आत्मवस्तु हें आहे. भक्ति हें बहिरंग साधन असून त्याचें साध्य सगुण साकाररूप असतें. दोन्ही मार्ग आपापल्या परीनें इष्ट आहेत. एकाला ज्ञानमार्ग तर दुसऱ्याला भक्तिमार्ग म्हणतां येईल. पहिला ब्रह्मसाक्षात्कार घडवून आणील तर दुसरा भगवत्साक्षात्कार प्राप्त करून देईल. साधकानें आपल्या आवडीनुसार व आपल्या तयारीप्रमाणें कोणत्याही योगाचा आश्रय करावा.

---


लहान मुलांच्या आंकडीवर

जुने आणि प्रसिद्ध औषध

जयकर्स कन्व्हलशन् रेमेडी

सोल प्रो. जयकर ब्रदर्स

६६, मरीन ड्राईव्ह, मुंबई १

: स्टॉकिस्ट :

मे. कांचनलाल वाडीलाल कं.,

दवाबझार, मुंबई २

# भक्त मंडळाचे सभासद

## मे-जून-जुलई १९५७ मध्यें झालेल्या सभासदांची नांवें पुढीलप्रमाणें:—

## आजीव सभासद

| | |
|---|---|
| श्री. चित्रगुप्त जे श्रीवास्तव | मुंबई २५ |
| ,, कैखुश्रू ए. दलाल | ,, १ |
| डॉ. रामचंद्र जी. के. जयकर | ,, २१ |
| श्री. परमेश्वरं पी. मेनन | अमरावती |
| सौ. लक्ष्मीबाई शंकरराव परब | मुंबई २७ |
| श्री. एम्. ए. पुरंदरे | ,, २ |
| ,, ए. बी. शिंदे | ,, ४ |
| ,, जे. एच्. पटेल | सोरोटी (उगांडा) |
| ,, एन्. शेशागिरीराव | निझामाबाद |
| ,, व्ही. चिंतलापुडी | काकिनाडा |
| श्रीमती मेहरबाई सी. बाटलीवाला | मुंबई २६ |
| श्री. विरुपाक्ष जी. इनामदार | बेळगांव |
| ,, यशवंत शंकर कोदे | कारवार |
| कुमार अशोक र. कोकाटे | मुंबई १ |
| श्री. रामकृष्ण दाजी कोकाटे | मुंबई १ |
| ,, दली धनजीशा मोगरेलिया | मुंबई २६ |
| सौ. कमलाबाई नारायण फणसे | मुंबई २४ |
| श्री. के. व्ही. देसाई | मुंबई ४ |
| ,, आर. वाय बुधावंत | परभणी |
| ,, एच. के. डोशी | मुंबई १९ |
| ,, पी. जी. देसाई | कोटाह |
| ,, रामचंद्र उर्फ रामभाऊ गमाजी | जालना |
| ,, बारकू रखमाजी वेंढारे | विटे |
| ,, एल. आर. प्रभू | कोलंबो |
| सौ. कमळाबाई व्ही. पाटील | बेळगांव |
| श्री. सी. एन्. नायडू | चित्रगुंटा |
| श्रीमती शिवाली नागेश्वरम्मा | विजयवाडा |
| श्री. टिप्पीरेडी सिंघूरेड्डी | चिक्कलजोतीगस्क |
| ,, जी. जी. जोशी | अस्टगांव |
| ,, एस. एस. जगदाळे | मुंबई २८ |
| ,, एम्. जी. नाईक | मुंबई २८ |
| ,, प्रतापसिंह बी. राठोड | चंदरनी |
| ,, के. बी. राणे | सावंतवाडी |
| ,, रामचंद्र खिमजी अण्णम | धामणगांव |
| सौ. सरला पी. गांवकर | मुंबई १ |
| श्री. टी. हनुमय्या | चिकमागालूर |
| ,, टी. कृष्णस्वामी | नराजामडा |

**सर्वसाधारण सभासद—मुंबई ३५० आणि इतर प्रांत ९५**

# श्रीसाई संस्थानला मिळालेल्या देणग्या

जानेवारी ते ऑगस्ट १९५७ या अवधींत शिरडी व मुंबई येथें श्रीसाई संस्थानला पुढील प्रमाणें देणग्या मिळाल्या आहेत. पन्नास व पन्नास रुपयांहून अधिक असलेल्या रकमांची यादी पुढें दिलेली आहे.

## इस्पितळ देणगी

| | | |
|---|---|---|
| श्री. एम्. डी. बालरमणमूर्ती | मुंबई | १००—०० |
| ,, बी. ए. वैद्य | मुंबई २८. | १०१—०० |
| ,, श्रीसाईभक्त एक मुंबईचे | ,, | १०१—०० |
| ,, फतेशिंग एन्. राणा | आमोंद | १२५—०० |
| ,, बी. आर. श्रीनाथ | बँगलोर १. | १००—०० |
| श्रीमती त्रिवेणीबेन श्री. वामनराव पी. पटेल यांच्या कन्या, | शिरडी | ५१—०० |
| श्री. शशिकांत एस. सेशिआ | ३७५, खार, मुंबई २१ | ५१—०० |
| ,, वाय. डी. पदियार | रंगून | ५१—०० |
| ,, हसनअली छगन | मुंबई २ | ५०—०० |
| ,, पी. टी. कोटेचा | ,, | ५०—०० |
| मे. ओरियंटल हॅट्र म्या. कंपनी | बंगलोर २ | ५०—०० |
| श्री. होमी खजोरिया | मुंबई | ६०—०० |
| श्री. पुरुषोत्तम तु. रामजी | माडवीकच्छ | ६१—०० |
| श्रीमती आवडाबाई मांजरेकर | मुंबई ४ | १०१—०० |
| श्री. एम्. बी. वरेरकर | मुंबई १ | ५१—०० |
| श्री. गु. म. मेहता | कंपाला | ५१—०० |
| मे. कृष्ण ट्रेनिंग कंपनी | लुआन्सा | २१२—५१ |
| श्री. शा. म. मेहता | घाटकोपर | १११—०० |
| ,, बी. के के पंड्या | मुंबई ३ | ५१—०० |
| ,, एम्. के. पटेल | फोर्डस् बर्ग् | ५३—०० |
| ,, आर. बी. पटेल | नैरोबी | १५१—०० |
| ,, दयाळजी वल्लभदास | मुंबई २ | १०१—०० |
| मिसेस फ्रेनी मर्चंट | मुंबई २६ | १०००—०० |
| श्री. आर. बी. पटेल | सॅलसबरी | ५३—०० |

# कायम फंड देणगी

| | | |
|---|---|---|
| श्री. व श्रीमती सी. एस्. खरवार | मुंबई | १९१-०० |
| श्री. जी. वैद्य | मुंबई २८ | ६१—२५ |
| ,, के. आर. आमणकर | मुंबई | १००—०० |
| ,, बी. आर. श्रीनाथ | बँगलोर | १००—०० |
| ,, डी. डी. पटेल | मुंबई | २३६—०० |

# इमारत-देणगी

| | | |
|---|---|---|
| मे. गोल्ड सोप कंपनी | मुंबई | १०९—०० |
| श्री. के. सी. पटेल | मुंबई | ८१—२५ |
| ,, हिरालाल एम. पटेल | नैरोबी | ५१—०० |
| ,, टी. एच. ॲडव्हानी | मुंबई | १००—०० |
| मे. बी. मघाराम आणि कंपनी | फ्रान्स | १२५—०० |
| मिसेस गुरबेर ए. आन्टिया | मुंबई १ | ३६१—०० |
| श्री. व्ही. एस्. सेट्टी | मुंबई १२ | १६०—०० |
| ,, दि. धु. यादव | अस्थि. जि. परभणी | १०१—०० |
| ,, एम्. के. रामनाथम | मुंबई १९ | १३८—०० |
| ,, जे. आर. पोर्टबाला | पुणें | ५०१—०० |
| श्रीमती बी. आर. पटेल | मुंबई १६ | १.१—०० |
| ,, टी. एस. सी. अय्यर | जबलपूर | १०१—०० |
| ,, प्रभुलाल टी. मेहता | मुंबई | १००—०० |
| श्रीमती माणिबाई डी. दस्तूर | मुंबई | १००—०० |
| ,, पी. राजालिंगम | बोलारूम | २२५—०० |
| मे. दिक्षित माणिकलाल आणि कं. | मुंबई. १ | १०१—०० |
| ,, एन्. एम्. शाह | मुंबई ९ | ७५—०० |
| ,, एम्. ए. बालरमण | मुंबई | १००—०० |
| श्रीसाईभक्त एक | ओरिसा | ५००१—०० |
| श्री. आणि श्रीमती चंदूभाई पटेल | बोरसाद | १००१—०० |
| ,, मुकुंद वि. देशपांडे | पुणें २ | ५०—०० |
| ,, शिवलिंग मनमथाप्पा धुले | परभणी | ७५—०० |
| ,, के. यादगिरी बंगिमाट | सिकंदराबाद | १०१—०० |
| ,, बसमल | मुंबई. | १०१—०० |
| ,, राधाकृष्ण शारदिया | मानवथ | ५१—०० |
| ,, एम्. एस्. मेहता | मुंबई २४. | १२५—०० |

| | | |
|---|---|---|
| श्री. चंपकलाल पुरुषोत्तम | झंजिबार | १०१—०० |
| ,, वाय. एस्. देशपांडे | नाशिक रोड | ५०—०० |
| ,, गोविंदराम जॉली | मुंबई | ५१—०० |
| ,, पांडुरंग एस. नायक | कुलाबा | ५१—०० |
| श्रीमती रेखा रमेश खत्री | मुंबई १२ | १०१—०० |
| श्री. व्ही. एस. सेट्टी | मुंबई १२ | १००—०० |
| ,, देवजी रतनसी | मुंबई | १०१—०० |
| ,, बी. आर. श्रीनाथ | बँगलोर | १००—०० |
| डॉ. सी. जी. पटेल | कंपाला, उगांदा | १५१—०० |
| श्री. डी. व्ही. शाह | मुंबई २० | ५०१—०० |
| ,, संजय वसंतराव गिरमे, | पढेगांव, श्रीरामपूर | १०१—०० |
| श्रीमती कुंदा रामचंद्र भिडे | मुंबई १४ | १०१—०० |
| श्री. पुरुषोत्तम वा. परांजपे | अंबरनाथ, ठाणें | ९१—५० |


॥ श्री साईनाथ प्रसन्न ॥

**बॉम्बे सिल्व्हर शॉप**

टेलिफोन ३८८६२

शुद्ध चांदीचा हरेक तऱ्हेचा माल बनविण्याचें व ऑर्डरप्रमाणें माल करून देण्याचें विश्वासलायक ठिकाण. त्याचप्रमाणें सोन्याचाही माल ऑर्डर-प्रमाणें करून देण्यांत येतो. एकदां भेट देण्याची तसदी घेऊन खात्री करून घेण्याची विनंती आहे.

**बा. गो. जुवेकर**

मालक

गिरगांव, मांगलवाडी,
श्री धूतपापेश्वर प्रासाद, मुंबई नं. ४

॥ विमलेश्वर प्रसन्न ॥

**भा. रा. रेवणकर सराफ**

ठळकवाडी (बेळगांव)

**सोन्या-चांदीच्या तयार दागिन्यांचे व्यापारी**

आमचेकडे खडे मोत्यांचे सेटिंग्जचे आधुनिक पद्धतीचे दागिने, लफ्फे, तन्मणी, नेकलेस इअरींग्ज वगैरे तयार होतात.

बाहेरगांवच्या व्यापाऱ्यांचे ऑर्डरीकडे विशेष लक्ष दिलें जातें.

# श्रीसाई-स्तवनाष्टक

साईनाथ कृपा करोनि मजला द्या आपुलें दर्शन
त्या योगें मज श्रेष्ठ मुक्ति मिळुनी होईन मी पावन
भक्तांचा भवताप जाइ विलया होतां कृपा आपुली
तारावें मज सद्गुरू विनवितों, साईकृपा माउली ॥ १ ॥
आरंभीं शिरडींत येउनि पहा प्रस्थान त्वां ठेविलें
आहे कोणि फकीर वा अवलिया ऐसें जनां वाटलें
भिक्षा मागुनि जेवणें, पडुनियां कोठेंतरी राहणें
सारा वेळ जपांत मग्न, गुरुच्या सेवेंत आनंदणें ॥ २ ॥
देहाची ममता मुळीं न धरितां वैराग्य त्वां सेविलें
सारे ऐहिक भोग वर्ज्य करुनी, साधुत्व संपादिलें
सेवेचें व्रत घेउनी गुरुपदीं झालांत कीं तन्मय
सिद्धी मेळविली, खरोखर असे हा श्रेष्ठ भाग्योदय ॥ ३ ॥
शिर्डीचे जन पुण्यवान, सगळी भूमीहि ती पावन
वारा, वृक्ष, पवित्र सर्व जलही त्यांना असो वंदन
वास्तव्यें अपुल्याच क्षेत्र बनली शिर्डी किती सुंदर !
थोरांचें पद लागतांच घडतें ऐसेंच स्थित्यंतर ॥ ४ ॥
सत्याचे बनुनी उपासक खरे, पूजा तयाची करा
टाळावा अपहार यत्न करुनी, हें तत्त्व ध्यानीं धरा
सारे मानव एक, सूत्र हृदयीं कोरूनि हें ठेवणें
सेवेनें पर दुःख होइ हलकें, निष्ठा अशी पाळणें ॥ ५ ॥
द्वेषानें जगणें नको, किमपिही लोभांत गुंतूं नको
मोहाला अगदीं बळी पडुं नको, तो काम इच्छूं नको
क्रोधाची मुळिहही न संगत बरी, मैत्री तयाची नको
हानीकारक फार तो मदरिपू, वारा तयाचा नको ॥ ६ ॥
आहे हा नरदेह दुर्लभ अती, ग्रंथांतरी वर्णिलें
त्याचें सार्थक व्हावयास पुजणें, श्रीसद्गुरू पाउलें
निष्ठा अर्पुनि सद्गुरूस भजतां अद्वैत सिद्धी मिळे
जातें 'मापण' सर्व दूर पळुनी अज्ञानही मावळे ॥ ७ ॥
साईंनीं उपदेश अमृत जणूं भक्तांस हें पाजिलें
जे प्याले मुळिं ना विकल्प धरितां ते सद्गती पावले
"झाला पार्थिव देह नष्ट, तरि मी येवोनि भक्तांकडे
त्यांना रक्षिन" साइश्रेष्ठ वदले, वात्सल्य हें केवढें ! ॥ ८ ॥

शंकर बाळाजी दाते, माणगांव




## जून १९५७

या महिन्यांत श्रीसाईदर्शनास बाहेर-गावचेभक्त कमी प्रमाणात आले होते. याचें कारण शीतज्वराची सांथ सर्वत्र पसरलेली होती.

कांहीं कलावंतानीं श्रीचेपुढें हजेरी दिली—त्यांची नांवें खालील प्रमाणें:—

**कीर्तनः**—श्रीमती लक्ष्मीबाई वाईकर, येवला. सं. गवई मराठे यांची दोन कीर्तनें झालीं.

**प्रवचनः**—वे. शा. सं. गोविंद विष्णू केळकर, औंध.

**गायनः**—श्री. नागेशराव बांदेकर बेळगांव, श्री. सोनूबाई देर्डेकर, श्री. बच्यूभाई चेवलीवाला, सुरत, श्री. बन्सी-धरबुवा, नागपूर, श्री. कुसुम काळे, नागपूर. श्री. विठ्ठल ल. इनामदार, पुणें. रा. सा. ठुसे, नगर. श्री. ठाणेंदार राहता श्री. दत्तोबा केरकर, मुंबई. श्री शंकरराव पेटे, मुंबई. श्री गजाननबुवा पंडित, मुर-बाड. श्री. शंकर श्रीपाद बोडस सौ. शांताबाई बोडस, कानपूर. श्री. आर. लक्ष्मीपती नायडू सौ. कमलाबाई नायडू, विलासपूर. श्रीसाईबाबा संस्थानचे सरकार-कून श्री. खडकतकर यांचें चि. विलास यांचा व्रतबंध श्रीमंदिरात मोठ्या थाटात झाला. त्यानिमित्त संस्थानचें सर्व नोकर सेवेकरी याना पक्वानाचे भोजन सरकारकून यांनीं दिलें. संस्थानचें धर्मार्थ दवाखान्यां-तून शीतज्वराचे बरेच लोक औषधोपचार करून घेऊन बरे झाले.

## जुलै १९५७

या महिन्यांत श्रीसाई दर्शनासाठीं श्रीगुरु पौर्णिमाउत्सवाखेरीज भक्तांची गर्दी विशेष नव्हती कांहीं कला-कारानीं श्रीपुढें हजेरी दिली. ती खालील-प्रमाणें—खाँसाहेब अमीरखान, मुंबई (गायन) श्री. ककून (तबला) श्री. कृष्णराव नार्वेकर, मुंबई (हार्मोनियमः) श्री. शंकर रामकृष्ण चौरीकर नाग-पूर (हार्मोनियम) श्री. कृष्णराव वऱ्हाडकर, मुंबई (गायन) श्री. भाऊ आबा वैरागकर, घोडेगाव. (बांसरी वादन) श्री. पंडित जगन्नाथबुवा सुरतकर साकोरी. श्री. रणछोडभाई, साकोरी (गायन) श्री. प्रल्हाद हरी लव्हाटे. (गायन नकला) पुणें.

संस्थान धर्मार्थ (दवाखाना) कार्य नेहमीप्रमाणें चालू आहे.

शके १८७९ च्या गेले रामनवमीचे उत्सवात करमणुकीचे कार्यक्रमांत प्रसिद्ध कलाकारांनीं हजेरी दिली त्यांत श्रीमती जीवनकला मुंबई यानीं कथ्थकी नृत्य फारच उत्तम केले. तबल्याची साथ श्रीयुत हजारीलाल व हारमोनियमची साथ श्रीयुत वसंतराव शेजवाडकर यानी केलेली होती.

## आगस्ट १९५७

चालू महिन्यात पावसाळ्यामुळें भक्त लोकांची गर्दी कमी आहे कलाकारानीं श्रीपुढें हजेरी दिली ती खालीलप्रमाणेः—

**कीर्तनः**—श्री. ह. भ. प. गंगामाई देशमुख, नासिक. श्री. ह. भ. प. विठ्ठलबुवा आळेकर, आळवे. सं. गवई श्री. मराठे यांची या महिन्यात पांच कीर्तनें झाली.

**गायकः**—श्री. रघुवीर मुकुंद नाईक, पुणें सौ. जयश्रीबाई हानगल, बेळगांव. सौ. सावित्रीबाई लाखे, जेजुरी. सौ नलिनी चांदोरकर, राजकोट. सनईवादन श्री. दामुअण्णा दळवी. श्रीरामपूर. तबलावादन श्री. पांडोबा गुरव, श्रीरामपूर. १५ आगष्ट स्वातंत्र्यदिनानिमित्त झेंडावंदन, दीपोत्सव, गायन कीर्तन, असे कार्यक्रम झाले.

गोकुळ अष्टमी निमित्त श्रीकृष्णजन्माचे कीर्तन तीर्थप्रसाद हे कार्यक्रम झाले दुसरे दिवशी गांवांतून रथाची मिरवणूक तिसरे दिवशी गोपालकाला कीर्तन असे कार्यक्रम झाले.

संस्थानच्या धर्मार्थ दवाखान्याचे कार्य नेहमीप्रमाणें चालू आहे.

## संस्थानचें मदतकार्य

संस्थाननें यंदा २९० शाळकरी विद्यार्थ्यांना आणि १४ कॉलेज विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ति म्हणून एकूण रु. ९२०० दिले. यांपैकीं ६६ विद्यार्थी खुद्द शिर्डी येथील आहेत. याखेरीज शिर्डीच्या शाळेंतील ८ वी व ९ वी च्या नव्या वर्गासाठीं लांकडी सामान व शास्त्रीय उपकरणें यांकरतां रु. २५०० संस्थाननें दिले.

## नवी नेमणूक

श्री. बी. आर. देखणे महालकरी ह्यांची बदली दुसऱ्या ठिकाणीं सरकारनें केली असून त्यांचे जागीं श्री. जी. के. चिकटे डेप्युटी चिटणीस ह्यांची एक्झीक्युटीव्ह ऑफिसर शिरडी म्हणून नेमणूक केली आहे.

संस्थाननें यंदा समाधि मंदिरामधील जुनी वाद्यें बदलून २ नवीन बाजाच्या पेट्या, तंबोरा व दुसरी भजनाची उपकरणें उपयोगासाठीं खरेदी केली आहेत.

श्रीसाई बाबांचे मूर्तीवरील छत्रीला सोन्याचे पाणी दिलें आहे. समाधि मंदिरातील चांदीचा कठडा दुरुस्त केला. श्रीसाई बाबांच्या चावडी मिरवणूकिसाठीं नवीन मखमाली कोट व अब्दागीरें तयार करून घेतली.

गेल्या सर्वसाधारण सभेंत भक्तमंडळानें नवीन इमारती बांधण्यासाठीं रु. ३॥ लाख खर्चाची मंजुरी दिली. त्याचा विनियोग, दिक्षितवाडा सुधारण्यास व त्यांत फेरफार करण्यास, भोजनगृह बांधण्यास, गुरुपादुका स्थान सुधारण्यास, नवलकर वाड्यामधील इमारतीस दुसरा मजला चढविण्यास तसेंच कामगार वर्गाकरितां रहावयास चाळी श्री. ह. त्रि. शेळके ह्यांनीं दिलेल्या बसस्टँडसमोरील जागेंत अथवा दुसऱ्या उपलब्ध असलेल्या जागेंत बांधण्यास केला जाईल.

तसेंच समाधि मंदिराजवळ दुसरी जागा सरकारशीं पत्रव्यवहार करून, खरेदी करण्यास भक्त मंडळानें मंजुरी दिली आहे. ह्याबाबत जर संस्थानला यश आले तर जागेचा प्रश्न सुटून पुढील सुधारणा करणे शक्य होऊन शिर्डीस येणाऱ्या भक्त मंडळाची बरीचशी गैरसोय दूर होईल अशी आशा आहे.

कै. गोविंदराव दाभोळकर (हेमाडपंत) यांच्या स्मरणार्थ शिरडी येथें उघडलेल्या पुस्तकालयांत सुधारणा करून त्यांत वृत्तपत्रें आणि धार्मिक ग्रंथ यांची भर टाकण्यात आली आहे. या पुस्तकालयाचा भक्तांनीं उपयोग करून घ्यावा अशी संस्थानची विनंती आहे.

संयुक्त चिटणीस } द. ब. राणे, सो. बी. वेलकर